मेहता मराठी ग्रंथजगत

डिसेंबर, २०१५

किंमत १५ रुपये

अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले
ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक



आमची नवीन पुस्तके



नाताळच्या हार्दिक शुभेच्छा!

ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक डॉ. आनंद यादव यांनी दि. ३० नोव्हेंबर २०१५ रोजी ८१व्या वर्षात पदार्पण केले. यानिमित्त यादव यांचे चाहते व चार्म्स ग्रुपच्या माध्यमातून सामाजिक कार्य करणारे श्री. लक्ष्मीकांत पाचारणे यांनी सहस्त्रचंद्र दर्शन सोहळा आयोजित केला.

हा सोहळा सामाजिक कार्यकर्ते श्री. गिरीश प्रभुणे यांच्या चिंचवड येथील पुनरुत्थान समरसता गुरुकुलम् या आश्रमात संपन्न झाला. या सोहळ्यात यादव यांची ग्रंथतुला करण्यात आली. चार्म्स ग्रुपचे संस्थापक श्री. लक्ष्मीकांत पाचारणे यांनी विविध प्रकाशन संस्थांची सुमारे पाचशे पुस्तकांची तुला करून ती आश्रमाला भेट दिली. श्री. गिरीश प्रभुणे यांनी श्री. आनंद यादव यांचा सत्कार केला आणि 'आनंद यादव यांनी आपल्या साहित्य व सामाजिक बांधिलकीतून आमच्या हृदयात जे स्थान निर्माण केले आहे ते कुणीही हिरावून घेऊ शकत नाहीत,' असे उद्‌गार काढले.

मेहता मराठी ग्रंथजगत

। डिसेंबर २०१५ । वर्ष पंधरावे । अंक बारावा ।

मांडणी-अक्षरजुळणी

मेहता पब्लिशिंग हाऊस

संपादक-मुद्रक-प्रकाशक
सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर,
पुणे - ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४
२४४७५४६२
Extension
(ग्रंथजगत विभाग) - २२४/२२५

E-mail : info@mehtapublishinghouse.com

संपादक
सुनील मेहता

कार्यकारी संपादक
शंकर सारडा

अंकाची किंमत **१५ रु.**

वर्गणी
मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा ११ तारखेस

अनुक्रमणिका

संपादकीय	४
साहित्यवार्ता	८
पुरस्कार	३१
पुस्तक परिचय	
अग्निदिव्य	३५
वादळातील दीपस्तंभ	६५
संकरित (विज्ञानकथा)	८५
श्रद्धांजली	९५

डिजिटल अंकाची वर्गणी : तीन वर्षांची ३००रु., पाच वर्षांची ४००रु.

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

हा सोहळा सर्वांना सुखकर होवो!

पिंपरी-चिंचवड येथे १५ ते १८ जानेवारी २०१६ रोजी होणाऱ्या ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा जो कार्यक्रम जाहीर झाला आहे, तो बघून या संमेलनाला महासंमेलनाचे स्वरूप येत चालले आहे असे वाटते. डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ सोसायटीने या संमेलनाची जबाबदारी घेतली आहे; १९९२ मध्ये कोल्हापूरला डॉ. डी. वाय. पाटील हेच संमेलनाचे निमंत्रक होते. कवयित्री इंदिरा संत यांचा पराभव करून रमेश मंत्री त्यावेळी संमेलनाध्यक्षपदी स्थानापन्न झाले होते. एखाद्या जत्रेसारखे ते संमेलन झाले होते. डॉ. पाटील यांचे पाठबळ असल्याने त्या संमेलनाचा खर्च दणक्यात झाला होता; आणि तीन-चार लाखांची थकबाकी फेडण्याची वेळ त्यांच्यावर आली. शिक्षण सम्राटांना तो तोटा भरून काढणे अवघड नव्हते. डॉ. डी. वाय. पाटील यांची प्रतिमा त्या संमेलनाने खूपच उंचावली. पुढे त्यांच्या विद्यापीठाचा व्यापही खूप वाढला आणि राज्यपालपदीही त्यांची निवड झाली. हा मागचा अनुभव गाठीशी असल्याने ८९ वे अ.भा.साहित्य संमेलनही भव्य प्रमाणावर साजरे होईल अशी खात्री वाटते. घुमानच्या संमेलनाचा दोन-अडीच कोटी रुपयांचा खर्च भारत देसडला यांनी एकट्याने उचलला. कोणाची आर्थिक मदत त्यांनी घेतली नाही. डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठही तोच कित्ता गिरवील अशी शक्यता आहे. महाराष्ट्र शासनाचे २५ लाखांचे अनुदान नेहमीप्रमाणेच मिळाले की झाले. त्यामुळे पिंपरी-चिंचवडच्या संमेलनाचा थाट आगळावेगळा असेल अशा खात्री बाळगायला हरकत नाही.

डॉ. श्रीपाल सबनीस यांनी विक्रमी मते मिळवून कवी विठ्ठल वाघ

यांच्यावर मात करून रमेश मंत्री यांचीच परंपरा चालवली आहे. डॉ. श्रीपाल सबनीस यांनी आपल्या निवडणूक प्रचाराची बहुत चातुर्याने आखणी करून निर्विवाद यश मिळवले याबद्दल त्यांचे अभिनंदन करायला हवे. त्यांच्या नावावर २६ पुस्तके आहेत. त्यांची नावे सांगणे अवघड जाईल. कारण ती सर्व वैचारिक स्फुट लेखांची पुस्तके आहेत. फारशी गाजलेली वा वाचली गेलेली नाहीत. परंतु डॉ. सबनीस यांच्या आक्रमक युक्तिवादामुळे त्यांचे वक्तृत्व व्यासपीठ दणाणून सोडते. संमेलनातील त्यांचे भाषणही त्यामुळे गाजेल असे वाटते.

या संमेलनाचे स्वरूप नेहमीसारखेच असेल; पण कार्यक्रमांची रेलचेल असेल. आठ परिसंवादात चाळीसेक वक्ते व्यासपीठावर डावपेच लढवतील. दोन कविसंमेलनांच्या जोडीने एक बहुभाषक कविसंमेलनही 'आंतरभारती'चे सानेगुरुजींचे स्वप्न सादर करील. तीन मुलाखती, तीन सांस्कृतिक कार्यक्रम यांचाही जल्लोष रसिकांना मंडपात खिळवून ठेवील. ग्रंथप्रदर्शनात ५०० स्टॉल्स असतील. स्टॉलचे भाडे हजार रुपयांनी वाढवल्याने प्रकाशक नाराजी प्रकट करतात. पण प्रचंड गर्दीमुळे त्यांचा धंदा चांगला होईल आणि त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलेल.

आठ परिसंवादांचे विषयही वादविवादाची लज्जत वाढवणारे ठरतील. (१) मराठी समीक्षा किती संपन्न, किती थिटी? (२) मराठी वाङ्मय पुरस्कारांचे सांस्कृतिक आणि सामाजिक स्थान (३) १९८० नंतरची कविता स्त्रीकेंद्रित आहे का? (४) मराठी भाषेत व्यवहार आणि व्यवहारात मराठी भाषा. (५) अभिरुचिसंपन्न विनोद आणि आजचे साहित्य (६) माध्यमातील स्त्रीप्रतिमा आणि भारतीय संस्कृती (७) आजची तरुणाई काय वाचते, काय लिहिते? (८) श्रमिक महिलांच्या व्यथा आणि लेखकांच्या कथा, ही विषयांची नोंदच. रसिकांना आकृष्ट करील. आता वक्ते काय बोलतील; ते बघून मंडपात बसायचे की ग्रंथांच्या स्टॉलवर रेंगाळायचे, हे त्या त्या वेळच्या

सादरीकरणावर अवलंबून राहील. ज्ञानपीठप्राप्त साहित्यिक, कथाकथन, मराठी उद्योजक, बालसाहित्य, बालनाट्य, असे सर्वसमावेशक संमेलन व्हावे, अशीच एकूण योजना आहे हे उघडच आहे.

प्रतिनिधींसाठी १२०० रुपये आणि २००० रुपये शुल्क आहे. डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ म्हटले ती विनाशुल्क व्यवस्थाही होऊ शकते. परंतु मराठी रसिकांचे एकूण उत्पन्न वर्धिष्णु असल्याने अतिथ्याचा भार डॉ. पाटील यांच्यावर टाकण्याची गरज नसावी. प्रदर्शनातील स्टॉलचे भाडे दुष्काळग्रस्तांना देण्यात येणार आहे. तेव्हा आपण हस्तेपरहस्ते सामाजिक बांधिलकीचे व्रतच पाळत आहोत, हे समाधान का मिळवू नये?

साहित्य संमेलन हा आपला एक उत्सवच! त्याची दीर्घ परंपरा. त्यामुळे एकूण सोहळा सर्वांना सुखकर व्हावा.

अध्यक्ष डॉ. सबनीस, निमंत्रक डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, स्टॉलधारक, कवी, परिसंवादातील वक्ते, इतर पाहुणे या सर्वांना हा सोहळा सुखकर व्हावा, हीच इच्छा.

eBooks

नाहीत स्कॅन केलेली पाने
किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच,
खरीखुरी **eBooks**
युजर फ्रेंडली, वाचायला सोपी,
सोयीस्कर – थेट तुमच्या कॉम्प्युटर,
आयपॅड आणि
ॲन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

Online पुस्तके खरेदी करा
www.mehtapublishinghouse.com

वाचकांसाठी सुवर्णसंधी!

WORDPOWER

Books | Toys | Stationery | Music | Movies | Games

बेळगाव / कोल्हापूर / औरंगाबाद

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक, मूव्ही, गेम्स अन्यही
बरेच काही आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे.
सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

बेळगाव, कोल्हापूर, औरंगाबाद येथील वर्डपॉवरचा पत्ता पुढीलप्रमाणे
पहिला मजला, भंडारी कॅपिटल, कॉसमॉस बँकेच्या वर, खानापूर रोड,
टिळकवाडी, बेळगाव-५९०००६. टेलिफोन क्र. (०८३१)-४२००६७६
शॉप नं १, ग्राऊंड फ्लोअर, अथर्व एम्पाअर, ताराबाई पार्क,
कोल्हापूर-४१६००३. टेलिफोन क्र.(०२३१)-६६१७६२५/२६
शॉप नं. - जी/१५, प्रोझन मॉल, चिखल ठाणा, एमआयडीसी,
औरंगाबाद - ४३१००६.

अधिक माहितीसाठी www.wordpowerbookshop@gmail.com येथे संपर्क साधा.

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

ज्ञानपीठ नाही तर नाही; पण वाचकांचे प्रेम अलोट आहे याची धन्यता मोठी



प्रत्येक ठिकाणी 'ज्ञानपीठप्राप्त लेखक' अशी भैरप्पा यांची ओळख करून दिली जाते; पण त्यांना अजूनही 'ज्ञानपीठ' मिळालेले नाही. याविषयी भैरप्पा म्हणाले की, ''ज्ञानपीठ', 'नोबेल' असे पुरस्कार मिळाले म्हणजेच साहित्यकृती श्रेष्ठ ठरतात असे नाही. या पुरस्कारांवर माझा विश्वासही नाही. वाचकप्रेम हाच खरा पुरस्कार आहे. कर्नाटकातीलच नव्हे, तर ठिकठिकाणच्या वाचकांनी माझ्यावर मनापासून प्रेम केले आहे, हे मला अधिक मोलाचे वाटते.''

'साधी राहणी आणि उच्च विचारसरणी' ही म्हण प्रत्यक्ष जगणारे साहित्यिक डॉ. एस. एल. भैरप्पा यांना कन्नड साहित्यातच नव्हे, तर एकूण भारतीय साहित्यात आदराचे स्थान आहे.

लेखकांच्या हत्या किंवा दादरी प्रकरणाला मोदी जबाबदार कसे, असे विधान केल्यामुळे भैरप्पा हे मोदी समर्थक आहेत का अशी चर्चा सुरू झाली आहे. याविषयी ते म्हणाले, ''मी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा समर्थक नाही आणि विरोधकही नाही. मात्र वस्तुस्थिती सांगणे, तिच्याकडे वाचकांचे लक्ष वेधणे हे प्रत्येक लेखकाचे कर्तव्य आहे. 'मोदी जबाबदार कसे?' हे विधान म्हणजे वस्तुस्थिती जाणून घेण्याचाच प्रकार आहे. बाकी काही नाही.''

''दाभोलकर, पानसरे, कलबुर्गी यांच्या हत्येचा निषेध करायला हवाच; पण या घटनांमुळेच आपले अभिव्यक्ती स्वातंत्र्य अडचणीत आले, असे

म्हणता येणार नाही. काँग्रेसचे सरकार असताना सलमान रश्दी, तस्लिमा नसरीन यांच्या पुस्तकांवर बंदी आलीच होती. काश्मीरमध्ये कितीतरी लोक मारले गेले, त्यावेळी हे लोक का जागे झाले नाहीत, हा प्रश्न आहे. पुरस्कार परत करणारे किती आणि कोण आहेत, हेही पाहायला हवे. सी. एन. आर. राव, जयंत नारळीकर, अनिल काकोडकर असे मान्यवर लेखक, वैज्ञानिक यामध्ये नाहीत. पुरस्कार परत करणे ही काँग्रेस आणि डाव्या लोकांची राजकीय खेळी आहे. पुरस्कार परत करणारे हे खरे लेखक नाहीत, ते 'कार्यकर्ते लेखक' आहेत. त्यांचा हेतू पूर्णत: राजकीय आहे,'' असेही भैरप्पा यांनी सांगितले.

औरंगाबादेत युवा साहित्य संमेलन

तरुण साहित्यिकांना प्रोत्साहन देण्यासाठी फेब्रुवारी महिन्याच्या अखेरीस औरंगाबादेमध्ये युवा साहित्य संमेलन घेण्याचा निर्णय अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाने घेतला. त्यामुळे हे संमेलन नाकारणाऱ्या महामंडळाला अखेर ते घेण्यासाठी कृतिशील पावले टाकावी लागली.

राज्य सरकारच्या युवा धोरणात युवा साहित्य संमेलनाची कल्पना मांडली होती. साहित्य संमेलन आयोजनाचा अनुभव असलेल्या साहित्य महामंडळातर्फे हे संमेलन घेण्यात येईल, असा अध्यादेशही प्रसिद्ध झाला. एवढेच नव्हे, तर त्यासाठी क्रीडा आणि युवक कल्याण विभागाकडून निधीही उपलब्ध करून दिला होता. डॉ. वासुदेव गाडे यांनी हे संमेलन आयोजित करण्याची तयारी दर्शविली. परिणामी, महामंडळाने आपली आधीची भूमिका मागे घेण्याचा निर्णय जाहीर केला.

डॉ. माधवी वैद्य म्हणाल्या, 'युवा साहित्य संमेलन घेण्याची जबाबदारी सरकारने आमच्यावर सोपवली आहे. त्याबाबत आम्ही सविस्तर चर्चा केली. मराठवाडा साहित्य परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी हे संमेलन घेण्याची जबाबदारी स्वीकारली आहे. या संमेलनाच्या नियोजनासाठी स्वतंत्र मार्गदर्शक समिती नेमली असून, महामंडळाचे प्रमुख पदाधिकारी, मराठवाडा साहित्य परिषदेचे प्रमुख पदाधिकारी यांच्यासह डॉ. सदानंद मोरे, उषा तांबे, मनोहर म्हैसाळकर यांचा समावेश आहे.'

नव्या नाट्य संस्था नाहीत; ग्रामीण कलावंत दूरच

ग्रामीण भागात प्रतिभावान कलावंत आहेत, पण त्यांना योग्य व्यासपीठ मिळत नाही, अशी तक्रार नेहमी केली जाते. या पार्श्वभूमीवर हौशी नाट्य स्पर्धेचे एक महत्त्वाचे व्यासपीठ उपलब्ध असताना या स्पर्धेपासून ग्रामीण कलावंत अद्याप दूरच आहेत. यंदाच्या स्पर्धेतही शहरी नाट्य संस्थांचाच वरचष्मा असून, त्याच संस्था तीच नाटके सादर करताना दिसली.

५५व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचे आयोजन महाराष्ट्र सरकारच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे ४ डिसेंबर पर्यंत भरत नाट्य मंदिर येथे करण्यात आले. प्राथमिक फेरीत १८ नाट्यसंस्था पुण्यातील होत्या.

ही स्पर्धा कलाकारांना ग्रामीण भागापर्यंत पोहचवण्यात संचालनालय कमी पडत आहे. ग्रामीण भागातील हौशी कलाकारांचा सहभाग यामध्ये वाढताना दिसत नाही.

शांताबाई शेळके यांच्या साहित्याला उजाळा

'तरी असेल गीत हे' या कार्यक्रमातून कवयित्री शांताबाई शेळके यांच्या रससंपन्न गीतांना, कवितांना उजाळा देण्यात आला.

'गंगोत्री ग्रीनबिल्ड' संस्थेच्या वार्षिक स्नेहमेळाव्यामध्ये शांता शेळके यांच्या कविता आणि गीतांवर आधारित 'तरी असेल गीत हे' ही मैफल रंगली. कार्यक्रमाची संकल्पना, लेखन आणि निवेदन डॉ. अरुणा ढेरे यांचे होते.

'कवयित्री म्हणून, गीतकार म्हणून शांताबाई संवेदनशील होत्या. रससंपन्न शब्द, पाठांतर, भारतीय परंपरेचे चिंतन हे त्यांचे वैशिष्ट्य होते. चित्रदर्शी वर्णन, सहजसुंदर ललित लेखनातून त्या कवितेची एकेक ओळ जिवंत करतात, असे डॉ. ढेरे म्हणाल्या.

स्वाती दांडेकर - कर्तृत्वाचा सन्मान

अमेरिकेतील स्वाती दांडेकर यांच्यावर राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी एशियन डेव्हलपमेंट बँकेच्या कार्यकारी संचालकपदाची जबाबदारी सोपवली आहे. १९७३ साली अमेरिकेत आलेल्या श्रीमती दांडेकरांनी स्थानिक पातळीवर राजकारणात आपली छाप पाडली. नागपूर आणि मुंबई

विद्यापीठातून पदवी प्राप्त केलेल्या स्वाती दांडेकर यांचे कार्यकारी संचालकपद हे राजदूताच्या समकक्ष आहे. अमेरिकेच्या ओबामा प्रशासनात अलीकडच्या काळात मोठ्या संख्येने भारतीयांना स्थान मिळत आहे.

काही दशकांपूर्वी रॉनल्ड रेगन यांच्या काळात भारतीय वंशाच्या व्यक्तीला अमेरिकन प्रशासनात स्थान दिले तेव्हा अनेकांच्या भुवया उंचावल्या गेल्या होत्या. भारत आणि भारतीयांबाबतचा दृष्टिकोन तेव्हा अनुकूल नव्हता. या कालावधीत अमेरिकेत वास्तव्य करणाऱ्या जवळपास ३१ लाख भारतीयांनी आपल्या कष्टाने आणि उपजत गुणांनी तेथे प्राप्त झालेल्या संधीचे सोने केले. त्यांच्यातील कर्तृत्वगुणांची दखल आम जनतेला तसेच राजकारण्यांनाही घ्यावी लागली. तेथील राजकारणापासून तंत्रज्ञानापर्यंत, व्यवसायापासून विद्वानांपर्यंत अनेक प्रकारच्या क्षेत्रांत भारतीयांनी आपले कर्तृत्व दाखवले. त्यामुळे भारतीयांचा समावेश तेथील प्रशासकीय निर्णयप्रक्रियेत होऊ लागला. राष्ट्राध्यक्ष ओबामा यांनी त्याबाबत दाखवलेल्या चोखंदळ वृत्तीला आणि मनाच्या खुलेपणाला श्रेय द्यायला हवे.

साहित्य अकादमीवर वीरा राठोड

साहित्य अकादमीचा यंदाचा युवा पुरस्कार कवी वीरा राठोड यांना दिल्ली येथे नुकताच प्रदान करण्यात आला. अकादमीतर्फे दरवर्षी २४ भाषांतील युवा लेखकांना पुरस्काराने गौरविण्यात येते. यंदा हा पुरस्कार राठोड यांच्या 'सेन साई वेस' या काव्यसंग्रहाला दिल्लीत झालेल्या कार्यक्रमात अकादमीचे अध्यक्ष विश्वनाथप्रसाद तिवारी यांच्या हस्ते देण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ कादंबरीकार विश्वास पाटील, अकादमीचे उपाध्यक्ष तथा ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त डॉ. चंद्रशेखर कंबार, सचिव के. श्रीनिवासराव उपस्थित होते. साहित्य नवसमाजाच्या निर्माणासाठी भूमिका निभावत असते. ठराविक विचारधारेचा पुरस्कार न करता मानवतावादाची, सामान्य माणसाची बाजू घेऊन साहित्यिकांनी व्यक्त व्हावे, अशी भूमिका राठोड यांनी मांडली.

गुगल मॅप ऑफलाइनही वापरा

सध्या देशातील इंटरनेट कनेक्शनची अवस्था फारशी भूषणावह नाही. त्यामुळे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी उपयुक्त असणारी

'गुगल मॅप' ही सेवा ऑनलाइनच्या बरोबरीने ऑफलाइनही वापरता यावी अशी व्यवस्था केली जात आहे.

एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी स्मार्टफोनवर माहिती सेट केल्यानंतर इंटरनेट कनेक्टिव्हिटी मिळविण्यात अडचणी येतात. पण आता त्यामुळे काही बिघडणार नाही. एकदा माहिती सेट केल्यानंतर कनेक्टिव्हिटी असो अथवा नसो, 'गुगल मॅप' आपले काम विनाअडथळा करीत राहील, असे 'गुगल'तर्फे स्पष्ट करण्यात आले.

ड्रायव्हरला योग्य ते दिशादर्शन, ठराविक ठिकाणांची माहिती आणि रस्ता चुकल्यास योग्य ते मार्गदर्शनही मिळणार आहे, तेही इंटरनेट कनेक्टिव्हिटीविना!

उदाहरणार्थ... तुम्ही दिल्ली विमानतळाकडे जात आहात, दरम्यान तुम्हाला विमानतळानजीकची ठिकाणे पाहायची आहेत, तर 'मॅप'वर संबंधित ठिकाणांचा 'सर्च' दिल्यानंतर ती ठिकाणे दिसण्यास सुरुवात होईल. ही माहिती तुम्ही डाउनलोड करून घेऊ शकाल आणि इंटरनेट कनेक्टिव्हिटी नसताना वापरात आणू शकाल. त्यानंतर 'गुगल मॅप' वर जाऊन 'ऑफलाइन एरियाज' असा पर्याय वापरात आणून '+' बटन दाबल्यास डाउनलोड केलेली माहिती वापरता येईल. एकदा मॅप डाउनलोड केल्यानंतर 'गुगल मॅप' दिल्ली विमानतळाभोवती असेपर्यंत कार्यरत राहील.

कलावंतांचे मौन

'सध्या साहित्यिक, विचारवंत, कलावंत बोलू लागले आहेत. याचे कारण पूर्वी कधीही न जाणवलेली भीती त्यांना जाणवत आहे. अत्याचाराच्या घटनांचे धर्मकारणाचा आधार देऊन समर्थन केले जात आहे. त्याला आवर घालण्याचा प्रयत्न सत्ताधारी करत नाहीत. सत्ताधाऱ्यांच्या मौन राहण्यातून त्यांची या धर्मकारणाला मूकसंमती आहे, असा संदेश सगळीकडे जात आहे,' अशी टीका सोळाव्या कोकण मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष जयंत पवार यांनी केली.

ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांच्या हस्ते या संमेलनाचे उद्‌घाटन झाले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात जयंत पवार यांनी सद्य:स्थितीवर भाष्य केले. ''देशाची बहुसांस्कृतिक ओळख हे देशाचे सामर्थ्य असल्याची भावना

पंतप्रधान नरेंद्र मोदी वारंवार व्यक्त करत असतात. त्यांच्या भावना प्रामाणिक असतील तर 'थ्री हंड्रेड रामायणाज' वरील बंदी उठवावी'', अशी मागणी पवार यांनी केली. 'लेखकांनी आपल्या अनुभवांशी प्रामाणिक राहून वास्तवाचे भान वाचकाला करून द्यावे व त्याचा विवेक जागवावा', असेही आवाहन त्यांनी केले.

'हकिगत सिनेमाची' पुस्तकाचे प्रकाशन

पराग प्रकाशनतर्फे सतीश जकातदार लिखित 'हकिगत सिनेमाची' या पुस्तकाचे प्रकाशन फिल्म फेडरेशनचे अध्यक्ष सुधीर नांदगावकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्ही. शांताराम फाउंडेशनचे अध्यक्ष किरण शांताराम, राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाचे संचालक प्रकाश मगदूम, 'ग्रंथाली'चे दिनकर गांगल, पत्रकार विजय कुवळेकर उपस्थित होते.

गांगल म्हणाले, ''पुढील काळ माध्यमांचा असून, पुस्तक हे त्यातील एक माध्यम असणार आहे. आमच्या पिढीत चित्रपट हे व्यसन असायचे. सतीश जकातदार यांच्या पिढीत ते वेड अभ्यासाच्या माध्यमातून उतरले. या पुढे मात्र नव्या पिढीत त्या संवेदना जागृत करण्याची आवश्यकता आहे.''

चित्रपट आणि समाज यांच्यातील संबंध शोधण्याची गरज असून, ते काम जकातदार यांनी करावे, अशी अपेक्षा कुवळेकर यांनी व्यक्त केली.

भूतान व क्युबावरील पुस्तकाचे प्रकाशन

पर्यावरण क्षेत्रातील प्रसिद्ध लेखक, अभ्यासक दिलीप कुलकर्णी यांनी लिहिलेल्या 'भूतान आणि क्युबा सम्यक विकासाच्या दिशेने' या पुस्तकात सकल राष्ट्रीय समाधान ही संकल्पना पाळणाऱ्या भूतानची आणि सेंद्रीय शेतीचे प्रतिमान निर्माण करणाऱ्या क्यूबाची यशोगाथा मांडण्यात आली आहे.

शिवकालीन चरित्रकोश

छत्रपती शिवाजी महाराजांच्या संपर्कात आलेल्या सुमारे आठशे व्यक्तींची माहिती सहज उपलब्ध व्हावी म्हणून शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे शिवकालीन चरित्रकोश तयार करीत आहेत. 'पुण्यभूषण फाउंडेशन'च्या 'माझे पुण्यभूषण' या दिवाळी अंकाच्या प्रकाशनाच्या या वेळी उद्योजक

हिराभाई शहा (चोखावाला), राजेश शहा, 'पुण्यभूषण'चे अध्यक्ष डॉ. सतीश देसाई, संयोजन समितीचे सदस्य मकरंद टिल्लू, नितीन ढेपे, दीपक बिडकर, दिलीप कुंभोजकर उपस्थित होते.

बाबासाहेब म्हणाले, ''शिवाजी महाराजांचे अनेक मित्र होते आणि शत्रूही, त्यांची माहिती एकत्रित स्वरूपात मिळत नाही. एकेकाची माहिती मिळवायची म्हटली, तर भरपूर वेळ खर्च करावा लागतो. म्हणून हा कोश तयार करतोय. यात जवळपास ८०० व्यक्तींची माहिती असेल. सुरुवातीला हा कोश मराठी भाषेत येईल.''

दुर्मिळ पुस्तके, हस्तलिखिते पाहण्याची वाचनप्रेमींना संधी

महाराणी व्हिक्टोरिया यांचे चरित्र, सवाई माधवराव पेशवे यांची रोजनिशी, हजरत महंमद पैगंबर यांचे चरित्र आदी १८५० ते १९१५ या कालावधीत लिहिलेल्या तसेच प्रकाशित झालेल्या ९५ दुर्मिळ पुस्तकांचे व हस्तलिखितांचे प्रदर्शन भरवण्यात आले.

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेतर्फे भावे हायस्कूलच्या डॉ. प्र. ल. गावडे सभागृहात प्रदर्शनात शिंदे घराण्याचा पद्यमय इतिहास, लोकमान्य टिळकांचे पद्यमय चरित्र, सवाई माधवराव पेशवे यांची रोजनिशी आदी पुस्तकांचा समावेश होता.

प्रदर्शनापूर्वी झालेल्या कार्यक्रमात पत्रकार किरण ठाकूर यांच्या हस्ते पत्रकार डॉ. सागर देशपांडे यांना 'महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. संस्थेकडे पारितोषिकासाठी आलेल्या पुस्तकांपैकी १९ पुस्तकांच्या लेखकांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. डेक्कन कॉलेजचे कुलपती डॉ. गो. बं. देगलूरकर, संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्र. ल. गावडे, अ. नी. नवरे, ॲड. अ. श्री. चाफेकर आदी उपस्थित होते.

'धनवृद्धीसाठी म्युच्युअल फंड'चे प्रकाशन

'सकाळ प्रकाशन'ने प्रसिद्ध केलेल्या अरविंद परांजपे यांच्या 'धनवृद्धीसाठी म्युच्युअल फंड'या पुस्तकाच्या चौथ्या आवृत्तीचे प्रकाशन १ नोव्हेंबर रोजी झाले.

मुदत ठेवी, सोने, स्थावर मालमत्ता आदी गुंतवणुकीच्या प्रकारांच्या तुलनेत सतत बदलत्या अर्थव्यवस्थेमध्येही म्युच्युअल फंडातील गुंतवणूक

कशी फायदेशीर आणि सुरक्षित ठरते हे या पुस्तकात सोदाहरण स्पष्ट केले आहे. गुंतवणुकीसारखा क्लिष्ट विषय संवादाच्या माध्यमातून सोप्या भाषेत उलगडून दाखवला आहे. सध्याच्या बदलत्या आर्थिक परिस्थितीत सर्वसामान्य गुंतवणूकदारालाही म्युच्युअल फंड कसे फायदेशीर ठरू शकतात याविषयी मार्गदर्शन केले आहे.

ग्रामीण, दलित साहित्य शब्दकोशाचा तिसरा खंड

औसर, इळानिंदा, कनोटा, खाकड, घरट्टा, दळपा, जोजार, असे कितीतरी शब्द ग्रामीण किंवा दलित साहित्य वाचताना समोर येतात. या शब्दांचा अर्थ मराठी वाचक संदर्भाने समजून घेतो. मात्र, त्याला या शब्दांचा थेट अर्थ समजला असेलच, याची खात्री देता येत नाही. याच विचारातून राज्य मराठी विकास संस्थेने १९९६ सालापासून दलित व ग्रामीण साहित्यातील शब्दांचा कोश तयार करायचा निर्णय घेतला. या शब्दकोशाचे दोन खंड २०१२ व २०१४ साली प्रकाशित झाले असून शेवटचा खंड २०१६ साली प्रकाशित होईल.

शब्दकोशाच्या या तीनही खंडांमध्ये १८१८ पासून २००५ पर्यंतच्या१८२ वर्षांच्या ग्रामीण व दलित साहित्याचा आढावा घेण्यात आला आहे. ग्रामीण व दलित साहित्य कोश प्रकल्पांतर्गत शब्दकोशाव्यतिरिक्त रूढी, प्रथा, परंपरा विधिकोशाची निर्मितीही करण्यात आली आहे. हा विधिकोश २०१६ साली प्रकाशित करण्याचा राज्य मराठी विकास संस्थेचा मानस आहे. त्याचबरोबर गेल्या काही वर्षांमध्ये ग्रामीण भागातील लेखकांचे वाढते प्रमाण लक्षात घेता २००६ ते २०१५ या कालावधीतील साहित्यासाठी पुरवणी खंडाची निर्मिती करण्यात येणार आहे, अशी माहिती राज्य मराठी विकास संस्थेने दिली.

या प्रकल्पात ललित साहित्याचा प्रामुख्याने विचार करण्यात आला आहे. या प्रकल्पासाठी सहा हजार पुस्तकांचे वाचन करण्यात आले. या पुस्तकांचा समावेश साहित्यसूचीकोशामध्ये करण्यात येणार आहे. या शब्दकोशाचे काम डॉ. गंगाधर पानतावणे यांच्या संकल्पनेतून १९९६ साली सुरू झाले. डॉ. पानतावणे यांच्या संपादकीय नेतृत्वाखाली डॉ. मधुकर वाकोडे, डॉ. कृष्णा किरवले, डॉ. किसन पाटील, डॉ. अमिताभ, डॉ. शशिकांत सावंत या संपादक मंडळासोबत योगीराज वाघमारे, डॉ. चिंतामण

कांबळे, डॉ. संजीवकुमार सोनवणे, उर्मिला पवार, प्रा. शंकर सखाराम, डॉ. नीळकंठ शेरे, गिरीश पतके या सदस्यांनी काम केले आहे. या प्रकल्पासाठी राज्यभरातून ग्रामीण व दलित साहित्याच्या अभ्यासकांनीही मदत केली आहे.

शब्दकोशाच्या पहिल्या खंडात २५०० शब्दांचा तर दुसऱ्या खंडात १७०० शब्दांचा समावेश आहे. तिसऱ्या खंडातही सुमारे १७०० शब्दांचा समावेश आहे.

पाच लाखाचे आठ लाख

राज्यातील साहित्स संस्थांची आता दिवाळी होणार आहे. ज्या संस्थांना पूर्वी साहित्यविषयक कामासाठी वर्षाला पाच लाख रुपये निधी मिळत असे, त्यांना आता आठ लाख रुपये अनुदान मिळणार आहे.

राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या पुनर्रचनेनंतर झालेल्या बैठकीत अनुदानाच्या मुद्यावर चर्चा झाली. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ, महाराष्ट्र साहित्य परिषद, मुंबई साहित्य संघ, मराठवाडा साहित्य परिषद, विदर्भ साहित्य संघ, कोकण मराठी साहित्य परिषद व दक्षिण साहित्य परिषद या सात संस्थांना पूर्वी विविध कामांसाठी पाच लाख रुपये निधी दरवर्षी दिला जात असे. राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या बैठकीत हा निधी वाढवून देण्याची मागणी करण्यात आली. पाच लाखांचा निधी पुरत नाही, त्यामुळे १५ ते २० लाखांचा निधी देण्यात यावा, अशी मागणी विदर्भ साहित्य संघाकडून करण्यात आली. या संस्था काय काम करतात, या संस्थांना इतका निधी कशासाठी हवा आहे, असा सवाल करत मंडळांच्या अनेक सदस्यांनी निधीवाढीला विरोध दर्शविला. अखेर संस्थांना तीन लाख रुपये वाढ द्यावी असा निर्णय घेण्यात आला.

या निर्णयाविषयी राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष बाबा भांड म्हणाले, राज्यातील सात संस्थांच्या अनुदानात तीन लाख वाढ देण्याचे ठरले असून, तसा प्रस्ताव सरकारकडे मंजुरीसाठी पाठवला आहे. मंडळाचे वार्षिक अंदाजपत्रक दीड कोटीचे आहे. त्यामधून या संस्थांना प्रत्येकी पाच लाख रुपये अनुदान दिले जाते. अनुदान वाढविण्यात येणार असल्याने अंदाजपत्रकातही वाढ करावी लागणार आहे. या निधीची अंदाजपत्रकात तरतूद केल्यास ते दोन कोटीपर्यंत जाण्याची शक्यता आहे.

‘साहित्य अकादमीने आत्मशोध घ्यावा’

गेल्या काही दिवसांपासून देशात दिसणाऱ्या असहिष्णुतेच्या वातावरणाच्या पार्श्वभूमीवर साहित्य अकादमीने आत्मशोध घेऊन मानवतेच्या दृष्टिकोनातून ठोस भूमिका जाहीर करावी, असे आवाहन ४१ लेखकांनी साहित्य अकादमीच्या अध्यक्षांना पाठविलेल पत्रातून केले आहे.

देशातील वाढत्या जातीयवादी घटना, ज्येष्ठ विचारवंतांच्या, लेखकांच्या झालेल्या निर्घृण हत्या यांच्या निषेधार्थ साहित्यिक वर्तुळातून निषेधाचे तीव्र सूर उमटले होते. अनेक ज्येष्ठ साहित्यिकांनी त्यांना मिळालेले अकादमीचे पुरस्कार, पदांचे राजीनामे दिले होते. साहित्यिकांमधील या नाराजीची दखल घेऊन साहित्य अकादमीने २३ ऑक्टोबर रोजी तातडीची बैठक घेतली. त्या बैठकीत सर्व घटनांचा निषेध करत साहित्यिकांना त्यांचे पुरस्कार परत घेण्याचे आवाहनही अकादमीने केले.

प्रकाशकाची हत्या

धर्मनिरपेक्ष पुस्तकांच्या प्रकाशकाची, तसेच दोन ब्लॉग लेखकांची बांगलादेशात हत्या करण्यात आली. बांगलादेशच्या राजधानीचे शहर असलेल्या ढाकातील दोन पब्लिशिंग हाउसेसवर झालेल्या हल्ल्यांत आणखी तीन जण जखमी झाले. ज्या पब्लिशिंग हाउसवर हल्ले झाले, त्या दोन्ही संस्थांनी बांगलादेशी अमेरिकी लेखक अविजित रॉय यांची पुस्तके प्रकाशित केली होती. रॉय यांची गेल्या फेब्रुवारीत हत्या करण्यात आली होती. आतापर्यंत कोणत्याही संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारलेली नाही.

भोर येथे फुले, शाहू, आंबेडकर विचार प्रसार साहित्यसंमेलन

साहित्यिक, विचारवंत, राजकारणी व बुद्धिवादी लोक एकत्र आल्याशिवाय परिवर्तन घडत नाही. प्रत्येक महापुरुष हे त्या त्या काळाचे अपत्य आहेत. त्यांच्या विचारांचे चिंतन संमेलनातून व्हायला हवे, असे मत उत्तम कांबळे यांनी फुले, शाहू, आंबेडकर विचार प्रसार साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून व्यक्त केले.

भोर येथील छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या मैदानावर उभारण्यात आलेल्या संत तुकाराम महाराज साहित्यनगरीत फुले, शाहू, आंबेडकर विचार प्रसार साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन चित्रपट दिग्दर्शक नागराज मंजुळे यांच्या हस्ते झाले. आगामी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्रीपाल सबनीस,

साहित्यिक डॉ. मनोहर जाधव, फर्ग्युसन महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रकाश पवार, मुक्ता दाभोळकर, संमेलनाचे स्वागताध्यक्ष आमदार संग्राम थोपटे, कार्याध्यक्ष डॉ. सुरेश गोरेगावकर, डॉ. रोहिदास जाधव, स्वरूपा थोपटे, नगराध्यक्षा ॲड. जयश्री शिंदे, उपनगराध्यक्ष तानाजी तारू, पुणे मनपाचे उपायुक्त रावसाहेब पवार, आदींसह अनेक साहित्यप्रेमी उपस्थित होते.

यावेळी डॉ. सबनीस यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय पुरस्कार आणि प्राचार्य सुरेश खराते यांना तालुकास्तरीय पुरस्कार देण्यात आला. 'सूर्यफुले' या स्मरणिकेचे आणि कांबळे यांच्या 'संघर्ष ज्याचा त्याचा', 'पावलातून जन्माला येते वाट' आणि 'शेवटून आला माणूस' या तीन पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

कांबळे म्हणाले, ''माणूस एकसंध आहे, हे केवळ शब्दांवरून व शरीरावरून ठरत नाही तर विचारातून ठरते. आरती फिरवून जग स्थिर होते; परंतु डोके फिरवून जग बदलते, याची जाणीव शाहू, फुले, आंबेडकर यांनी करून दिली. सध्याच्या काळात आपल्या सावल्याच आपल्याला डंख मारायला निघाल्या आहेत. यामुळे प्रत्येकाने जागरूकतेने जगायचा काळ आला आहे. लेखकांनी वर्णनाबरोबर वर्तनही करायला हवे. फुले, शाहू व आंबेडकर हे तिघेही महापुरुष असून, त्यांची एकमेकांशी तुलना न करता त्यांनी समाजव्यवस्था बदलण्यासाठी केलेले कार्य लक्षात घेणे गरजेचे आहे.''

मंजुळे यांनी सध्याच्या काळात विचार करणे ही गोष्ट दुर्मिळ झाल्याचे सांगितले.

शाल-श्रीफळाऐवजी चरित्रग्रंथांची भेट

पुणे महापालिकेतर्फे घेण्यात येणाऱ्या सत्कारांच्या आणि पुरस्कारांच्या कार्यक्रमात यापुढे पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ याऐवजी थोर पुरुषांची चरित्रे भेट देण्यात येणार आहेत. अनावश्यक खर्चाला कात्री लावून, महान कार्य करणाऱ्यांचे विचार सर्वांपर्यंत पोहोचविण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती महापौर दत्तात्रय धनकवडे यांनी दिली.

पालिकेच्या पदाधिकाऱ्यांचेही सत्कार शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, पगडी, आणि स्मृतिचिन्ह अशा स्वरूपात केले जातात. परंतु स्मृतिचिन्हाव्यतिरिक्त इतर वस्तूंचा उपयोग होत नसल्याने या वस्तूंवर

होणारा खर्च टाळून, ग्रंथ भेट देण्याचा उपक्रम सुरू केला जाणार आहे.

आत्तापर्यंत लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट उलगडणारे ग्रंथ भेट म्हणून दिले गेले आहेत. आता यापुढे महात्मा जोतीराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा जीवनपट उलगडणारे ग्रंथ भेट दिले जाणार आहेत.

'विवेकानंद हे संस्कृतीचे प्रतीक'

स्वामी विवेकानंद हे केवळ एक नाव नव्हते किंवा ओळखही नव्हती; ते हजार वर्षांच्या भारतीय संस्कृतीचे प्रतीक होते, असे गौरवोद्‌गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वामी विवेकानंदांच्या १२ फुटी ब्राँझ पुतळ्याचे अनावरण करताना काढले.

स्वामी विवेकानंद यांनीच 'एक आशिया' ही संकल्पना मांडली होती. 'आसियान' आणि पूर्व आशिया शिखर परिषदेत याच संकल्पनेवर चर्चा केली जाते. जग सध्या हवामान बदल आणि दहशतवाद या दोन मोठ्या प्रश्नांशी सामना करीत आहे. या दोन्हींशी सामना करताना सत्य आवश्यक आहे. जेव्हा संघर्ष संपेल तेव्हा दहशतवाद संपेल, असे मोदी म्हणाले. मोदी यांनी स्वामी विवेकानंदांच्या पुतळ्याचे उद्‌घाटन केले त्या वेळी मलेशियातील भारतीय वंशाचे सुमारे दोन हजार नागरिक पावसाची पर्वा न करता उपस्थित होते. भारतातील बेल्लूर मठातील भाविकांनी विवेकानंदांचा पूर्णाकृती पुतळा पेटलिंग येथील रामकृष्ण मिशन आश्रमाला भेट दिला आहे. हा पुतळा कोलकाता येथील अनिलकुमार घोष यांनी बनविला आहे.

'स्वामी विवेकानंद हे गुरूच्या शोधात कधीही नव्हते. ते सत्याच्या शोधात होते. त्याचप्रमाणे स्वामी रामकृष्ण परमहंस हेही शिष्याची वाट पाहात नव्हते. सत्याचा शोध हा दोघांच्या एकत्र येण्याचा आधार होता. जनसेवा हीच ईश्वरसेवा. सत्याचा शोध घेताना त्यांनी कधी धर्माचा आधार घेतला नाही. जागतिक तापमानवाढीच्या प्रश्नाकडे लक्ष वेधून मोदी म्हणाले, 'आमची संस्कृती झाडांमध्येही ईश्वर पाहते. आमचे सर्व देव निसर्गाशी संबंधित आहेत. प्राणी, पक्षी आणि वृक्षांच्या आकारात आम्ही त्यांची पूजा करतो. निसर्गाला ओरबाडू नका, असाच याचा अर्थ आहे. 'आज आम्ही उपनिषदांमधून सॅटेलाइटच्या जमान्यापर्यंत पोहोचलो असलो, तरी मानवी मूल्यांचा विकास झाला का, हा खरा प्रश्न आहे. मानवी मूल्यांचा विकास झाला, तरच खऱ्या अर्थाने आपण विवेकानंदांच्या आदर्शांवर चालू शकतो,'

बालकुमारकोशामध्ये ३६५ कथा आणि ३६५ कवितांचा समावेश

वर्षातील ३६५ दिवसांच्या ३६५ गोष्टी... आणि तेवढ्याच कवितासुद्धा! असा नवाकोरा 'बालकुमारकोश' लवकरच तुमच्या दिमतीला हजर होईल. विश्वकोश मंडळाच्या माजी अध्यक्षा या नात्याने भरीव कारकीर्द गाठीशी असणाऱ्या डॉ. विजया वाड बाईंनी निवृत्तीनंतर लगेचच आपल्या मोजक्या 'टीम'ला हाताशी धरून पाच खंडांच्या रूपात हा कोश तयार केला.

दर दिवशी एक याप्रमाणे साडेसातशे निवडक कथा आणि कवितांचा कोशात समावेश केला आहे. शंभर लेखक-कवींनी हा कोश घडविण्यासाठी योगदान दिले आहे.

कोशाच्या संपादक म्हणून स्वत: वाडबाईंसोबत त्यांच्या कन्या व अभिनेत्री निशिगंधा वाड, तसेच आनंद खेडकर, मनीषा कदम व वैशाली कार्लेकर यांनी निरनिराळ्या जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत.

ग्रंथालयेही होणार स्मार्ट

'ग्रंथालयांचे महामंडळ ही संकल्पना चांगली आहे. त्यामुळे वाचकाला हवे असलेले ग्रंथ मिळू शकतील. ग्रंथालयांनी या योजनेस प्रतिसाद द्यावा म्हणून पुणे मराठी ग्रंथालयाचे कार्यवाह पुण्यातील ४७ ग्रंथालयांशी बोलणी करीत आहेत. 'ग्रंथालयांचे महामंडळ' ही कल्पना एका वर्षांत प्रत्यक्षात उतरू शकेल, अशी माहिती श्याम जोशी यांनी दिली.

तुम्ही एखाद्या ग्रंथालयाचे सभासद आहात,तुम्हाला हवे ते पुस्तक त्या ग्रंथालयात नसेल पण तेच पुस्तक शहरातील दुसऱ्या ग्रंथालयात असेल, तर तुम्हाला एकतर त्या ग्रंथालयाचे सभासद व्हावे लागेल किंवा ते पुस्तक विकत तरी घ्यावे लागेल.

ग्रंथालये 'एटीएम'सारख काम करू लागली आणि एकमेकांच्या सभासदांना पुस्तके देऊ लागली तर... आश्चर्य वाटले ना...? ही संकल्पना एका वर्षांत आकारास येऊ शकते.

स्मार्ट सिटीचा बोलबाला होत असताना ग्रंथालयेही आता स्मार्ट होणार आहेत. 'ग्रंथालयांचे महामंडळ' हे साहित्य व्यवहार, वाचन चळवळ वाढवण्यासाठी टाकलेले स्मार्ट पाऊल ठरणार आहे.

राज्यात १२ हजार ग्रंथालये आहेत. या ग्रंथालयांकडे असलेला साहित्याचा ऐवज डोळे दिपवणारा आहे. हा वारसा पुढच्या पिढीकडे जाणे गरजेचे असताना ग्रंथालयांमध्येच तो अडकून पडला आहे. पण वाचतं कोण? असा तक्रारीचा सूर लावला जात असताना ग्रंथालयांमध्ये लोक जातात, हे वास्तव आहे. ग्रंथालयांच्या नियमांमुळे वाचक आणि पुस्तके यामध्ये अंतर निर्माण होते. त्यातूनच हवी असलेली पुस्तके वाचकाला मिळू शकत नाहीत. नेमकी हीच अडचण 'स्वायत्त मराठी विद्यापीठा' ने हेरली आहे. राज्यातील ग्रंथालयांची साखळी केल्याने त्या माध्यमातून वाचकाला हवे असलेले पुस्तक मिळवता येईल ही यामागची संकल्पना आहे. यासाठी श्याम जोशी यांनी पुढाकार घेतला आहे.

श्याम जोशी मूळचे बदलापूरचे. तिथे त्यांनी वाचन चळवळ विस्तारल्यानंतर मराठी स्वायत्त विद्यापीठाची संकल्पना मांडली. ज्येष्ठ समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी या विद्यापीठाचे मानद कुलगुरू आहेत.

जोशी यांनी याबाबत सांगितले की, मी राज्यातील शंभर ग्रंथालयांना भेटी दिल्या. ग्रंथालयांमध्ये हजारो मौल्यवान ग्रंथ पडून असून ग्रंथालये जोडण्यासाठी त्यांचे महामंडळ करणे गरजेचे आहे. ग्रंथ मिळत नाहीत, ही वाचकांची तक्रार असते. त्यामुळे संबंधित ग्रंथालयांमध्ये एखादा ग्रंथ नसेल, तर वाचकाला त्याच सभासद क्रमांकावर शहरातील दुसऱ्या ग्रंथालयातून तो मिळावा; तसेच तो कोणत्याही ग्रंथालयात स्वीकारला जावा, अशी यामागची कल्पना आहे.

इतिहासाचार्य राजवाडे यांचे संशोधन 'ऑनलाइन'

मराठीतून इतिहास, भाषाशास्त्र, व्याकरण अशा बहुविध विषयांवर व्यासंगपूर्ण संशोधन आणि लेखन केलेले ज्येष्ठ इतिहास संशोधक, संस्कृतचे अभ्यासक वि. का. राजवाडे यांचे संशोधनकार्य संकेतस्थळाच्या माध्यमातून वाचकांसाठी खुले केले जाणार आहे. त्यासाठी इतिहासाचार्य वि. का राजवाडे संशोधन मंडळ आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने पुढाकार घेतला आहे.

राजवाडे यांनी मराठ्यांच्या इतिहासासंबंधी संकलित केलेल्या ऐतिहासिक आणि दुर्मिळ अशा एक लाख कागदपत्रांचे 'डिजिटायझेशन'

करण्यात आले आहे.

राजवाडे यांचा जन्म १८६४ मध्ये पुण्यात झाला. पुण्यातच त्यांचे मॅट्रिकचे शिक्षण झाले. मुंबईत एल्फिन्स्टन कॉलेज व पुण्यात डेक्कन कॉलेज येथे त्यांनी महाविद्यालयीन शिक्षण घेतले. न्यू इंग्लिश स्कूलमध्ये ते शिक्षक म्हणून रुजू झाले. अडीच वर्षांनी त्यांनी ही नोकरी सोडली. महाराष्ट्रभर आणि महाराष्ट्राबाहेरही ऐतिहासिक साधनांच्या आणि प्राचीन साहित्याच्या शोधात ते सतत हिंडत राहिले. दऱ्याखोऱ्यातून प्राचीन अवशेष पाहत व कानाकोपऱ्यातून जुनी दफ्तरे गोळा करीत असतानाच, त्यांचे लेखनकार्यही अव्याहतपणे सुरू होते.

या संकेतस्थळाचे उद्घाटन राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते मुंबईत २७ नाव्हेंबर रोजी झाले. या वेळी खासदार सुप्रिया सुळे, शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर, प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष अरुण गुजराथी उपस्थित होते.

राजवाडे यांना इतिहासकार लेखक, वक्ता, संस्कृत व व्याकरणाचे पंडित, भारतीय विवाह संस्थेचा इतिहास, मराठ्यांचा इतिहासावर महाग्रंथ व ऐतिहासिक कागदपत्रांचा गाढा अभ्यास करणारे म्हणून ओळखले जाते. संशोधनाची ही संस्कृती पुढे नेण्यासाठी धुळ्यातील राजवाडे संशोधन मंडळाने दुर्मिळ कागदपत्रांचे 'डिजिटायझेशन' करण्याचा निर्णय घेतला. दीड वर्षांपूर्वी या कामाची सुरुवात झाली होती. उपलब्ध दुर्मिळ कागदांपैकी अनेक कागद जीर्ण झाले होते; पण ते आता पुन्हा वाचता येऊ शकतील, अशी माहिती मंडळाचे सचिव डॉ. सर्जेराव भामरे यांनी दिली.

भाषा धोरणातील महत्त्वाच्या सूचना

पुढील २५ वर्षांत राज्य सरकारने मराठी भाषेसाठी कोणकोणती पावले उचलायला हवीत, यासाठी मराठी भाषा धोरण तयार करण्यात येत आहे.

राज्याच्या भाषा धोरणावर गेल्या चार वर्षांपासून मराठी भाषा सल्लागार समितीने राज्याच्या वेगवेगळ्या भागांतील भाषातज्ज्ञ, लेखक, पत्रकार, अभ्यासकांबरोबर सामान्य नागरिकांच्याही सूचना लक्षात घेऊन आराखडा तयार केला. तो मंजुरीसाठी मुख्यमंत्री कार्यालयाला सोपवला;

पण वाचकांकडून आणखी सूचना येत असल्याने या धोरणाचे लेखन नव्याने करण्याचा निर्णय सरकारने घेतला आणि समितीची पुनर्रचना केली.

या धोरणात साहित्य-कला, न्यायालय, शिक्षण, प्रसार माध्यमे, उद्योग व अर्थ याच्याशी संबंधित नव्या सूचनांचा समावेश केला जात आहे. यासाठी डॉ. सदानंद मोरे यांच्या अध्यक्षतेखाली समितीच्या बैठका झाल्या.

'इंटरनेट' विस्ताराचे भारताचे उद्दिष्ट

जागतिक इंटरनेट व इंटरनेटशी संबंधित (आयओटी) क्षेत्र पुढील पाच वर्षांमध्ये ३०० अब्ज अमेरिकन डॉलरपर्यंत विस्तारणार असून या क्षेत्रात पाच ते सहा टक्के वाटा मिळवण्याचे उद्दिष्ट भारताने बाळगले आहे. केंद्रीय माहिती तंत्रज्ञान व इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे सचिव जे. एस. दीपक यांनी भारतीय उद्योग महासंघातर्फे (सीआयआय) आयोजित राष्ट्रीय आयओटी परिषदेमध्ये अशी माहिती दिली. सध्या इंटरनेटविषयीच्या धोरणासंबंधी चर्चा सुरू आहे. २०२० पर्यंत इंटरनेट क्षेत्र ३०० अब्ज डॉलर्सच्या घरात पोहोचेल. आयओटी तंत्रज्ञानानुसार विविध संगणकीय उपकरणे आपोआप इंटरनेटशी जोडली जातील व त्याद्वारे संबंधित व्यक्तींना डाटाचे आदानप्रदान करता येईल, असेही ते म्हणाले. या परिषदेमध्ये इकोकार्डिओग्राम, थर्मामीटर यांसारख्या वैद्यकीय उपकरणांमधील डाटा इंटरनेटच्या आधारे संबंधित डॉक्टरपर्यंत पोहचवता येत असल्याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले

स्मार्टफोनवर गेम्सचा सर्वाधिक वापर

गेल्या काही वर्षांत देशातील गेमिंग क्षेत्राची व्याप्ती मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. 'नॅसकॉम'च्या अंदाजानुसार देशातील गेमिंग उद्योगाची बाजारपेठ पाच हजार कोटींवर पोचली आहे. स्मार्टफोनचा वापर वाढल्याने गेमिंगला सोन्याचे दिवस आले आहेत. अव्वल क्रमांकाचे ९० गेम्स जागतिक स्तरावरील असल्याने त्यांना टक्कर देताना छोट्या विकसकांची दमछाक होताना दिसते.

काही वर्षांपूर्वी टीव्हीवर व्हिडिओ गेम व कॅसेटद्वारे गेम्स खेळले जात होते. त्यानंतर प्ले स्टेशनचा वापर होऊ लागला. घराघरांत संगणकांची संख्या वाढत गेल्याने कॉम्प्युटर गेम्स खेळले जाऊ लागले. यातून 'गेम

झोन'चा नवीन व्यवसाय उदयास आला होता. मात्र, वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, इंटरनेट जोडणीचे अत्यल्प प्रमाण, गेम्सची मर्यादित संख्या आदी मर्यादांमुळे गेमिंग क्षेत्राचा विस्तार संथगतीने होत होता.

गेल्या काही वर्षांपासून स्मार्टफोन प्रत्येकाच्या हातात आला. यावरही गेमिंग ॲप विकसित करायला सुरवात झाली. काही वर्षांपूर्वीपर्यंत विदेशातील विकसकांवर सर्व मदार होती. २०१० साली गेमिंग ॲप विकसित करणाऱ्या अवघ्या २५ कंपन्या होत्या. सद्य:स्थितीत त्यांची संख्या अडीचशेहून अधिक आहे.

गेमिंग क्षेत्र प्रचंड विस्तारले आहे. प्ले स्टोअर असो किंवा ॲपल मार्केट, आपला गेमिंग ॲप अव्वल क्रमांकावर असावा असे प्रत्येक विकसकाला वाटते; परंतु काही मर्यादांमुळे जागतिक पातळीवर अव्वल क्रमांक मिळविणे तितके सोपे नसते. मोठ्या कंपन्यांच्या तुलनेत छोट्या कंपन्यांना करडी स्पर्धा करावी लागते.

केवळ गुगल व ॲपलवर ॲप्स विकसक (डेव्हलपर) म्हणून नोंदणी करायची अन् आपण तयार केलेले ॲप्स् जगभरातील वापरकर्त्यांना प्ले स्टोअर, आयओएसद्वारे उपलब्ध करून द्यायचे इतकी ही प्रक्रिया सोपी झाली आहे. त्यामुळे स्टार्टअप करू इच्छिणाऱ्यांसाठी गेमिंग क्षेत्र उत्तम पर्याय ठरत आहे.

डॉ. आंबेडकर ग्रंथालय

सिम्बायोसिस संस्थेने उभारलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथालयाचे उद्‌घाटन माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी खासदार रामदास आठवले, सिम्बायोसिसचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शां. ब. मुजुमदार तसेच संस्थेच्या प्रधान संचालिका विद्या येरवडेकर या वेळी उपस्थित होत्या.

'जगातील उत्कृष्ट संविधानामध्ये भारताची घटना गणली जाते. जगाला विकसित करणारी प्रत्येक गोष्ट संविधानात आहे. समता, एकतेचे तत्त्व संविधानाने दिले आहे. जागतिक अर्थव्यवस्थेबाबत डॉ. आंबेडकर यांचे विचार, लेख सुसंगत आहेत. त्यांच्यावर संशोधन करण्याची गरज आहे. ग्रंथालयातून संशोधन, अभ्यास झाल्यास आंबेडकर यांच्या विचारांचा ठेवा आपल्याला मिळेल. त्यासाठी ग्रंथालयाच्या विस्तारीकरणासाठी राज्य सरकार

निश्चित योगदान देईल,' असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

'राज्यघटनेमुळे निर्बळांना बळ मिळाले आहे. राजकीय असमानता दूर होऊन समानता प्रस्थापित झाली आहे. राजकीय समानतेबरोबर कायद्याचे राज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राज्यघटनेमुळे मिळाले आहे,' असे मत माजी राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांनी व्यक्त केले.

स्मार्ट कॅम्पस, स्मार्ट मुख्यमंत्री असा उल्लेख डॉ. मुजुमदारांनी मनोगतात केला. त्या वक्तव्याचा संदर्भ देत 'मुख्यमंत्री स्मार्ट आहे, तर मी देखील स्मार्ट खासदार आहे', अशी टिपण्णी करून रामदास आठवले यांनी चांगलाच हशा पिकवला. आंबेडकर ग्रंथालयाच्या विस्तारीकरणासाठी अतिरिक्त जमीन आणि निधी हवा असल्यास सिम्बायोसिसने सरकारकडे प्रस्ताव द्यावा. त्यासाठी आपण देखील प्रयत्न करू, सरकार निश्चित मदत करेल अशी ग्वाही दिली. त्या वेळी लंडनमधील कार्यक्रमात हातात छत्री घेतल्याने घडलेला किस्सा सध्या व्हॉट्सॲपवरून फिरत आहे त्याबाबतचे स्पष्टीकरणही द्यायला ते विसरले नाहीत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथालयाच्या संचालिका संजीवनी मुजुमदार यांनी स्वागत केले.

'पुलं'चा हस्तलिखित ठेवा आता राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयात!

पु.ल. शैलीतला विनोद आणि सुश्राव्य संगीत यांनी नटलेल्या 'गुळाचा गणपती' या चित्रपटाची संहिता राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाला मिळाली आहे. विशेष हे की ही संहिता पु. ल. देशपांडे यांनी स्वहस्ताक्षरात लिहिली असून जवळपास पासष्ट वर्षांनंतरही ती उत्तम अवस्थेत आहे. १९५३ मध्ये विनायक राजगुरु यांनी त्याची निर्मिती केली होती. राजगुरु यांच्या पत्नी डॉ. सरोजिनी राजगुरु यांनी एनएफएआयचे संचालक प्रकाश मगदूम यांच्या हाती त्याची संहिता सुपूर्द केली. विनायक राजगुरु यांचे भाऊ दिलीप राजगुरू, चित्रपट अभ्यासक डॉ. सतीश जकातदार या वेळी उपस्थित होते.

सबकुछ पुलं!

'गुळाचा गणपती' या चित्रपटाबाबत पु.ल. देशपांडे यांनी विविध भूमिका वठवल्या होत्या. लेखक, दिग्दर्शक, संगीतकार आणि अभिनेतेही

पु.ल. असा हा 'सबकुछ पुलं' चित्रपट होता. यावर पुलंनी स्वत:च 'प्रेक्षकही पुलंच ठरू नयेत म्हणजे झालं!' असा विनोद केला होता. या चित्रपटातली पुलंची वेंधळ्या 'नाऱ्या'ची व्यक्तिरेखा चित्रपट रसिकांनी उचलून धरली. तर नायिकेची 'लीला'ची भूमिका अभिनेत्री चित्रा यांनी निभावली होती. या चित्रपटात पं. भीमसेन जोशी यांनी म्हटलेले 'इंद्रायणी काठी' आणि ज्येष्ठ गायिका आशा भोसले आणि पं. वसंतराव देशपांडे यांनी गायलेली 'इथेच टाका तंबू', 'ही कुणी छेडिली तार' ही गाणी ग. दि. माडगूळकर यांनी लिहिलेली होती.

विश्वकोश मंडळावरील नियुक्त्या नियमबाह्य?

साहित्य-संस्कृती मंडळाच्या नियुक्त्यांचा वाद थंडावण्याआधीच आता विश्वकोश मंडळावरील नियमबाह्य नियुक्त्यांचा वाद समोर आलेला आहे. विशेष म्हणजे, या मंडळावरील नियुक्त्यांसाठी सरकारनेच निर्णय प्रक्रिया तयार केली आणि सरकारनेच ती मोडीत काढली. त्यामुळे निकष, नियम डावलून मंत्र्यांच्या शिफारस यादीतील नावेच या दोन्ही मंडळांवर गेल्याचे सामाजिक कार्यकर्ते अभय कोलारकर यांनी माहिती अधिकारातून मिळवली. यामुळे शिक्षण आणि सांस्कृतिक खात्याचे मंत्री विनोद तावडे पुन्हा वादात अडकले आहेत.

राज्याच्या विश्वकोश मंडळाचे अध्यक्ष दिलीप करंबेळकर यांच्यासह २३ सदस्यांच्या नियुक्त्या शासनाने निश्चित केलेली प्रक्रिया बाजूला सारून करण्यात आल्या आहेत. राज्यपालांच्या आदेशानुसार आणि त्यांच्या नावानेच या नियुक्त्या केल्या जाव्यात, हे स्पष्ट असतानासुद्धा मंत्र्यांनी सर्व प्रक्रिया व प्रस्ताव बाजूला सारून परस्पर नियुक्त्यांचे निर्देश दिले. मराठी भाषा विभागाने अध्यक्षपदासाठी दिलीप करंबळेकर यांच्या नावाचा प्रस्तावच दिलेला नव्हता. डॉ. अच्युत गोडबोले, श्री. द.इनामदार, डॉ. अरुणचंद्र पाठक, डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या नावांची शिफारस मंडळाने केली होती.

विश्वकोश मंडळ आणि मराठी भाषा विभागाने निश्चित केलेल्या प्रक्रियेनुसार सदस्यपदासाठी डॉ. जयंत नारळीकर, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. राजा दीक्षित, सतीश आळेकर, वि.वि. करमरकर, डॉ. वासुदेव मुलाटे, डॉ. हेमचंद्र प्रधान, अविनाश पंडित यांच्यासह आपापल्या क्षेत्रातील इतर तज्ज्ञ व अभ्यासक, संशोधक अशी १४ नावे पूर्णपणे डावलण्यात आली.

नियुक्त्या शिफारशींनुसार करण्यात असल्याचे स्पष्ट होते.

सोळावे कोकण मराठी साहित्य संमेलन

कोकण मराठी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून साहित्यिक, विचारवंत, कार्यकर्त्यांनी वर्तमान परिस्थितीबद्दल विचारप्रवाह मांडले. देशात सध्या असलेल्या वातावरणाबद्दलही निर्भीडपणे चर्चा झाली. भाजप आमदार ॲड. आशिष शेलार हे संमेलनाचे स्वागताध्यक्ष असूनही या व्यासपीठावर अनेक मुद्दे मोकळेपणाने चर्चिले गेले. त्यामुळे कोकण मराठी साहित्य परिषदेचे सोळावे साहित्य संमेलन हा केवळ एक उपचार ठरला नाही.

समारोपाच्या अध्यक्षीय भाषणातून जयंत पवार यांनी मध्यमवर्गाची संवेदनशीलता जागवणे गरजेचे असल्याचा मुद्दा मांडला. 'मागास समाजाच्या चळवळीच्या पाठीशी पूर्वी मध्यम वर्ग उभा होता; मात्र आता जागतिकीकरणामध्ये हा मध्यम वर्ग संपन्न झाला आहे. त्यामुळे हात तुटलेल्या लोकांचा त्याला विसर पडला आहे. साहित्याने ही मानवी करुणा समाजापर्यंत पोहोचवली पाहिजे', असे आवाहन त्यांनी केले. 'कोकणातील पेट्रोकेमिकल प्रकल्प, जैतापूर प्रकल्प यामुळे लहान माणसांचे काय होणार आहे, अशा विषयांबद्दल मध्यम वर्गाला जागे करण्याचे काम साहित्यिकांनी करावे. हे काम सत्ताधाऱ्यांचा रोष पत्करून करावे लागले तरी चालेल', अशीही भूमिका त्यांनी मांडली.

कवी केशवसुतांचे जन्मस्थान असलेल्या कोकणातील मालगुंडपासून 'पुस्तकांचे गाव' या योजनेची सुरुवात करण्याचा सरकारचा मानस असल्याचे पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांनी सांगितले. ही योजना 'कोमसाप'च्या माध्यमातून राज्यभर पोहोचवली जावी, असे त्यांनी सांगितले.

मुंबईतील उड्डाणपुलांचा वापर मराठी भाषेच्या संवर्धनासाठी करावा असे समारोप सोहळ्यात आशिष शेलार यांनी सांगितले. या जागेचा वापर मराठी नाटकाच्या तालमींसाठी आणि पुस्तक विक्री केंद्रांच्या उभारणीसाठी करता येईल असे ते म्हणाले.

संमेलनाच्या सांगता समारोपाचे अध्यक्ष 'पानिपत'कार विश्वास पाटील यांनी हे संमेलन मुंबईत होत असल्याने मुंबईच्या मुद्द्याकडे लक्ष वेधले. मुंबई शहरातील मराठी माणूस हद्दपार होत असल्याबद्दल खंत व्यक्त केली. लेखक-कवींनी वेगवेगळ्या दृष्टिकोनातून या महानगराकडे पाहिले पाहिजे,

असे आवाहन केले.

पुण्यातील कलाकारांचा गौरव

'माऊली... माऊली...' आणि 'शांताबाई...' ही लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचलेली मराठी गाणी, मूळ गायकांच्या आवाजात लाइव्ह ऐकण्याचा योग पुणेकरांना लाभला. निमित्त होते, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त आयोजित नॉनस्टॉप ७५ हिंदी व मराठी गीतांच्या कार्यक्रमाचे.

पवार यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त शहर राष्ट्रवादी तर्फे पुण्यातील कलाकारांचा सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ व्हायोलीन वादक प्रभाकर जोग, संगीतकार अजय-अतुल, शास्त्रीय गायक शौनक अभिषेकी, ज्येष्ठ संगीत वादक रमाकांत परांजपे, हास्यकलाकार सदानंद चांदेकर, मेलेडी मेकर्स ऑर्केस्ट्राचे संस्थापक अशोक सराफ, सनईवादक प्रमोद गायकवाड व शांताबाई फेम संजय लोंढे आदींना या वेळी सन्मानित करण्यात आले.

बालनाट्य संमेलन पहिले

मराठी बालरंगभूमी समृद्ध होण्याची गरज आहे, परंतु त्याकरता तिला सामाजिक आणि शैक्षणिक चळवळीचे स्वरुप आले पाहिजे. व्यवसायापेक्षा व्यक्तिमत्व विकासाचा राजमार्ग चोखाळल्यास रंगभूमीला चांगले दिवस येतील, असे प्रतिपादन पहिल्या अखिल भारतीय मराठी बालनाट्य संमेलनाच्या अध्यक्ष कांचन सोनटक्के यांनी उद्घाटन सोहळ्याप्रसंगी केले.

बालरंगभूमीचा विकास आणि विस्तार होण्यासाठी या चळवळीच्या वेगवेगळ्या उपक्रमांत शालेय विद्यार्थांचा सहभाग वाढायला हवा. बालकलाकार म्हणून, प्रेक्षक म्हणून आणि विद्यार्थी म्हणून नाट्यमाध्यमाचा उपयोग वेगवेगळ्या क्षमता आणि ऊर्जा वाढीस लागण्यासाठी झाला पाहिजे, असे सांगून कांचन सोनटक्के पुढे म्हणाल्या, "मुलांना सुट्टीच्या काळात महिनाभर कशाततरी गुंतवण्याचा उपक्रम म्हणून न बघता बालनाट्याकडे एक संपूर्ण नाट्यानुभव, जीवनानुभव म्हणून पाहिले पाहिजे. नाटक ही केवळ मौजमजेची, वेळ घालवण्याची फुरसतीची गोष्ट न राहता, स्वत: बरोबरच इतरांचे रंजन करणारी, मनोरंजनतून समाजाचे उद्बोधन आणि उत्थान

करणारी ती एक उपचार पद्धती व्हावी.''

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष मोहन जोशी यांनी कांचन सोनटक्के यांच्या कामाचे कौतुक केले. गेली अनेक वर्ष कांचनताई सातत्याने अंध व मूकबधीर कलावंतांकडून कलाकृती करुन घेत आहेत. विद्यार्थ्यांमधली ऊर्जा विधायकरीत्या वळवण्याचे काम त्यांनी अखंडित केले आहे, असे जोशी म्हणाले, ''मी सोलापूरची आहे आणि पहिले बालनाट्य संमेलन सोलापुरमध्ये होत आहे, याचा अभिमान वाटतो. कांचनताईमुळे बालनाट्य संमेलनाचा विस्तार होईल'' असे ९५ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाध्यक्षा फैय्याज यांनी नमूद केले.

'मुलांमधील ऊर्जेला विधायक वळण दिले पाहिजे. ज्याप्रमाणे झाडांच्या मुळांना पाणी घातले की झाड बहरते तसेच मुलांवर रंगभूमीचे संस्कार झाल्यास बालनाट्य संमेलन अधिक जास्त बहरेल' असा विश्वास अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे प्रमुख कार्यवाह दीपक करंजीकर यांनी व्यक्त केला. त्याचप्रमाणे कार्याध्यक्ष विजय साळुंके यांनी 'सरकारने अशा प्रकारच्या कामासाठी यंत्रणा दिली पाहिजे', असे नमूद केले. बाळासाहेब ठाकरे नाट्यनगरी, डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम रंगमंच, ह. दे. प्रशाला शाळेच्या प्रांगणात हा कार्यक्रम झाला. यावेळी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या कोषाध्यक्षा लता नार्वेकर, निमंत्रक समिती प्रमुख भाऊसाहेब भोईर आणि महापौर सुशिला आबुटे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमांचे सूत्रसंचालन उत्तरा मोने व शिवानी जोशी यांनी केले, तर कार्यक्रमाची सांगता रघुनाथ गट्टम नटराज नृत्य विद्यालयातील ४० मुलींच्या कथ्थक नृत्याने झाली.

सोलापूरच्या राजकीय धुरंधरांनी पहिल्या बालनाट्य संमेलनाकडे पाठ फिरवल्याने सत्ताधारी व विरोधीपक्षातल्या तणावाचे सावट संमेलनावर पडले. माजी केंद्रीय गृहमंत्री व संमेलनाचे प्रमुख पाहुणे सुशीलकुमार शिंदे आणि त्यांच्या कन्या प्रणिती शिंदे अनुपस्थित राहिल्या. एवढेच नव्हे तर सोलापूरचे पालकमंत्री विजयकुमार देशमुख, राज्याचे सांस्कृतिक कार्य, संचालक अजय आंबेकर तसेच सोलापूरचे ११ आमदार यांनी संमेलनांकडे पाठ फिरवली. फक्त दोन नगरसेवक संमेलनाकडे फिरकल्याने उपस्थितांनी सांगितले.

★

१९वी आवृत्ती

धिंड

लेखक
शंकर पाटील

किंमत - १४०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.



‘‘म्या दारूला शिवलो न्हाई. शप्पत सांगतो, मी घेतल्याली न्हाई.
उगा इनाकारणी माज्यावर अदावत घेऊ नका.’’
राऊ खोतानं साफ झिडकारलं तशी ती सारी चावडी खालवर झाली.
लोक खदाखदा हसू लागले आणि राऊ खोतच म्हणाला,
‘‘हसून दावू नका. खरं सांगतो. मी घेतल्याली न्हाई.’’
रामभाऊ हसून म्हणाले –
‘‘गड्या, तुझ डोळं सांगत्यात की रं!’’
‘‘अण्णा, डोळं काय सांगत्यात? गपा, उगच गप्प् बसा.’’
‘‘उतरंस्तवर गप् बसावं म्हणतोस व्हय राऊ?’’
‘‘अहो, काय चढलीया काय मला?’’
‘‘अजून चढली न्हाई म्हणतोस?’’
‘‘अहो, त्याचं नावसुदिक घेऊ नगा. शिवल्याला न्हाई म्या त्याला!’’
एक सनदी पुढं झाला आणि मोठ्यानं म्हणाला,
‘‘शिवल्यालं न्हाई, तर मग दडून का बसला होतास?’’
‘‘शेबास! मी काय दडून बसलो होतो काय?’’
‘‘दडला नव्हतास तर मग माळ्यावर काय करत होतास?’’
‘‘माळ्यावर काय करतोय! गडद झोपलो होतो?’’
‘‘मग खाली जागा नव्हती काय?’’
‘‘ते तुम्हाला काय करायचं? आम्ही खाली झोपू न्हाईतर वर झोपू!’’
राऊ असं आडवं बोलला आणि सबंध चावडी पोट धरून हसू लागली.

भालचंद्र नेमाडे यांना फर्ग्युसन गौरव पुरस्कार

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते साहित्यिक भालचंद्र नेमाडे यांना यंदाचा 'फर्ग्युसन गौरव पुरस्कार' जाहीर झाला आहे. संघटनेतर्फे ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. विजय केळकर, पोलिस महासंचालक प्रवीण दीक्षित, दिग्दर्शिका सुमित्रा भावे आणि जलतरणपटू रोहन मोरे यांनाही 'फर्ग्युसन अभिमान' पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. 'द फर्ग्युसोनियन्स' ही कॉलेजच्या माजी विद्यार्थ्यांची संघटना आहे. कार्याध्यक्ष ॲड. विजय सावंत, एअर मार्शल भूषण गोखले (निवृत्त) आणि प्रकाश रेणुसे यांच्या त्रिसदस्य समितीने पुरस्कारार्थींची निवड केली. जानेवारी २०१६ मध्ये या पुरस्कारांचे वितरण होणार आहे.

जयश्री काळे यांना 'बाया कर्वे पुरस्कार'

महर्षी कर्वे शिक्षण संस्थेचा यंदाचा 'बाया कर्वे पुरस्कार' सामाजिक कार्यकर्त्या जयश्री काळे यांना जाहीर झाला आहे. जागृती सेवा संस्थेच्या माध्यमातून त्या गेल्या अनेक वर्षांपासून महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्याचे आणि वाड्यावस्त्यांवरील मुलांना आधार देण्याचे काम करत आहेत.

सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांना कर्वे शिक्षण संस्थेतर्फे या पुरस्काराने सन्मानित केले जाते. सन १९९६ पासून हा पुरस्कार दिला जात आहे. जयश्री काळे यांनी मुंबईतील सिद्धार्थ महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम केले असून, त्यानंतर बँक ऑफ बडोदामध्येही त्या कार्यरत होत्या. सामाजिक कार्य करण्यासाठी त्यांनी १९९८ मध्ये बँकेतून स्वेच्छानिवृत्ती घेतली.

लहान मुले आणि होतकरू महिलांमधील कौशल्ये विकसित करून त्यांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यासाठी आणि महिलांना स्वावलंबी

करण्यासाठी त्यांनी जागृती सेवा संस्थेची स्थापना केली. छोट्या महिला उद्योजिकांनी तयार केलेल्या मालाला बाजारपेठ मिळावी, यासाठी संस्थेतर्फे प्रदर्शन व विक्री मेळाव्यांचेही आयोजन केले जाते. तसेच संस्थेतर्फे मुलींच्या राहण्याची व भोजनाचीही व्यवस्था विनामूल्य केली जाते. या उपक्रमात बारावीपर्यंतच्या मुलींना त्या स्वत: गणित हा विषय शिकवतात. तसेच वस्त्यांमध्ये जाऊन मुलींना विनामूल्य मार्गदर्शनही करतात. भगिनी निवेदिता बँकेच्या अध्यक्षा म्हणूनही त्यांनी सात वर्षे काम केले आहे.

श्रीपाल सबनीस यांना पुरस्कार

फुले, शाहू, आंबेडकर विचार प्रसारक मंडळ, भोर या संस्थेतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर कार्यगौरव पुरस्कार यंदा ज्येष्ठ समीक्षक डॉ. श्रीपाल सबनीस यांना देण्यात आला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंतीनिमित्त फुले, शाहू, आंबेडकर विचार प्रसार साहित्य संमेलन २१ व २२ नोव्हेंबर रोजी श्रीछत्रपती शिवाजी शैक्षणिक संकुल, भोर येथे पार पडले.

आयसीएसएसआर संस्थेचे अध्यक्ष सुखदेव थोरात यांच्या हस्ते हा पुरस्कार दिला गेला.

डॉ. सबनीस यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता या विषयावर डॉक्टरेट केली आहे. महात्मा गांधी, फुले, शाहू, आंबेडकर, आगरकर, न्यायमूर्ती रानडे, स्वामी विवेकानंद यांच्यावर व्याख्याने दिली आहेत.

'कालिदास सन्मान' पुरस्कार

महेश एलकुंचवार यांना मध्यप्रदेश राज्य सरकारचा महाकवी कालिदास सन्मान पुरस्कार (रोख दोन लाख रुपये आणि सन्मानचिन्ह) २३ नाव्हेंबर रोजी उज्जैन येथील कालिदास अकादमीत 'अखिल भारतीय कालिदास सोहळ्या'त प्रदान केला गेला.

अभिजात संगीत, नृत्य, नाटक आणि शिल्पकला या क्षेत्रात उत्तुंग कार्य करणाऱ्या व्यक्तींना हा सन्मान दिला जातो. रंगभूमीवरील भरीव कामगिरीसाठी एलकुंचवार आणि ज्येष्ठ रंगकर्मी मोहन महर्षी यांना हा पुरस्कार दिला जात असल्याचे सरकारने म्हटले आहे. प्रसिद्ध रंगकर्मी विनोद

नागपाल, भानु भारती, हिमानी शिवपुरी आणि पीयुष मिश्रा यांच्या निवड समितीने एलकुंचवार आणि महर्षी यांची निवड केली.

एक प्रयोगशील नाटककार म्हणून एलकुंचवार यांची ओळख आहे. 'वाडा चिरेबंदी', 'सुलतान', होळी', 'यातनाघर', 'पार्टी', 'प्रतिबिंब', 'आत्मकथा', 'भग्न तळ्याकाठी' या त्यांच्या काही गाजलेल्या नाट्यकृती. 'वाडा चिरेबंदी' या नाटकाने भारतीय रंगभूमीला एक नवे परिमाण दिले आहे. हे नाटक दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी यांनी पुनरुज्जीवित केले असून त्याचा शतकमहोत्सवी प्रयोग २२ नोव्हेंबर रोजी विलेपार्ले येथील दीनानाथ नाट्यगृहात झाला. एलकुंचवार यांच्या 'मौनराग', 'त्रिबंध' या ललित गद्याचेही रसिकांनी जोरदार स्वागत केले.

मोहन महर्षी यांचाही सन्मान

राष्ट्रीय नाट्य महाविद्यालयाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यालयाचे संस्थापक इब्राहिम अल्काझी यांच्यासोबत मोहन महर्षी यांनी काम केले. 'एवम् इंद्रजित', 'शुतुरमुर्ग', 'सुनो जनमेजय', 'अंधायुग', 'आषाढका एक दिन', 'जोसेफ का मुकदमा', 'रसोई', 'ऑथेल्लो', 'विद्योत्तमा' आदी महर्षी यांची गाजलेली नाटके आहेत. महर्षी यांनी दूरदर्शन निर्माता म्हणूनही काम पाहिले आहे. राष्ट्रीय नाट्य विद्यालयाच्या अध्यक्षपदाची धुराही त्यांनी सांभाळली होती.

★



चंपी मालीश आणि था..था..था!

लेखक - राजीव तांबे

किंमत - ६०/- रु. । पोस्टेज - ३०/- रु.

२री आवृत्ती

सीज्र

मूळ लेखक
रॉबिन कुक

अनुवाद
डॉ. प्रमोद जोगळेकर

किंमत - ३५०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.



पेशींचे क्लोनिंग करून मानवजातीला ग्रासणाऱ्या पार्किन्सन्ससारख्या आनुवंशिक विकारांवर उपचार करण्याचे तंत्र विकसित करणारा, विलक्षण बुद्धिमत्तेचा शास्त्रज्ञ डॅनियल लॉवेल आणि लोकांच्या भावनांशी खेळून स्वत:चा राजकीय मतलब साधणारा एक महत्त्वाकांक्षी सिनेटर, एकमेकांच्या समोर उभे ठाकतात.

पेचातून सुटका व्हावी म्हणून डॅनियल सिनेटर बटलरचा अनैतिक प्रस्ताव मान्य करून, कोणी कधी न केलेले जनुक उपचार करायला तयार होतो.

उपचारासाठी लागणारे जनुक थेट ख्रिस्ताच्या रक्तापासून मिळवण्याची विलक्षण अट बटलर घालतो आणि त्यातून सुरू होते ती पेच-डावपेचांची जीवघेणी मालिका...

अग्निदिव्य

लेखक

डॉ. कल्याणीरमण बेन्नुरवार

जन्मनाव धनंजय श्रीनिवास बेन्नुरवार, परंतु सारे लेखन कल्याणीरमण या टोपणनावानेच झाले आहे. जन्मगाव नागपूर. शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण मुंबईमध्ये झाले. चाळीस वर्षांच्या सेवेनंतर मुंबई उच्च न्यायालयातून राजपत्रित अधिकारी म्हणून निवृत्त.

बालवयापासूनच अनेक सामाजिक, सांस्कृतिक संस्थांशी संपर्क. पुढे त्याच संस्थांमधून कार्य. ठाणे जिल्ह्यामधील वनवासी क्षेत्रातसुद्धा काही वर्षे काम. सध्या संस्कृतिसंवर्धन प्रतिष्ठान या शालेय विद्यार्थ्यांसाठी काम करणाऱ्या संस्थेत कार्यरत.

सदर संस्थेसाठी पुस्तकांचे लेखन. त्या पुस्तकांच्या हिंदी, मराठी, गुजराथी आणि इंग्रजी भाषांमध्ये अनेक आवृत्त्या निघाल्या. आजवर सुमारे सात लाख प्रतींचे विद्यार्थ्यांमध्ये सशुल्क वाटप झाले आहे. श्रीसंत माधवराव महाराज संस्थान पाटणबोरी, जिल्हा यवतमाळ या परंपरागत व पीठासीन संतांच्या चरित्र ग्रंथास सांप्रदायात संदर्भग्रंथ म्हणून मान्यता मिळाली. अनेक कथा आणि वैचारिक लेख दिवाळी अंकांतून प्रसिद्ध.

सन २००९ मध्ये आलेल्या जिवावरच्या दुखण्याच्या काळात सक्तीने विश्रांती घ्यावी लागली. त्या काळातच प्रदीर्घ चिंतन आणि वाचनाचा परिपाक म्हणून 'अग्निदिव्य' या ऐतिहासिक, राजकीय कादंबरीचे लेखन झाले. किशोरांसाठी लिहिलेल्या शिवचरित्रातील कथांचे पुस्तक प्रकाशनाच्या प्रतीक्षेत आहे. महाराजांच्या चरित्रावर आधारित कादंबरीचे लेखन सुरू आहे. त्याच्या जोडीने समूर्तगम कीर्ती, भूमिकन्या सीता हिची जीवनकहाणी लिहिण्याचे कामसुद्धा सुरू आहे.

नेताजी पालकर - शिवरायांचा सरनौबत. एक दिवस मोगलांना जाऊन मिळतो. मुस्लीम धर्म स्वीकरतो. पुढे वीस-पंचवीस वर्षांनी तो पुन्हा शिवाजी महरांजांकडे परत येतो. महाराज त्याला विधिपूर्वक हिंदूधर्मात घेतात... या अल्पपरिचित व्यक्तिमत्त्वाचा कादंबरीद्वारे घेतलेला विलक्षण वेध

लेखक - कल्याणीरमण बेन्नुरवार

'गोब्राह्मण प्रतिपालक राजाधिराज छत्रपती श्री शिवाजीमहाराज' असा नुसता नामोल्लेख झाला तरी मनाच्या तारा झंकारून उठतात. छत्रपती शिवराय हा विषयच अत्यंत श्रद्धेचा, पराकोटीच्या आदराचा. काही संकुचित मनोवृत्तीच्या हितसंबंधितांनी न कळे काय कारणाने या अलौकिक युगपुरुषाला एका विशिष्ट चौकटीत बांधण्याचा प्रयत्न चालविलेला आहे. वाऱ्याला कोंडण्याचा किंवा उसळत्या, उधाणलेल्या दर्याला मुठीत बांधण्याचा प्रयत्न करण्यासारखेच ते अशक्यप्राय नाही का? आम्हा सर्वांची मनोमन श्रद्धा ही आहे की, कविराय भूषणचे शब्द अक्षरश: सत्य आहेत. आज आपण 'आपण' आहोत ते केवळ त्या अलौकिक महापुरुषामुळे! जर या महाराष्ट्र देशी त्या थोर पुरुषाचा अवतार न होता तर आपण सारे या

परमपावन देवभूमीची महान परंपरा झुगारून, आपल्या महान पूर्वजांचे ऋण ठोकरून देऊन, त्यांना अंधारात चाचपडणारे किडे असे हीन लेखत, मावळतीकडे मोहरा ठेवून बसलो असतो. म्हणूनच प्रभू रामचंद्र, योगेश्वर भगवान श्रीकृष्ण, जगद्गुरू आद्य शंकराचार्य यांच्याच पंक्तीत श्री शिवनृपती आम्हास श्रद्धेय, पूजनीय, अनुकरणीय आणि प्रात:स्मरणीय आहेत.

महाराज त्यांच्या अखेरच्या श्वासापर्यंत जे जे, जसे जसे बोलले-वागले, त्यात कोठेही चूक काढण्यास जागा नाही, ही आमची अव्यभिचारी श्रद्धा. मग त्यांचे छत्रपती संभाजीराजे वा महाराणी सोयराबाईंच्या बाबतचे वर्तन या चुका नव्हेत, तर महापुरुषांच्या जीवनात उद्भवणाऱ्या मानवी जीवनाच्या मर्यादांची अपरिहार्यता आहे, हेच केवळ अधोरेखित करणारे कठोर आणि अपरिहार्य वास्तव आहे.

महाराजांनी ज्यांना जवळ केले, कौल दिला, सलगी दिली, विश्वास दिला त्यांच्या निष्ठा केवळ अविचल, अभंग. त्या निष्ठा ज्या तिडिकेने महाराजांच्या ठायी वाहिल्या होत्या त्याच उत्कटतेने स्वराज्याला वाहिल्या होत्या, अशी सर्वच शिवप्रेमींची धारणा. महाराजांविषयी जे जे मिळत गेले ते ते वाचत असताना एक प्रश्न मात्र मनास कायम टोकरीत राहिला. स्वराज्याचे सरनौबत नेताजी पालकर अफजल वधासाठी निघताना महाराजांनी त्यांच्यावर स्वराज्य निरविले होते; मिर्झाराजांच्या छावणीत आपल्या वंशाचा एकमेव अंकुर ओलीस पाठविताना त्यांच्या हाती सोपविला होता; स्वराज्याच्या सर्व फौजांची दारोमदार त्यांच्या समर्थ खांद्यांवर सोपविली होती; गनिमांच्या गोटात प्रतिशिवाजी म्हणून त्यांचा दरारा होता; **सिंधू सागरापासून वऱ्हाडपर्यंत आणि बागलाण-खानदेशापासून कर्नाटकापर्यंतची भूमी त्यांच्या घोड्यांच्या टापांनी पिंजून काढली होती; असा तिखट हत्याराचा बुद्धिमान मुत्सद्दी रणनवरा, स्वराज्याचा सरनौबत केवळ आणि केवळ मनसबदारी आणि वतनाच्या लोभापायी स्वराज्याशी द्रोह करून महाराजांना सोडून जाईल? असंभव! अविश्वसनीय! अकल्पनीय! पण हे असे झाले होते, ही ऐतिहासिक वस्तुस्थिती आहे. याविषयी प्रचलित इतिहास जे सांगतो ते तसेच आणि तेवढेच सत्य मानायचे म्हटले तर मोठीच अनवस्था.**

महाराजांची माणसाची पारख चुकली? पण ते शक्य आहे? जर नेताजी स्वार्थी हेतूने स्वराज्य सोडून गेले, मरातबाच्या लोभापायी

मुसलमान झाले, हे जर सत्य; तर मग प्रदीर्घ काळ लोटल्यानंतर ते परत का आले? तेसुद्धा याविषयीची महाराजांची मते आणि धोरण ते पुरतेपणी जाणत असताना? त्यांची शामतच कशी झाली? क्षणभर असे गृहीत धरू की, मनात काही भाबडी आशा धरून ते परत आले. पण का? या 'का'ला सयुक्तिक उत्तर सापडत नाही. बरे, ते परत आले, पण महाराजांनी एका स्वार्थी स्वराज्यद्रोह्याला इतक्या सहजपणे कौल कसा दिला? परतताक्षणीच हृदयाशी का धरले? प्रचलित लोकाचाराला छेद देत, शुद्ध करून स्वधर्मात कसे आणि का घेतले? हे आणि असे अनेक प्रश्न मनास कायम छळत राहिले. त्यांची समाधानकारक उत्तरे कधी कुठे गवसलीच नाहीत.

शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरेलिखित शिवचरित्राची न कळत्या वयापासूनच, एखाद्या धार्मिक ग्रंथाप्रमाणेच अनेक पारायणे झाली. हल्ली काही दिवसांपूर्वी ते वाचत असताना एका वाक्याने चित्त वेधून घेतले. 'नेताजी इतक्या सहजपणे निघून गेले, जणू महाराजांनीच त्यांना धाडले.' लख्खकन मनात वीज चमकली. त्या चुटपुटत्या प्रकाशात मनातल्या विचारांना एक नवी दिशा गवसली.

मनी आले, जे प्रश्न आपल्याला अस्वस्थ करीत असतात, कदाचित त्या तशाच प्रश्नांनी शिवशाहिरांना पण छळले असावे. नक्कीच. त्या निस्सीम शिवभक्ताला त्यांची उत्तरे शोधण्याच्या ध्यासाने पछाडले असणार. त्या प्रयत्नांत त्यांना कोठेतरी काहीतरी सापडले असावे. एखादी बारीकशी फट सापडली असेल ज्यामधून त्यांना इतिहासाच्या अंधाऱ्या डोहात काहीतरी अस्पष्टसे, अंधूकसे पण आशादायक दिसले असावे. शिवशाहीर पडले कडवे इतिहासनिष्ठ. ठोस, सबळ, वादातीत पुरावा हातात असल्याशिवाय ते कोणतेही नेमके विधान करणे कालत्रयी शक्य नाही. ठोस, निर्विवाद सत्य आणि वस्तुस्थितीरोचक, रंजक ढंगात लोकांसमोर ठेवून, त्यांची इतिहासासारख्या सर्वसामान्यांच्या दृष्टीने रटाळ विषयात रुची वाढवीत असतानासुद्धा ते कधीच कल्पनाविलासाच्या दुष्टचक्रात गुंतून पडत नाहीत. केवळ जिज्ञासू वाचकाची जिज्ञासा जागी करण्यासाठी त्यांनी हे एक सूचक विधान तेवढे करून ठेवले.

या प्रदीर्घ काळात शिवचरित्राच्या अनेक आवृत्त्या निघाल्या. अनेक अभ्यासकांची अनेक पुस्तके प्रसिद्ध झाली. मा. बाबासाहेबांचे पण अनेक प्रकट कार्यक्रम, मुलाखती झाल्या पण या एका वाक्याव्यतिरिक्त पुढे काही

तपशील नाही. अनेक सिद्धहस्त लेखकांच्या गाजलेल्या ऐतिहासिक कादंबऱ्या पुन्हा वाचून काढल्या पण त्यातही या प्रश्नांचा मागोवा घेतल्याचे आढळले नाही. मा. बाबासाहेबांसारख्या ऋषितुल्य अभ्यासकास जेथे कोणता ठोस पुरावा गवसल्याच्या खुणा दिसत नाहीत, तेथे माझ्यासारख्या सामान्य मशकांच्या पायांना काय चिकटणार; त्यामुळे मग फार जास्त शोधाशोधीची उरस्फोड करीत न बसता, त्या व्यासंगी अभ्यासकाने दिलेल्या सुतावरूनच स्वर्गारोहण सुरू केले. आणि काय आश्चर्य, समोर जणू चित्रपट उलगडावा तशा एकेक घटना मनश्चक्षूंसमोर साकारू लागल्या. कूट प्रश्नांची उत्तरे झपाट्याने मिळू लागली आणि मग मनामध्ये, स्वराज्यनिष्ठ नेताजी पालकरांच्या 'अग्निदिव्या'ची ही कादंबरी साकार होऊ लागली.

या कादंबरीचा पाया ऐतिहासिक वास्तवाचा आहे. नेताजी पालकर स्वराज्याचे सरनौबत होते; स्वराज्यात त्यांचा दर्जा खुद्द महाराजांच्या खालोखाल होता; गनीम त्यांना प्रतिशिवाजी म्हणून वचकून होता; पन्हाळ्यावरील दारुण पराभवानंतर ते महाराजांना-स्वराज्याला सोडून आदिलशाहीच्या मार्गाने मोगलांना जाऊन मिळाले; महाराज आग्र्याहून निसटले आणि कोणतीही संधी न देता औरंगजेबाने त्यांना जेरबंद करून त्याच्या राजधानीत आणले; त्यांनी मुसलमान धर्म पत्करला; बादशहाने तरीसुद्धा त्यांना अफगाणिस्तानात दहा वर्षे दडपून ठेवले; त्यानंतर त्यांना स्वराज्यावर सोडले तेव्हा संधी साधून ते महाराजांकडे परत आले; महाराजांनी त्यांना कौल दिला, शुद्ध करून घेतले. हा एवढा मूळ पाया तेवढा ऐतिहासिक वास्तव. बाकी सारा माझ्या कल्पनाविलासाचा डोलारा. काही महत्त्वाची पात्रे आणि प्रसंग वगळता बाकी माझ्याच कल्पनेतून जन्मलेला. सोईसाठी कदाचित कुठे कालानुक्रम किंचित बदललेला; त्यामुळे अधिक-उणे जे असेल ते माझे.

अनेक ठिकाणी कथानक पसरट झाल्याची, पुनरुक्ती झाल्याची किंवा वैयक्तिक अभिनिवेश व्यक्त होत असल्याची टीका होण्याचा संभव आहे. उदा. धर्मांतराचा प्रसंग, कुलीखानास देण्यात येणारे इस्लामचे धडे, औरंगजेबाची धर्मांध दहशतवाद्याच्या थाटात येणारी वक्तव्ये, शुद्धीकरणासाठी भरलेल्या दोन धर्मसभा, महाराजांची या विषयावरील प्रदीर्घ वक्तव्ये वगैरे वगैरे. जर हे जाणवते तर मग त्याचे संपादन वा पुनर्लेखन पूर्वीच का झाले नाही? याबाबत माझी कैफियत मांडणे आणि ती येथेच मांडणे अगत्याचे आहे.

या देशात जवळपास दीड हजार वर्षे हिंदू आणि मुसलमान शेजारी शेजारी राहतात. असंख्य हिंदूंची मुसलमानांशी केवळ मैत्रीच नाही तर प्रगाढमैत्री आहे. असे असले तरी सामान्यत: हिंदूंस आणि अर्थात मराठी माणसांस इस्लाम संबंधाने फारच थोडे माहीत असते. स्वतंत्रता आंदोलनापासून 'हिंदू-मुस्लीम ऐक्य' साधण्याचे आटोकाट प्रयत्न झाले, अद्याप होत आहेत. पण ज्यांच्याशी आपल्याला ऐक्य साधायचे आहे त्यांची नेमकी श्रद्धास्थाने, धार्मिक शिकवणूक, ध्येय-धोरणे, आकांक्षा, उद्दिष्टे आणि ती साधण्याचे मार्ग काय व कोणते हे जोपर्यंत आपण वास्तवाच्या पातळीवर समजून घेत नाही तोपर्यंत ऐक्याचे प्रयत्न म्हणजे एकतर्फी भाबडेपणा ठरण्याची शक्यताच जास्त आहे. म्हणून त्यांची ओझरती ओळख करून देण्याचा हा प्रयत्न.

औरंगजेबासारखा निरंकुश सर्वसत्ताधारी असो, अगदी अद्ययावत आधुनिक शिक्षण घेतलेला बुद्धिजीवी असो किंवा अशिक्षित शेतकरी, मजूर; प्रत्येक मुसलमान व्यक्ती आपले धार्मिक ध्येय आणि ते साध्य करण्याचे धर्माधिष्ठित मार्ग अगदी नि:संदिग्धपणे जाणत असतो. त्यावर त्यांची जिवापाड श्रद्धा आणि निष्ठा असते. ती उघडपणे व्यक्त करण्यास त्यांना यत्किंचितही संकोच वाटत नाही. हिंदू भाबडेपणाने आपल्याच मनोराज्यात गुंतलेले राहून त्याकडे ध्यान देत नाहीत. ही आत्मतुष्टी वा आत्मग्लानी आजची नाही तर ती ऐतिहासिक काळापासून चालत आलेली आहे, हे वास्तव वाचकांसमोर ठेवण्याची ही क्षीण धडपड.

औरंगजेबाचा संताप शांत करण्यासाठी, त्याच्या संतापाग्नीचा दाह कमी करण्यासाठी दानिशमंदखान जे काही करतो तो केवळ लाळघोटेपणा नव्हे, तर संतापनिवारणाचा आणि संतापाच्या अवस्थेत श्रद्धावानाचे सैतानापासून रक्षण करण्याच्या इस्लामी धार्मिक विधीचा भाग आहे. खानदानी म्हणवून घेणाऱ्या मुसलमानांच्या सहवासात जे आले असतील त्यांना बादशहा आणि त्याचे मानकरी यांच्यातील बेगडी वाटणारे संवाद अतिरंजित नाहीत हे ध्यानात येईल. ज्यांना हैदराबादच्या निजामाच्या कथा माहीत आहेत आणि तो परस्पर खर्च भागविण्याच्या ज्या युक्त्या वापरत असे, ते तंत्र कसे वंशपरंपरा चालत आलेले आहे ते ध्यानात येईल.

शिवाजीमहाराजांनी नेताजींना शुद्ध करून घेतले हे एका वाक्यात सांगताना सहज आणि सोपे वाटते; पण खरेच ते तसे होते का? शक्यच

२री आवृत्ती

क्रोमोझोम् - 6



मूळ लेखक
रॉबिन कुक

अनुवाद
वैशाली जोशी

किंमत - ४९५/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.

गुन्हेगारी विश्वातील कुप्रसिद्ध खतरनाक गुंड कार्लो फ्रॅन्कोनी याचा गोळ्या घालून खून करण्यात येतो आणि शवविच्छेदन होण्यापूर्वीच शहराच्या मुख्य शवागारातून त्याचा मृतदेह हातोहात नाहीसा केला जातो. या खळबळजनक घटनांमुळे पोलीस खाते चक्रावून गेले, तरी शवागारांतील निष्णात गुन्हेगारी रोगनिदानतज्ज्ञ, डॉ. जॅक स्टेपल्टनचे कुतूहल मात्र वेगळ्याच दिशेने जागृत होते. काही काळातच पाण्यात तरंगताना सापडलेला एक मृतदेह वैद्यकीय तपासणीसाठी शवविच्छेदनाच्या टेबलावर येतो. मृतदेहाचे हरवलेले डोके, हात-पाय यापेक्षादेखील त्याच्या छिन्नविच्छिन्न केलेल्या यकृतामुळे डॉ. जॅकची उत्सुकता अधिकच डिवचली जाते. तो मृतदेह हरवलेल्या फ्रॅन्कोनीचाच आहे, याची जॅक आपली सहाय्यक डॉ. लॉरी मॉन्टगोमेरी हिच्या मदतीने ओळख पटवतो. परंतु ओळख पटूनदेखील त्याचा रहस्यमय गुंता उलगडायला काहीच उपयोग होत नाही. कार्लो फ्रॅन्कोनीची हत्या कोणी केली? ज्याने खून केला त्यानेच तो मृतदेह शवागारातून पळवून छिन्नविच्छिन्न केला असेल का? याचे कारण काय?... या रहस्याचा मागोवा घेता घेता जॅक आणि लॉरी विषुववृत्तावरील आफ्रिकेच्या दुर्गम जंगलात पोचतात. प्रचलित आधुनिक तंत्रज्ञानापेक्षाही अधिक विकसित शस्त्रक्रियांच्या सहाय्याने रूढवैद्यकीय नैतिक संकेत व मूल्यांना पायदळी तुडवणारा एक अभद्र व्यापारी कट तिथे शिजतोय, असं त्यांना आढळतं. हा व्यापारी कट कोणता? याचे बळी कोण?... अतिशय रोमांचकारी, वेगाने घडत जाणाऱ्या नाट्यपूर्ण भयानक घटनांमुळे क्रोमोझोम्-६ ही कादंबरी अतिशय आकर्षक झाली आहे. ही कादंबरी वाचल्यानंतर यात वर्णन केलेल्या वैद्यकीय शक्यता अगदी नजीकच्या काळातही खऱ्या ठरू शकतील, याची भीषण जाणीव होते. डॉ. रॉबिन कुक यांच्या वैशिष्ट्यपूर्ण लेखणीने हे सारे अवकाश लीलया पेलले आहे.

नाही. महाराजांनी सांगितले आणि सर्वांनी 'जी हुजूर' म्हणून स्वीकारले असे झाले का? किंवा आपल्या छत्रपतिपदाच्या अधिकाराचा फायदा उठवीत महाराजांनी ते सर्वांना मान्य करण्यास भाग पाडले का? दोन्हींचे उत्तर नकारार्थीच. महाराज जरी राजा होते तरी इंग्रजीत ज्याला 'टायरंट' म्हणून संबोधतात तसे जुलमी सत्ताधारी नव्हते. त्यांचा तो पिंड नव्हता. होता होईतो सामंजस्याने, सहमतीने निर्णय करण्याकडे त्यांचा कल असे. ते जसे कुशल सेनानी होते तसेच प्रभावी वक्ते आणि कुशल वादपटू होते. समंजस असले तरी बोटचेपे नव्हते, तर कठोर प्रशासक होते. त्यांचे निर्णय धाडसी असले, तरी एककल्लीपणे हटवादीपणे घेतलेले नसत. त्यांच्या या निर्णयामागे नेमका काय विचार होता, त्या विचाराची पूर्वपीठिका काय, आणि केवढे प्रदीर्घ चिंतन होते, वगैरे सारे समोर येणे अगत्याचे नाही का? मोगल राजवटीत काश्मीर खोरे इस्लाममय झाले. पुढे राजा रणजितसिंहाने काश्मीर जिंकले. त्याच्या पश्चात काश्मिरात डोगरा राजवट आली. काश्मीरच्या महाराजांना वाटले, आपल्या धर्मातून बाहेर गेलेल्या प्रजेस पुन्हा हिंदू करून घ्यावे. (तसे वास्तवात घडते तर आजचे कित्येक प्रश्न निर्माण होण्याआधीच मिटले असते) प्रजासुद्धा स्वगृही परतण्यास उत्सुक होती. पण तसे होणे भारतमातेच्या प्राक्तनी नव्हते. राजधानी श्रीनगरमधील ब्राह्मण ऐन थंडीत झेलमच्या पात्रात गळाभर पाण्यात उभे राहिले आणि त्यांनी राजाला धमकी दिली, 'आपला हा हेका सोड, अन्यथा आम्ही जलसमाधी घेऊ आणि ब्रह्महत्येचे पातक तुझ्या माथी लागेल.' स्पष्ट विचारांची बैठक नसलेल्या राजाने शरणागती पत्करली. असा पेच कोणी महाराजांसमोर उभा केलाच नसेल का? पण महाराजांची घडण एका वेगळ्याच मुशीत झालेली होती. ते भावुक असले, तरी भाबडे नव्हते. गोब्राह्मण प्रतिपालक असले, तरी उगीच लाड चालवून घेणारे नव्हते. त्यांचा नीर-क्षीर विवेक सदैव सजग असे. हा त्यांचा वेगळेपणा जनमनावर ठसवायचा आहे; त्यामुळेच काहीशा पुनरुक्तीचा दोष पत्करून हे भाग विस्तारपूर्वक घेतले आहेत.

प्रत्येक धार्मिक मुसलमान सर्वसामान्यत: आपल्या धर्मातील पारिभाषिक संज्ञा, धार्मिक विधी, मंत्र ज्याला ते साधारणत: दुवा असे म्हणतात, सुन्नत, अर्कान वगैरे मुसलमानेतरांसमोर उघड करण्यास, त्यावर चर्चा करण्यास अत्यंत नाखूश असतात. माझी धार्मिक आणि राजकीय मते माहीत असून, मुसलमान मित्रांशी माझे अतिशय घनिष्ठ आणि जिव्हाळ्याचे संबंध आहेत;

त्यामुळे ज्या ज्या ठिकाणी मला गरज पडली तेव्हा त्यांनी मला अगदी आनंदाने सहकार्य केले. या बाबी सविस्तर समजावून सांगितल्या. एवढेच नव्हे, तर उच्चारात चूक होऊ नये म्हणून प्रत्येक शब्द देवनागरी आणि रोमनमध्ये लिहून दिला. वस्तुत: ते सारे अत्यंत कर्मठ परंपरावादी धर्मनिष्ठ आहेत. पण माझ्यावरील लोभापायी त्यांनी हे सहकार्य विनापर्दा दिले. या माहितीचा उपयोग कधीही विपर्यस्तपणे, विकृतपणे वा गैरहेतूने होणार नाही हा त्यांचा विश्वास आहे. यासाठी मी महम्मद शफी, शकील अहमद आणि अब्दुल मुनाफ यांचा ऋणी आहे.

एखाद्या किरकोळ संदर्भासाठी लिखाणाच्या गाड्याला खीळ पडे. ही अडचण निघाल्याशिवाय पुढे सरणे शक्य होत नसे. अशा प्रसंगी अनेकांनी मदत पुरविली. हवे असलेले संदर्भ उपलब्ध करून दिले. सर्वांचे मन:पूर्वक आभार! नावांचा उल्लेख करण्याच्या फंदात न पडणेच उत्तम. नेमकी अत्यंत महत्त्वाची नावे राहून जायची आणि अकारण अनवस्था.

कल्पनाविलास असे जरी म्हटले तरी अनेक पुस्तकांमधून अनेक संदर्भ घ्यावे लागतात. उदाहरणच द्यायचे तर प्रायश्चित्त प्रकरणात आप्पा दांडेकरांनी करून ठेवलेल्या व्यासंगाची फार मोलाची मदत झाली. अशा अनेक पुस्तकांची लंबीचवडी यादी पुस्तकाच्या शेवटी देऊन आपण मोठा व्यासंग केल्याचा आव आणणे स्वभावात बसणारे नाही. अमुक एक संदर्भ वा तपशील नेमका कुठून आला आहे, जाणकार जाणतातच. येरांसमोर नसते प्रदर्शन कशाला?

अनेक वर्षे मनात रुंजी घालणारा विषय असा अचानक शंका-समाधान करून श्री रामरायांच्या कृपेने शब्दबद्ध झाला. मी 'स्वान्त: सुखाय' केलेल्या लेखनाचे मूल्यमापन आता दर्दी, चोखंदळ, रसिक वाचकांहाती.

नेताजी पालकरांचे शुद्धीकरण

महाराजांच्या हुकमाप्रमाणे नेताजी राहत असलेल्या बंगलीच्या आवारातच एक गवताची झोपडी बांधण्यात आली. तिसरा प्रहर सुरू होत असतानाच नेताजी त्या झोपडीत राहण्यास गेले. त्या झोपडीत केवळ घोंगडी व धौतवस्त्र टाकून पेंढ्याची एक शय्या तयार करण्यात आली होती. पाण्याचा खुजा व फुलपात्र ठेवण्यासाठी एक तिवई आणि दिव्याची ठाणवई

याव्यतिरिक्त काही सामान नव्हते. दुपारच्या भोजनापूर्वीच त्यांचे क्षौर उरकले गेले. त्यांचा पोशाख उतरून केवळ कंबरेला एक पंचा आणि खांद्यावर पांघरण्यासाठी एक पंचा असा पेहराव त्यांना दिला गेला. दुपारचे जेवणसुद्धा अगदी साधे व पथ्यकर देण्यात आले. रोजच्यासारखा बहिर्जी त्यांच्यासोबत जेवला नाही. तो केवळ समाचार घेण्यासाठी समोर उभा होता. सहज बोलावे तसा तो बोलला–

''सरकार, आता ह्ये पूजा सुद्दीकरन व्हयीतोवर ह्ये असं बामनावानी सादं ज्येवन ज्येवायचं आन त्ये बी फकस्त दोपारी. येकल्यानंच. रातच्याला पेलाभर गाईचं दूद प्यायाचं; बास. ज्येवनं झाली का त्या झोपडीत ऱ्हायास जायाचं हाय तुमास्नी. सरकार, आता हुकूम द्येवा. आपला बंदोबस्त आता सूर्याजी पिसाळ ठिवतील. आमाला गड उतरून कामगिरीवर जान्याचा हुकूम झालाया. गनिमाच्या हालचाली सुरू हायती. आपुन त्येच्या शेपटावर पाय दिला हाई. तवा त्यो चवताळलेल्या जनावरागत येनार. त्येची बित्तंबातमी म्हाराजांस कळली पायजे. चाकराला आता हितं रेंगाळून चालनार न्हाई. आपला ह्यो सोहळा बघनं आमच्यासारक्याला कसं शक्य वावं? पोरीचं लगीन हुबं करावं पर तिच्या लगनाची मंगलाष्टकं मातर आई-बापांनी ऐकायची न्हाई असा रिवाज. आमचं तसंच म्हनायचं. लहान त्वांडी मोटा घास घ्येतला, मापी करा. पर चिंता करू नगासा, समदं गोमटंच व्हईल. तुमचा बारदाना आनवन्याच्या खटपटीला म्हाराज हाईती. म्हाराजांचा मनसुबा खाली जायचा न्हाई.''

नेताजीचे जेवण आटोपले. बहिर्जीने त्यांच्या पायावर डोके ठेवून नमस्कार केला. नेताजीने त्याला कडकडून मिठी मारली. दोघांचे डोळे पाझरत होते. जड अंत:करणाने बहिर्जी निरोप घेऊन गेला.

काही वेळाने सूर्याजीने येऊन वर्दी दिली. त्याने मोठ्या आदराने त्यांचा मुक्काम झोपडीत हलविला. दिवेलागणीपूर्वी टोळशास्त्र्यांचे दोन विद्यार्थी येऊन प्रायश्चित्त व शुद्धीकरणाचा तपशील विस्ताराने समजावून गेले. नेताजींच्या शुद्धीकरणास आता सुरुवात झाली होती.

शुद्धीकरणाचा तिथीनिश्चय झाला आणि महाराजांची सारी यंत्रणा झडझडून कामाला लागली. गडागडांवर आणि ठाण्यांवर आवतणे पाठवायची होती. विद्वान ब्राह्मणांनाच नव्हे तर रयतेलासुद्धा आमंत्रणे

धाडायची होती. निमंत्रणपत्रांचे आणि फर्मानांचे तर्जुमे महाराजांनी स्वत: बाळाजी आवजींना सांगून मनाजोगते लिहवून घेतले. निमंत्रितांच्या याद्या त्यांनी जातीनिशी तपासल्या. जणू पोटच्या पोरीचे लगीन निघावे असा महाराजांचा उत्साह नुसता ओसंडून वाहत होता. कार्यक्रमाच्या बारीकसारीक तपशिलाच्या सूचना ते जातीनिशी देत होते. कार्यक्रमाची भव्य आखणी अन् महाराजांचा ओसंडणारा उत्साह पाहून बाळाजी आवजींना राहावले नाही. तिसरे प्रहरी सदर बसली असताना अखेर त्यांनी विचारलेच–

''महाराज, नेताजीरावांच्या शुद्धीकरणाचा एवढा बडेजाव? एवढा महोत्सव? पूर्वी बजाजी नाईकांचे शुद्धीकरण झाले तेव्हा काही इतका बडेजाव केल्याचे ऐकिवात नाही. मग या खेपेस एवढा उत्सव तो का?''

मोरोपंतांनी पण विषय निघाल्याबरोबर संधी साधून घेतली–

''एवढ्या मोठ्या समारंभास खर्चसुद्धा मोठाच येणार. माझा अंदाज तर सांगतो की, राजघराण्यात आजवर झालेल्या कोणत्याही लग्नसमारंभाच्या कित्येक पटींनी खर्च होईल. किंबहुना राज्याभिषेकासाठी केलेल्या खर्चाच्या खालोखाल या कार्यक्रमाच्या खर्चाचा आकडा जाईल.'' अनाजी दत्तो हळूच पुटपुटले.

''असं म्हंता? अबब! अवं येवड्या पैक्यात तर अवघा योक किला नव्यानं बांदुन हुईल. काय?''

येसाजी कंक आश्चर्य व्यक्त करीत म्हणाले–

''बडेजाव जरा अधिकच होतोय एवढे बरीक खरे. मोगलांची नवी स्वारी समोर दिसत असताना वास्तविक अशा खर्चांना आळा हवा.''

महाराज मंद हसले. त्यात थोडी गमतीची, काहीशी थट्टेची छटा होती. तशीच किंचित विषादाचीही किनार होती.

''मोरोपंत, अनाजी, आमचा कट्टा शत्रू आलमगीर बादशहा आम्हास जेवढा ओळखून आहे, तेवढे आमच्याच तालमीत तयार झालेले आमचे मुत्सद्दी कारभारी व रणधुरंधर ओळखीत नाहीत हे स्वराज्याचे दुर्दैव आणि आमच्या काळजीचे मोठे कारण आहे. मंडळी, नेताजीकाकांचे आम्ही असेच काही करू, सर्व परंपरा मोडून त्यांना पुन्हा हिंदू धर्मात घेऊ हा संशय मनी धरूनच त्याने इतकी वर्षे त्यांना दख्खनचा सोडाच, पण हिंदू माणसाचा, संस्कृतीचा वारासुद्धा लागू दिला नव्हता. एवढा मोठा काळ लोटल्यावर नेताजीकाका इस्लाममध्ये पूर्ण मुरले असावेत, मोगली ऐशआरामाला

चटावले असावेत आणि आम्हीसुद्धा त्यांचा नाद सोडून देऊन त्यांना विसरलो असू असे त्याला खात्रीलायकपणे वाटले तेव्हाच अगदी निरुपाय झाला म्हणूनच त्याने नेताजीकाकांना दख्खनमध्ये सोडले. असे असताना आमच्या कृतीचे वर्म आणि मर्म आम्हाला आमच्याच माणसांना उलगडून सांगावे लागते.

''आता आमचे मेहुणे, बजाजी नाईकांचे शुद्धीकरण करून घेतले तेव्हा आमची ताकद तोकडी होती. परकीय सत्ताधाऱ्यांनाच काय पण आमच्या स्वजनांना आणि रयतेलासुद्धा आमची पुरेशी ओळख नव्हती; त्यामुळे त्या शुद्धीकरणाची म्हणावी तशी दखल घेतली गेली नाही, जनमनावर त्याचा परिणाम झाला नाही; त्याचे पुन्हा कोठे अनुकरण झाले नाही. आता आम्ही मस्तकी छत्र धरिले आहे. हिंदूंचे स्वतंत्र आणि सार्वभौम सिंहासन निर्माण केले आहे. दक्षिण दिग्विजय केला आहे. गनिमांच्याच काय स्वकीय विरोधकांच्या मनी धाक उत्पन्न केला आहे. प्रत्येक हिंदुमात्र फक्त लुटण्यासाठी, लुबाडण्यासाठी, बाटवण्यासाठीच उत्पन्न झाला आहे, अशी धारणा घेऊन बसलेल्या परकीय सत्ताधाऱ्यांच्या डोळ्यांत आम्हाला झणझणीत अंजन घालायचे आहे. एकदा हिंदू बाटवला की, संपले, त्याला परधर्मात राखण्याचे काम हिंदूच नेटाने करतात ही समजूत आम्हाला निपटून काढायची आहे. हिंदू पुन्हा स्वधर्मात येऊ शकतो, आला पाहिजे हे आलम दुनियेला पटवून देणे आम्हाला गरजेचे वाटते. गावोगावी, क्षेत्रांच्या ठिकाणी शुद्धीकरणांचे अनुकरण झाले पाहिजे. घडवून आणले पाहिजे. असे घडले तरच अत्याचारी बाटवाबाटवीस खीळ बसेल. सर्रास परधर्मात जाणारे लोंढे आम्हास थोपवता येतील. स्वधर्मात परतणाऱ्यांचे लोंढे वाढू लागले तर ही परकी कीड या पुण्यभूमीमधून उखडून दूर फेकण्यास विलंब लागणार नाही. आमच्या माता-पितरांनी आणि आम्ही पाहिलेल्या स्वराज्याचे स्वप्न ते हेच आहे. हीच वैदिक हिंदू धर्माची पुनर्स्थापना आहे.

''मंडळी, व्यक्तिगत स्तोम वाढवण्यासाठी, स्वत:चे मोठेपण मिरवण्यासाठी किंवा आमच्या वा आईसाहेबांच्या हौसेखातर काही आम्ही राज्याभिषेकाचा एवढा घाट घातला नव्हता हे तर तुम्ही जाणताच. त्या उत्सवाला जो संदर्भ, तोच किंबहुना त्यापेक्षा कांकणभर वरचढसंदर्भ या शुद्धीकरणाच्या सोहळ्याला आहे. नेताजीकाकांचे निमित्त एवढेच.

''बाळाजी आवजी, या शुद्धीकरणाचे सविस्तर वर्णन करणारी वार्तापत्रे

खुद्द आलमगिरापर्यंत जातील याची नीट तजवीज करा. आदिलशहा आणि कुतुबशहांच्या हाती ती जाऊ देत. गनिमांच्या प्रत्येक सुभेदारास, ठाणेदारास ती मिळू देत. जंजिऱ्याचा सिद्दी, मुंबईचे टोपीकर, वसई आणि गोव्याचे फिरंगी, इतकेच नव्हे तर प्रत्येक काझी, पाद्री, परधर्माचा प्रचार-प्रसार करणाऱ्यापर्यंत पोहोचू देत. म्हणजे मग ते बाटवाबाटवी करताना यापुढे दहादा विचार करतील.''

भारावून गेलेले बाळाजी हळूच म्हणाले–

''महाराजांच्या प्रत्येक कृतीमागे केवढा मोठा अर्थ भरलेला असतो! तिला केवढा व्यापक संदर्भ असतो! केवढी ही व्यापक दूरदृष्टी! केवढी अलौकिक प्रज्ञा! म्हणूनच मग रयत त्यांना अवतारी पुरुष समजते.''

''पुरे, पुरे. ही काही आमचे कौतुक करून घेण्याची घडी नव्हे. हजार कामे पडली आहेत. निष्कारण गप्पाटप्पा आता पुरेत.'

मंगळवार उजाडला. सकाळी गडाचे दरवाजे उघडल्यापासूनच गडावर माणसांची रीघ लागली. सरदार-दरकदार, मुत्सद्दी, गडकरी, याशिवाय मोठ्या प्रमाणावर रयतसुद्धा हा सोहळा पाहण्यास लोटली होती. गावोगावचे व क्षेत्रोक्षेत्रीचे ब्राह्मणसुद्धा मोठ्या प्रमाणावर गोळा झाले होते. काही उत्सुकतेपोटी, केवळ काय-कसे घडते ते पाहण्यास. काही महाराजांवरील प्रगाढश्रद्धेपोटी, काही दक्षिणेच्या अभिलाषेने, तर कित्येकजण हा 'भ्रष्टाकारी पाखंड' रोखण्यासाठी मुद्दाम गडावर आले होते.

तंबू, डेरे, राहुट्या, शामियाने, मंडप वगैरे उभारून सर्व अभ्यागतांची सोय केली होती. मोठमोठ्या पाकशाळांमधून भोजनाची सोय होती. ब्राह्मणांसाठी सोवळ्याची स्वतंत्र व्यवस्था होती. गडावर एवढी गर्दी झाली असली तरी कोठेही भोंगळपणाला थारा नव्हता. चौकी पहाऱ्यात ढिलाई नव्हती. रयतेला मुक्तद्वार असले, तरी टवाळांना बरोबर चाप लावला जात होता. महाद्वारावरच्या हवालदाराला पाणी पिण्याससुद्धा उसंत नव्हती. येणाऱ्या गर्दीत कोणी परका नजरबाज घुसू नये म्हणून डोळ्यांत तेल घालून लक्ष पुरविले जात होते. किल्लेदार सूर्याजी पिसाळ भल्या पहाटे घोड्यावर स्वार झाले होते; ते थेट सांजवेपावेतो पायउतार झाले नाहीत. या एवढ्या काळापुरती सकाळ-दुपार-सायंकाळ मुजऱ्याच्या रिवाजातून त्यांना महाराजांनी सूट दिली होती. रिवाजापेक्षा अभ्यागतांची सोय आणि गडाची

२री आवृत्ती

परिशोध

मूळ लेखक
एस्. एल्. भैरप्पा

अनुवाद
उमा कुलकर्णी

किंमत - २२०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.



मरणाचा अर्थ समजेपर्यंत जीवन समजत नाही. केवळ जन्मणं त्यासाठी पुरेसं नाही. मरून जन्माला आलं पाहिजे. त्यानंतरच जीवनाचा खरा अर्थ समजतो. तीन वेळा मरायचा प्रयत्न केला, तरी विशिष्ट प्रकारचाच अनुभव आला. शुद्ध गेल्यासारखं - डोक्यात पाणी भरल्यासारखं - श्वास कोंडून जीव गुदमरत असतानाही पाण्याबाहेर यायला जमू नये, तसं. चढायला धडपडत असताना कुणीतरी पुन्हा गर्तेत लोटून द्यावं, तसं. भोवताली काळपट हिरवेपणा भरून राहावा...
खोल बुडत जावं...
खरंय् हे. मरण समजल्याशिवाय जीवनाची किंमत समजत नाही. मला असा अनुभव कधीच आला नाही. आत्महत्या करावी इतकं उत्कट दु:खही आयुष्यात कधी जाणवलं नाही. मग मला जीवनाची किंमत ठाऊक आहे काय? ठाऊक आहे, असं म्हणता येईल काय? माझं चिंतन कशा प्रकारे चालतं? साहित्य वाचणं - ते 'क्लासिक' आहे, याची काळजी घेत! पुस्तकं विकत घेणं, संध्याकाळच्या थंड सुखद हवेत फिरून येणं... उत्तम कॉफीचे घुटके घेत साहित्यातील पात्रांवर आणि प्रसंगांवर चिंतन करणं, प्रत्यक्ष आयुष्यात शक्यतो कुणालाही न दुखवता जगत राहणं!
जीवन म्हणजे एवढंच? अंहं...
एक जीवघेणा संघर्ष... चिरंतन परिशोध...

सुरक्षा यांना महाराजांच्या लेखी जास्त महत्त्व होते.

होळीच्या माळावर हिरव्या पोरक्याचा भला मोठा मांडव घालण्यात आला होता. मांडवाच्या मध्यभागी धार्मिक विधींसाठी बरीच मोठी जागा गोमयाने सारवून सिद्ध करण्यात आली होती. त्या जागेच्या बरोबर मधोमध सुशोभित यज्ञकुंड तयार केले गेले होते. पताका, तोरणे, गुढ्या आणि ध्वज लावून मंडप उत्तम रीतीने सजविला होता. यज्ञवेदीच्या पूर्वेकडील अंगास ब्रह्मवृंदाच्या बसण्याची व्यवस्था करण्यात आली होती. पश्चिमेच्या अंगास मानकरी व राणीवशातील स्त्रियांची सोय होती. अन्य दोन्ही बाजू रयतेसाठी खुल्या होत्या. इकडे कार्यक्रमाच्या व्यवस्थांची धामधूम उडाली असतानाच 'पाखंड' मोडून काढण्यासाठी आलेल्या मंडळींच्या कारवाया गडावर पाय ठेवल्या क्षणापासून पूर्ण ताकदीनिशी सुरू झाल्या होत्या. किल्लेदाराच्या तुकडीचे त्यांच्यावर पूर्ण लक्ष होते; परंतु जोपर्यंत त्यांच्याकडून कोणताही उपसर्ग होत नाही तोपर्यंत त्यांना अटकाव न करण्याच्या किल्लेदाराच्या सैनिकांना सूचना होत्या. मध्यान्हीच्या सुमारास ब्राह्मणांचा एक मोठा जमाव तावातावाने शास्त्रीमंडळाच्या मुक्कामी पोहोचला. मंडळी भोजनासाठी निघाली होती. ते निवासाच्या पायऱ्या उतरत असतानाच जमाव त्यांची वाट अडवून उभा ठाकला. हडकुळ्या शरीरयष्टीचा एक वयोवृद्ध ब्राह्मण जमावाचे नेतृत्व करीत होता. संतापाने तांबडेलाल झालेले डोळे गरगरा फिरवीत ते वृद्ध शास्त्रीमंडळास उद्देशून म्हणाले–

''काय हो, आपणापैकी टोळशास्त्री ते कोण? अहो, गडावर हा जो काही अनाचार चालला आहे त्यास आपण पैठणच्या धर्मसभेचे प्रतिनिधी म्हणून मान्यता दिली आहे, हे सत्य आहे काय? अन् अशा प्रकारचा परस्परव्यवहार करण्याचा तुम्हास अधिकार तो काय? का पैठणच्या धर्मपीठाने आपणास खास परवानापत्र देऊन या अव्यापारेषु व्यापारात सहभागी होण्यास धाडले आहे?''

त्या ब्राह्मणाचे अत्यंत उद्धट आणि मनामध्ये क्षोभ उत्पन्न करणारे भाषण ऐकूनसुद्धा अत्यंत शांतपणे टोळशास्त्री म्हणाले–

''मला तरी गडावर कोणत्याही प्रकारचा अनाचार चालू असल्याचे दिसत नाही आहे. कोणत्याही अनाचारास मी व्यक्तिश:सुद्धा कधी संमती देणार नाही; तर मग धर्मसभेचा प्रतिनिधी म्हणून मान्यता देण्याचा प्रश्नच नाही. आपण नेमके कशासंबंधाने बोलत आहात ते स्पष्ट केल्यास बरे होईल.''

''वेड पांघरून संभाविताचा आव आणण्याचे ढोंग पुरे झाले. हेच ते, एका यवनास म्हणे हिंदू धर्मात परत घेण्याचा अनैतिक खटाटोप सुरू आहे आणि त्यासाठी हे एवढे अवडंबर माजविले गेले आहे. रयतेच्या घामाचा राजकोषात जमा झालेला पैसा त्यासाठी उधळला जात आहे.''

''सनातन वैदिक धर्माचा हा असा अपमान आम्ही कदापि खपवून घेणार नाही.''

''या भ्रष्टाचारास आम्ही प्राणपणाने विरोध करू. जर कोणी हा अनाचार असाच चालू ठेवण्याचा हट्ट धरणार असेल तर त्या भ्रष्टाकारासाठी उभारलेल्या मांडवातच आम्ही आमचा कपाळमोक्ष करून घेऊन, जीव देऊ. या ब्रह्महत्येचे पातक स्वत:स ब्राह्मण प्रतिपालक म्हणवून मिरविणाऱ्या तुमच्या राजाच्या माथी बसेल, याची याद राखून ठेवा.''

शास्त्रीमंडळी शांतपणे त्यांचा क्रोध पाहत होती. समोरून कोणतेच प्रत्युत्तर येत नाही किंवा साधी प्रतिक्रियासुद्धा प्रकट होत नाही हे पाहून काही वेळाने गदारोळ शांत झाला. पण संतापाने फणफणलेला तो घोळका त्यांची वाट अडवून तसाच उभा होता. मग टोळशास्त्री एक पाऊल पुढे होऊन हात जोडून ब्राह्मणांना सामोरे जात म्हणाले–

''भूदेव, आपण समाजपुरुषाचे उत्तमांग, मस्तक. आपल्यासारिख्या सुज्ञांनी असा आततायीपणा करणे शोभनीय नाही. क्रुद्ध जनांचा जमाव जमा करून घेऊन असा वितंडवाद करण्याचा ग्राम्यपणा आपणासारख्यांस शोभत नाही. मध्यान्ह झाली आहे. ब्राह्मण भोजनाच्या पंगती वाढून तयार आहेत. अन्नब्रह्माचा अपमान होऊ देऊ नका. शांत व्हा. प्रथम जठराग्नीस आहुती देऊन त्याससुद्धा शांत करा. या विषयावर आपण सुयोग्य प्रकारे सभा घेऊन, यथास्थित चर्चा करू. तुम्हा सर्वांचे ऐकून घेतले जाईल, मात्र शिष्टाचारास अनुसरून बोलले जाणार असेल तरच; तर्काला धरून व्यक्त होणाऱ्या प्रत्येक शंकेचे निरसन केले जाईल. असे या कार्याचा अध्वर्यू म्हणून मी आपणास वचन देत आहे. सभेचे स्थळ, काळादी तपशील आपणास विदित होतील. निश्चिंत राहावे. प्रथम भोजन करून घ्यावे.''

ब्राह्मणांचा तो घोळका अखेर परत फिरला. महाराज दरबारातून परत येताच टोळशास्त्र्यांनी ढेरेशास्त्री व चित्रावशास्त्र्यांना सोबत घेऊन महाराजांची भेट घेतली आणि घडलेला प्रकार त्यांच्या कानी घातला. ब्राह्मणांची ही टोकाची धारणा पाहून महाराज उदास झाले. चर्चेअंती त्यांनी निर्णय घेतला

की, बुधवारी, म्हणजे लगेच दुसऱ्याच दिवशी आणि शुद्धीच्या आदल्या दिवशी समारंभासाठी उभारण्यात आलेल्या मांडवातच धर्मसभा भरवायची. महाराजांनी आग्रह धरला की, या सभेत नेहमीच्या प्रथेप्रमाणे केवळ ब्राह्मणच नव्हे तर सर्व जातींच्या मंडळीस सहभागी करून घ्यावे. शुद्धीकरणाचे महत्त्व सर्वसामान्यांच्या मनात बिंबविणे अगत्याचे असल्याने शास्त्रीमंडळाने कोणतीही खळखळ न करता महाराजांच्या योजनेस पुष्टी दिली. त्याच बैठकीत किल्लेदार सूर्याजी पिसाळास बोलावून बुधवारी प्रात:काळी भरणाऱ्या विशेष धर्मसभेची दवंडी देण्याची आज्ञा दिली.

शुद्धीकरणास विरोध करणारी ब्राह्मण मंडळी मुकाट्याने परत फिरली खरी, परंतु ती शांत बसली नाहीत. गडावर आलेल्या अठरापगड लोकांच्या गर्दीत त्यांनी या विषयाची राळ उडविण्यास सुरुवात केली. त्यांचा आक्रमक पवित्रा आणि भडक कोटिक्रम, तसेच तथाकथित धर्मरक्षणासाठी प्राणार्पण करण्याच्या फुशारक्यांनी येर रयत भेदरून गेली. या विरोधकांनी धर्माचा ऱ्हास, भ्रष्टाचार, कलियुगाचा अंत, प्रलय, सर्वनाश वगैरेंचा असा काही बागुलबुवा उभा केला की, सांगता सोय नाही. पुराणातील आणि स्मृतींमधील संदर्भहीन उतारेच्या उतारे उद्धृत करून चालविलेली तर्कटे ऐकून मुळातच द्विधा मन:स्थितीत असणाऱ्या ब्राह्मणांची आणि मराठ्यांची मते विरोधी पक्षीयांकडे झुकू लागली. रात्री उशिरापर्यंत त्यांनी फार मोठा समुदाय आपल्या पक्षाकडे वळवून घेण्यात यश मिळविले.

कोणा माथेफिरू दांडगटाकडून कोणास काही उपसर्ग होऊ नये किंवा निवासस्थानावर कोणता अतिप्रसंग होऊ नये याची यथायोग्य काळजी घेण्याची सूचना टोळशास्त्र्यांनी पहाऱ्यावरील शिलेदारांना न विसरता दिली.

होळीच्या माळावर उभारलेला विस्तीर्ण मंडप पहाटेपासूनच खचाखच गर्दीने भरून गेला. लोक मोठ्या आवाजात तावातावाने आपसांत चर्चा करीत असल्याने मांडवात एकच कोलाहल भरून राहिला होता. त्यातच कोणी एखादा अधिक-उणा शब्द काढलाच तर गरम डोक्याची मंडळी हमरीतुमरीवर येत होती. क्वचित कुठे एक-दोन ठिकाणी धक्काबुक्कीचा प्रसंगसुद्धा आला. लोकांना आवरता आवरता मावळ्यांच्या अगदी नाकीनऊ आले. जसजशी सभेची वेळ जवळ येऊ लागली तसतशी अस्वस्थता वाढू

लागली. गलका वाढत गेला. ब्राह्मणांचा एक गट तर अगदी हातघाईवरच आला. अखेर हंबीरराव जातीनिशी मंडपात हजर झाले आणि कधी सूचना, तर कधी दरडावणी करू लागले तेव्हा कुठे जमाव आटोक्यात आला.

मात्र प्रक्षुब्ध झालेला तो ब्राह्मणांचा गट कोणालाच जुमानेनासा झाला, तेव्हा मोरोपंत पेशवे आणि त्र्यंबक सोनदेवांना हस्तक्षेप करून त्यांना समज देणे भाग पडले. तर फारच चवताळलेल्या एक-दोघांना चौदावे रत्न दाखवून ताळ्यावर आणावे लागले.

घटका भरली आणि मांडवाबाहेर नौबत दुमदुमली. तुताऱ्या निनादल्या. महाराजांच्या आगमनाच्या ललकाऱ्या उठल्या. निरव शांतता पसरली. दमदार पावले टाकत महाराजांनी मांडवात प्रवेश केला. सस्मित चर्येवर धीरगंभीर अन् पूर्ण आत्मविश्वासाचे भाव होते. त्यांच्या मागोमाग शास्त्रीमंडळी प्रवेशली. त्यांच्या गंभीर चेहऱ्यांवर काळजी स्पष्ट दिसत होती. महाराजांच्या साध्याशाच मसनदीशेजारी शास्त्रीमंडळासाठी एका तक्तपोसावर उच्चासनाची सोय केली होती. साऱ्या सभेने महाराजांना उत्थापन दिले. महाराज आणि शास्त्रीमंडळ आपापल्या स्थानी बसल्यानंतरच सभा बसली. महाराजांची करारी नजर चौफेर फिरली आणि अद्याप चुळबुळ करणाऱ्या ब्राह्मणांच्या घोळक्यावर स्थिर झाली. त्या नजरेतील धाक त्यांना जाणवल्याशिवाय राहिला नाही. त्यांची चुळबुळ स्तब्ध झाली. महाराजांनी निराजीरावजींना नजरेनेच इशारा केला. मुजरा घालीत ते सामोरे आले. महाराजांना संमुख होऊन बोलू लागले–

"महाराज, मनामध्ये काही हेतू धरून नेताजीराव पालकर गनिमाकडे गेले. परंतु दगा करून, आपण आग्र्याहून प्रयाण करताच आलमगिराने त्यांस अटक केली. दिल्लीत नेऊन आदबखान्यात डांबले. इतकेच नव्हे तर अतोनात छळ मांडला. छळ करून बादशहा आपल्याला जीवे मारल्याशिवाय राहणार नाही व त्यामुळे मनातील हेतू साध्य होणार नाही असे जाणून, कार्यपूर्तीसाठी जीव जगवणे अगत्याचे म्हणून, गनिमी काव्याचा भाग असे म्हणून त्यांनी म्लेंच्छ धर्म स्वीकारला. तरी त्यांच्या मनी स्वधर्म व स्वराज्य यांच्याप्रति निष्ठा आणि श्रद्धा कायम धगधगत राहिली. संधी मिळताच बादशहाच्या कचाट्यातून त्यांनी सुटका करून घेतली आणि ते स्वराज्यात स्वामींच्या पायांशी पावते झाले. स्वधर्म आणि स्वराज्याची सेवा करण्याची त्यांची ऊर्मी प्रखर तेजाने जिवंत आहे असे जाणून स्वामींनी त्यांना अनुकूल

कौल दिला आणि धर्मसभेकडून त्यांना शुद्ध करून घेऊन, स्वधर्मात परत आणण्यास मान्यता मिळवली. त्या धर्मसभेच्या निर्णयाप्रमाणे उदईक याच स्थळी नेताजीरावांच्या प्रायश्चित्तपूर्वक शुद्धीकरणाचा विधी होणार आहे. त्यासाठी मुद्दाम आमंत्रणे देऊन रायगडी जनलोक व खाशे मंडळींस पाचारिले आहे. आमंत्रित ब्रह्मवृंदांपैकी काहींना धर्मसभेचा हा निर्णय मान्य नाही. या शुद्धीकरणास त्यांचा सख्त विरोध आहे. हे शुद्धीकरण शास्त्रास असंमत, परिणामी पाखंड माजवणारे असून, ते तत्काळ रद्द करावे अशी त्यांची मागणी आहे. सनातन वैदिक धर्माच्या पावित्र्य रक्षणासाठी त्यांची ही भूमिका असल्याचा दावा ते करीत आहेत.

''विरोधी मत धारण करणाऱ्यांचे आक्षेप ऐकून घेऊन त्यांस आपली भूमिका विशद करून सांगणे आणि त्यांच्या मागणीचा सांगोपांग विचार होऊन योग्य निर्णय व्हावा या कारणे स्वामींनी प्रस्तुत विशाल धर्मसभेचे आयोजन केले आहे. तरी विरोधी मत धारण करणाऱ्या ब्रह्मवृंदास पूर्वपक्ष करण्यास स्वामींची अनुमती असावी.''

''नेताजीरावांच्या प्रायश्चित्तपूर्वक शुद्धीकरणाचा निर्णय हा वैदिक संस्कृती, आर्य सनातन वैदिक हिंदू धर्माच्या अभिवृद्धी आणि संरक्षणासाठीच घेतला गेला आहे. तरीसुद्धा केवळ अज्ञानामुळे ज्यांचा या कृतीस आक्षेप आहे किंवा पोकळ आणि मिथ्या धर्माभिमानाचा आश्रय करून जे प्रत्यक्ष धर्महिताच्याच कृतीस विरोध करीत आहेत किंवा विरोधकांना साहाय्यभूत होणारी भूमिका घेत आहेत त्या समाजाचे अध्वर्यू म्हणवणाऱ्या विद्वान ब्रह्मवृंदास त्यांचा पक्ष मांडण्यास पूर्ण अनुमती आहे. रयतेच्या आणि धर्माच्या हिताचा असला, तरी केवळ दंडशक्तीच्या जोरावर आम्हास रयतेवर कोणताही निर्णय लादावयाचा नाही. मात्र मांडण्यात येणारा तर्क धर्मग्रंथ आणि शास्त्रांच्या आधारेच असावा. पोकळ परंपरा वा रूढींचे अवडंबर माजवणारा नसावा, हे प्रत्येक उपस्थिताने नीट ध्यानी घ्यावे. सभेच्या शिष्टाचारांचा भंग वा बेअदबीचा मुलाहिजा राखला जाणार नाही याचीसुद्धा प्रत्येकाने जाणीव ठेवावी.''

महाराजांचे बोलणे संपले आणि त्यासरशी अनेक ब्राह्मण एकदम उठून बोलू लागले. त्या बोलण्याने एकच मोठा कोलाहल उडाला. एकाचेही बोलणे धड ऐकू येईना. मुत्सद्दी, मंत्रिमंडळ आणि शास्त्रीमंडळ महाराजांकडे टकामका पाहू लागले. महाराजांनी तो गोंगाट काही वेळ तसाच चालू दिला.

मग मात्र त्यांनी आपला हात उंच उभारून शांत राहण्याची इशारत केली. हळूहळू गलबला शांत झाला. सभामंडपाच्या ज्या भागात कोलाहल करणाऱ्या त्या ब्राह्मणांचा गट बसला होता, तेथे आपली करडी नजर रोखून महाराज बोलू लागले–

''ब्राह्मणहो, आपले म्हणणे ऐकून घेण्यासाठी, आमची भूमिका समजावून सांगण्यासाठी, चर्चा करण्यासाठी ही सभा भरवण्यात आली आहे. गोंगाट आणि गलबला म्हणजे आपले म्हणणे मांडणे नव्हे किंवा चर्चा करणे नव्हे. आपणात जे प्रमुख असतील, शास्त्रवेत्ते वा वैदिक विद्वान असतील त्यांनी सर्वांच्या वतीने थोडक्यात शास्त्राधारे जे म्हणणे असेल ते मांडावे. ऐसा गलबला ही धर्मसभेची रीत नव्हे. हे ऐसेच चालणार असेल तर आपणाकडे पूर्वपक्ष नाही असे जाहीर करून सभा बरखास्त करण्यात येईल.''

काही वेळ आपसांत कुजबुज झाली. नेत्रपल्लवींचे इशारे झाले. खाणाखुणा झाल्या. मग काही मंडळी एका वृद्ध द्विजवराकडे उठून जाऊन त्यांना काही विनवणी करती झाली. त्यांनी मानेनेच होकार दिला. कपाळी शिवगंध, अंगी भस्माचे पट्टे, गळ्यात, मनगटावर, दंडात रुद्राक्ष माळा, शास्त्री असल्याची खूण प्रकट करणारी मस्तकी शालजोडी गुंडाळलेली, पावित्र्याचे आणि विद्वत्तेचे तेज मुखावर झळकत असलेले, शांत-धीरगंभीर मुद्रेचे ते वयोवृद्ध ब्राह्मण उठून उभे राहिले. शास्त्रीमंडळींस आणि महाराजांस त्यांनी विनम्रपणे नमस्कार केला. मधाने भरलेल्या कास्यपात्राप्रमाणे त्यांचा आवाज अत्यंत शुद्ध आणि कणीदार, श्रवणीय होता, शुद्ध काशाच्या घंटेप्रमाणे नादमय होता.

''भो राजन, अइ विद्वांस: श्रेष्ठा: धर्म सागर पारावार परिणा: सकळ भूमण्डळ मण्डणी कृता: वैतण्डिक गण्डस्थळ खण्डनैकहरया: श्रूयताम् तावत्...''

महाराजांच्या मागे अदबीने उभे असलेले कवींद्र परमानंद हळूच त्यांच्या कानी पुटपुटले–

''महाराज, गणेशशास्त्री जांभेकर-कुळकर्णी, वेदान्त वागिश, वय्याकरणी, अद्वैत वेदान्ताचे गाढे अधिकारी, काशी क्षेत्री अध्ययन करून शास्त्रीपद प्राप्त केले. खान्देशातून आलेत. हल्ली मुक्काम श्रीक्षेत्र कोल्हापूर...''

महाराज हलकेच उद्‌गारले–

''अरे वा! एवढे गाढे विद्वान आणि त्यांचा समाचार अद्याप आमचेकडून घेतला गेला नाही? पंत तुम्ही स्वत: ध्यानी ठेवा आणि आम्हाकडून त्यांचा परामर्श घेतला गेल्याशिवाय ते गड उतरणार नाहीत इकडे लक्ष द्या.''

''जी. आज्ञा.''

शुद्ध, सुंदर, ओघवत्या संस्कृतात गणेशशास्त्र्यांनी पूर्वपक्ष मांडला. महाराजांनी सहेतुक टोळशास्त्र्यांकडे नजर टाकली. मान लववून शास्त्रीबुवांनी प्रतिसाद दिला आणि उपरणे झटकत उत्तर देण्यासाठी ते उभे राहिले. ते काही बोलण्यास सुरुवात करणार एवढ्यात डोक्याला भले मोठे मुंडासे बांधलेला, मोठमोठ्या गालमिश्या राखलेला प्रौढ वयाचा एक दणकट गडी कंबरेची भली मोठी तलवार सावरीत उभा राहिला. जागेवरूनच महाराजांना मुजरा घालून आपल्या ढाल्या आवाजात तो म्हणाला–

''मुजरा मायबाप, आमी पवन मावळातल्या बहिरोबाच्या वाडीचं पाटील हावो जी. म्हाराज, ह्ये बामन देव जे काय बोलले त्ये कानास्नी लय ग्वाड वाटलं ह्ये खरं, पर इमानानं सांगावं तर तेतला योक सबुद बी आमा अडान्यांच्या टकुऱ्यात न्हाई शिरला. आमचं राजं गोबामन परतिपालक हाईती आनि जवा त्ये देवा-धरमासाटी कायबाय गोमटं करू म्हन्तात त ही बामनच त्येंना इरोद कराया हुबी ठाकत्यात. आता आमच्या राजाला त्येंचा इरोद कशापाई हाय, त्येंचं म्हननं तरी काय हाय, त्ये जरा आमालाबी समजू द्यात की. का फकस्त आपली बामनंच येक त्येंना की दुसरी द्येवाला उमगनाऱ्या भासत कायबाय बोलनार आन आमी रयत त्येंना नंदीबैलावानी मुंडासं हालवीत ऐकनार. आता ही काय धरम सबा की काय म्हन्तासा तीत आमालाबी आवतन देऊन बोलिवलासा त मग कोनाचं काय म्हननं हाय त्ये जरा आमालाबी उमगू देवा की. मंग आमाला पटलं त व्हय आन नाय पटलं त नाय म्हन्ता येईल. काय मंडळी, म्या म्हन्तो ते बरुबर हाय का न्हाई?''

'खरं हाय, बरुबर हाय, आमालाबी समजलं पायजेल.' अशा अर्थाचे आवाज रयतेतून मोठ्या प्रमाणावर उमटू लागले. मानकऱ्यांनी पण पाटीलबुवांना पाठिंबा दर्शविणाऱ्या खाणाखुणा केल्या. गोंधळून गेलेल्या टोळशास्त्र्यांनी महाराजांकडे पाहिले. मंद हसून महाराजांनी त्यांना खाली बसण्याचा संकेत दिला आणि हात उंचावत गलका रोखला. सारे शांत झाल्यावर महाराज म्हणाले–

१२वी आवृत्ती

पर्व

मूळ लेखक
एस्. एल्. भैरप्पा

अनुवाद
उमा कुलकर्णी

किंमत - ४८०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.



व्यासरचित महाभारतातील आभाळाएवढ्या उंचीची पात्रे; परंतु सगळ्यांचे पाय मातीचे.अवघी जीवनमूल्ये कसोटीला लावणारे समरप्रसंग. संघर्ष. प्रत्येकाचे व्यक्तिमत्त्व वेगळे. प्रत्येकाच्या प्रेरणा वेगळ्या. प्रत्येकाचे प्राक्तनही वेगळे. त्याचबरोबर अनेक चमत्कार; दैवी शाप; दैवी वर. मानवी पातळीपेक्षा वेगळ्या पातळीवर जाणारे कथानक. कर्नाटकमधील अग्रगण्य कादंबरीकार तत्त्वचिंतक डॉ.एस्.एल्. भैरप्पा यांनी या चमत्कारांच्या, शापांच्या आणि वरदानांच्या भरभक्कम पडद्याआड लपलेल्या माणसांचा शोध घेतला.
आधुनिक मानववंशशास्त्रीय, समाजशास्त्रीय, संकल्पनांच्या प्रकाशझोतात महाभारतातल्या व्यक्तिरेखांच्या वर्तनाची संगती लावली. त्यामुळेच पर्व ही महाभारताची एक विलक्षण प्रत्ययकारी अनुभूती देणारी कलाकृती ठरली. तशीच खळबळजनकही. त्या महाकादंबरीचा हा रसपूर्ण मराठी अनुवाद. सहजसुंदर.

‘‘भूदेव, एका अतिमहत्त्वाच्या आणि नजीकच्या ज्ञात भूतकाळात न झालेल्या अशा एका महत्त्वाच्या धर्मनिर्णयावर चर्चा करण्यासाठी आणि त्या अनुषंगाने येरांच्या मनात उभ्या राहणाऱ्या शंका निवारण्यासाठी ही धर्मसभा भरवली गेली आहे. एरवी धर्मसभेत विद्वज्जन देव वाणीत पूर्वपक्ष - उत्तरपक्ष करितात, परंतु भूदेव, आजच्या या धर्मसभेत देववाणी न जाणणाऱ्या रयतेचा मोठ्या संख्येने सहभाग आहे. अत्यंत महत्त्वाच्या आणि नाजूक प्रश्नावर काय चर्चा होते आणि कशा प्रकारे काय निर्णय होतो ये विषयी विद्वानांइतुके, आम्हाइतुके येरांससुद्धा स्वारस्य आहे. तेव्हा आपण आत्ता आपले म्हणणे जे देववाणीत मांडलेत तेच सर्वांस समजेल अशा प्रकारे प्राकृतात अर्थात मऱ्हाठीमध्ये मांडावे आणि त्यास शास्त्रीबोवा आपण उत्तरसुद्धा प्राकृतातच द्यावे, अशी आमची सूचना आहे. सूचना यासाठी की, धर्मसभेत धर्माज्ञा दिल्या जाव्यात, राजाज्ञा देण्याचा प्रसंग कोणी येऊ देवो नये.’’

कोणी काही प्रतिक्रिया देण्यापूर्वीच एक प्रौढ ब्राह्मण ताडकन उठून उभा राहिला. घाईघाईत कसाबसा नमस्कार करून उतावीळपणे म्हणाला–

‘‘धर्मचर्चेतील शूद्रांस काय समजत्ये? शास्त्रे कशाशी खातात हे तरी त्यांस ठावकी आहे काय? धर्मचर्चेत शूद्रांचा सहभाग म्हणजे तर भ्रष्टाकाराचा कळसच झाला म्हणायचे. ते काही नाही, धर्मसभा म्हटल्यावर धर्मसभा; तिच्या रीतीनेच चालली पाहिजे. वाटल्यास धर्मसभेचे निर्णय शूद्रांस प्राकृतात सांगावेत...’’

महाराजांची अत्यंत जळजळीत दृष्टी त्याच्यावर स्थिर झाली, त्याबरोबर त्याचे पुढचे शब्द घशातच अडकले. आसपास बसलेल्या लोकांनी हात ओढून त्याला बसते केले. रयतेमधूनसुद्धा काही दांडगे उठून हातवारे करीत तावातावाने काहीबाही बोलू लागले. मावळ्यांनी त्यांना आवरले. थोड्या वेळाने सारे स्थिरस्थावर झाले. मात्र इथे-तिथे थोडी कुणकुण, थोडी कुजबुज होत राहिली. गणेशशास्त्री पुन्हा उठून उभे राहिले. त्यांनी कुजबुज करणाऱ्यांना हाताने थोपवून शांत केले. महाराजांना उद्देशून अत्यंत सौम्य स्वरात ते म्हणाले–

‘‘राजन, अशा नाजूक अन् संवेदनशील समस्येचा विचार करीत असता समाजाच्या सर्व स्तरांचा त्यात सहभाग असावा या दृष्टीने आपली सूचना अगदी रास्त आहे. हे जरी खरे असले तरी शास्त्राधारित तत्त्वचर्चेमध्ये काही तांत्रिक आणि पारिभाषिक शब्दांचा वापर अनिवार्य असतो. तद्वतच आपल्या

मुद्द्याच्या पुष्ट्यर्थ द्यावी लागणारी उद्धृते आणि उद्धरणे संस्कृतातच द्यावी लागतात; त्यामुळेच हे राजन, धर्मचर्चेत संस्कृत भाषेचा वापर श्रेयस्कर असतो. तद्वतच अन्य प्रांतांच्या, प्रदेशांच्या प्राकृत बोली भिन्न असतात. तेव्हा आसेतू हिमाचल सर्व ब्रह्मवृंदांस व तत्त्ववेत्त्यांस आकलन होणारी संस्कृत हीच ज्ञानभाषा आणि संपर्कभाषा म्हणून अनादी काळापासून मान्यता पावली आहे. म्हणून मग धर्मचर्चा स्वाभाविकच संस्कृतातून केली जाते. दुसरे असे की, सर्वसामान्य रयतेचा सहभाग असणारी धर्मसभा आजवर माझ्या तरी पाहण्यात नाही. या कारणे मी स्वाभाविक आणि प्रचलित सभारीतीस अनुसरून पूर्वपक्ष संस्कृतात मांडला आहे.''

''गणेशशास्त्री, आपले म्हणणे रास्त असले, तरी सांप्रतची धर्मसभा मराठीतच चालावी असा आमचा आग्रह आहे. पारिभाषिक शब्द व उद्धृते तर संस्कृतात येणारच, त्यास उपाय नाही. कारण सारी शास्त्रे, सारे ज्ञान संस्कृतातच आहे. हजारो वर्षांपासून चालत आलेला तो अखंड प्रवाह आहे. तरी आमचा आग्रह आहे की, जसे जमेल तसे त्यांचासुद्धा मराठीत अनुवाद करून निरूपण व्हावे, ज्यायोगे संस्कृत न जाणणाऱ्यास काही थोडे पदरी पडेल.''

''हे राजन, प्रवचन वा कीर्तन केल्याप्रमाणे अगदीच प्राथमिक पातळीवर जाऊन धर्मचर्चा करणे तर शक्य नाही. तरीसुद्धा हे प्रजाहितदक्ष राजयोग्या, मी मजकडून होता होईतो सहज ग्राह्य होईल असे प्रतिपादन करण्याचा प्रयत्न करितो मात्र येरांनीसुद्धा मला समजून घेण्याचा प्रयत्न करावा. कधी कोणता मुद्दा फारच क्लिष्ट वाटल्यास, कोणा अधिकाऱ्याने शंका जरूर उपस्थित करावी, मी अधिक सोपे करून सांगण्याचा यत्न करीन; परंतु हे राजन, त्यास मर्यादा असतील तद्वतच या प्रक्रियेस वेळ अधिक लागेल.''

'व्हय. व्हय. चालंल. चालंल. अवं अगदीच काय न्हाय तर अर्धेतर टकुऱ्यात ऱ्हाईल. चालंल ते समद्यास्नी.' गर्दीतून अशा प्रकारचे आवाज उमटले. मंद हसत महाराजांनीसुद्धा हात उंचावून सहमती दर्शविली.

जांभेकरशास्त्र्यांचा पांडित्यपूर्ण आणि प्रभावी पूर्वपक्ष आणि त्यास असलेला रयतेचा पाठिंबा पाहून शास्त्रीमंडळ अस्वस्थ झाल्याशिवाय राहिले नाही. टोळशास्त्री उत्तरपक्ष करण्यास उभे राहिले. महाराजांनी त्यांच्याकडे पाहून आश्वासक स्मित केले आणि मान डोलावून धीर दिला. शास्त्रीबुवांनी आदल्या रात्री शास्त्रीमंडळींसमोर जे विवेचन केले होते तेच पुन्हा एकदा

अधिक विस्तारपूर्वक आणि त्यात अनेक उदाहरणांची व दृष्टान्तांची भर घालून साध्या सोप्या सरळ भाषेत सभेपुढे मांडले. संस्कृतातील उद्धरणांचा केवळ अर्थच नव्हे तर त्यांचा ग्रंथातील नेमका संदर्भ, त्यांची पार्श्वभूमी व त्यांचा समकालीन संदर्भ सोप्या शब्दांत रसाळपणे सांगितला. त्याच्याच जोडीला यापूर्वी महाराजांनी जगदीश्वराच्या मंदिरातील ब्रह्मसभेसमोर जो कोटिक्रम आणि तर्क मांडला होता, तोसुद्धा दैनंदिन जीवनात भोवताली घडणाऱ्या घटनांच्या उदाहरणांची आणि दृष्टान्तांची जोड देत विस्तारपूर्वक मांडला. शुद्धीकरणाची आवश्यकता आणि निकड त्यांनी अगदी तळमळीने मांडली. त्यांच्या वक्तव्यात केवळ पांडित्य नव्हते तर आर्जवी आग्रह होता.

असे असले तरी तथाकथित धर्मनिष्ठ कर्मठ ब्राह्मणांचा एक गट मात्र नर्मदा पाषाणवत आपल्याच भूमिकेस चिकटून होता. टोळशास्त्र्यांचे वक्तव्य संपताच त्या गटातील अनेक व्यक्ती उठून शिरा ताणून, तावातावाने बोलत आपला विरोध व्यक्त करीतच राहिल्या. त्यांच्या बोलण्यात शास्त्रोक्त तर्कापेक्षा तर्कटे आणि आग्रहापेक्षा हटवादच ठासून भरला होता. बहुतेक सारे मुद्दा सोडून भरकटत होते, तर काही भडक भाषा वापरून भावना भडकावण्याचा प्रयत्न करीत होते; धर्मभावनेला आवाहन करण्याच्या नावाखाली धमक्या देत होते. गणेशशास्त्र्यांसारख्या विद्वान मंडळींनी सामंजस्याच्या चार गोष्टी सांगण्याचा व त्यांना आवरण्याचा प्रयत्न करून पाहिला आणि अखेर ते असहाय मुद्रेने त्यांचा तमाशा पाहत गप्प बसून राहिले. मंडळी आपापल्या स्थानी परतली व मोरोपंतांनी हस्तक्षेप करून चर्चा थोपविली.

''जनहो, वास्तविक श्रीमान टोळशास्त्र्यांनी सर्व शास्त्राधार देऊन यथास्थितपणे शुद्धीकरणाचे समर्थन केले आहे. तरी काही मंडळींचे समाधान झालेले दिसत नाही. हा प्रश्न एवढा अगत्याचा आहे की, महाराजांस त्यास असलेला विरोध पूर्णत: दूर व्हावा असे वाटते. या कारणे महाराज स्वत: या विषयाच्या समर्थनार्थ बोलू इच्छितात. राज्याचे पंतप्रधान या नात्याने आम्ही सर्व उपस्थितांस ताकीद देतो की, महाराजांचा अधिक्षेप करण्याचा, दरबारी रिवाज सोडून बेअदबी करण्याचा प्रयत्न झाल्यास नतीजा बरा होणार नाही.''

एवढ्यात एक दणकट गडी झटक्याने उभा राहिला. जागेवरूनच त्याने मुजरा घातला. आपल्या गडगडाटी आवाजात आणि रांगड्या शैलीत त्याने बोलण्यास सुरुवात केली–

‘‘म्हाराज, आमी गुंजन मावळातल्या हुबेवाडीचं पाटील. म्हाराजांनी हाळी द्यावी आन आपुन झोकून द्येयाचं हा आमचा शिरस्ता. आता यो शासतरी द्येव म्हनंल, म्हाराज सोता म्हनंल त्यापरमानं बाटून दूर ग्येलेल्या आपल्या मानसास्नी परत गोत गंगेत आनलं पायजे ह्ये तर अक्षी बावनकशी खरं हाय, पर आमाला थोडकं येगळं म्हनायचं हाय. आमचं म्हननं असं हाय की, सोराज्याशी गद्दारी करनाऱ्याचा गडाच्या टकमक टोकावरून हरहमेश कडेलोट होतुया. अशांना कंदी तोपच्या तोंडी, तर कवा कवा हत्तीच्या पायदळी द्येतात. ग्येलाबाजार बेन हातपाय तरी गमावतोच. पर, म्हाराज चूक आसंल तर पोटी घेवा. ल्हान तोंडी मोटा घास घेतो म्हना, खोटं बोलत आसंन त चाबकानं हाना, पर आमच्यासारक्या इमानदार पाइकांना हितं कायतरी विपरीत हुतंय असं दिसतंया. सोराज्याशी, सोता म्हाराजांशी इतकंच नव्हं तर धरमाशी गद्दारी करनाऱ्यासाटी हा येवडा मोटा बारदाना हुबा क्येला जातुया. काय समजंना झालंया.’’

‘व्हय, व्हय. बरुबर हाय’ अशा अर्थाचे उद्‌गार उमटले. महाराजांनी सहेतुक हंबीररावांकडे पाहिले. हंबीरराव पुढे सरसावत म्हणाले–

‘‘पाटील, महाराजांच्या न्यायाबद्दल तुम्हाला शंका आहे का?’’

‘‘न्हाय जी सरकार, तसं न्हाई. त्ये पाप पदरात घिवून म्या काय नरकाचं धनी व्हवू की काय? पर जिकडंतिकडं कोनी कोनी काय बाय बोलतात. न्हाय न्हाय तो शक शुबा करत्यात. त म्हनलं आपुन थ्येट म्हाराजास्नीच पुसावं. चूक आसंल तर मापी करा मायबाप.’’

हंबीररावांनी महाराजांकडे पाहिले. महाराजांच्या नजरेची इशारत झाल्यावर ते पुन्हा म्हणाले–

‘‘ठीक, ठीक. चूक नाही बरेच झाले. निदान रयतेची या संबंधातली धारणा तरी उघड झाली. नेताजीरावांचे गनिमाच्या गोटात जाणे ही गद्दारी नव्हती या विषयी महाराजांनी जातीनिशी खातरजमा करून घेतली आहे. जर नेताजीराव गद्दार असते तर आलमगिराने त्यांस जेरबंद करून दिल्लीत नेले नसते. आदबखान्यात कोंडून त्यांचा जीवघेणा छळ केला नसता. कसेही करावे पण कैदेतून मोकळे व्हावे, म्हणजे मग महाराजांच्या पायाशी स्वराज्यात परतता येईल, स्वराज्याची पुनरपि सेवा करता येईल, ऐसे योजूनच ते मुसलमान झाले. ते गद्दार नव्हते म्हणूनच. तरीसुद्धा बादशहाला त्यांचा विश्वास वाटला नाही. त्यांना दूर अफगाणिस्तानात ठेवले. नाइलाज

झाला तेव्हाच दख्खनमध्ये धाडले. एवढा काळ लोटला तरी नेताजीरावांच्या निष्ठा तशाच जिवंत धगधगत्या होत्या. मोगली ढिलाईचा फायदा उठवत संधी मिळताच ते स्वराज्यात परतून महाराजांच्या चरणी रुजू झाले. त्यांच्या इमानाची आणि सचोटीची खातरजमा करून घेतली तेव्हाच महाराजांनी कौल दिला.''

हंबीररावांच्या बोलण्याने समाधानाची लहर एका बाजूने उठत असतानाच कृश शरीराचा एक वयोवृद्ध ब्राह्मण ताडकन उठून उभा राहिला. अभिवादनाचे सारे संकेत धुडकावून लावत, तांबडेलाल डोळे गरगरा फिरवीत त्याने तावातावाने बोलण्यास सुरुवात केली.

''हे असले शब्दांचे गारुड उभारून तुम्हास या अडाणी शूद्रांना भुलविता येईल कदाचित, परंतु आमच्यासारखे धर्मरक्षक या असल्या भाकड कथांना फसून तुम्हास काय वाट्टेल ते करू देतील असे वाटते की काय? तुम्हास धर्म म्हणजे काय पोरखेळ वाटतो? कोणीही उठावे, काहीही करावे. अरे, ज्ञानेश्वराचे उदाहरण कसले देता, तो प्रत्यक्ष नारायणाचा अवतार होता. तुम्ही काय त्याची बरोबरी करणार? अरे, चार थेंबुटे अंगावर उडवून जर राजा होता आले असते तर नदीत धुतला जाणारा प्रत्येक बैल आणि हेला चक्रवर्ती सम्राट म्हणवता...''

''हा म्हणे राजा, म्हणे गोब्राह्मण प्रतिपालक. स्वत:स धर्मरक्षक म्हणवितो, धर्मसंस्थापक म्हणून मिरवितो, ही सभा भरवून त्याने आपण मोठा न्यायी आणि धर्मरक्षक असल्याचा मारे आव आणला आहे. पण जोवरी आमच्या जिवात जीव आहे, तोवरी आम्ही हा भ्रष्टाकार खपवून घेणार नाही. जर कोणाला आपली मनमानी करायचीच असेल, तर त्याच्या मनगटातल्या बळापेक्षा ब्रह्मतेजाचे बळ मोठे आहे हे परत एकदा सिद्ध करून दाखवू. आम्ही धर्मरक्षक ब्राह्मण आत्ता या क्षणी याच स्थानी आपली जीभ हासडून वा कपाळमोक्ष करून प्राणार्पण करू. या ब्रह्महत्येचे पातक राजा म्हणविणाऱ्या या अधर्म्याच्या माथी लागेल हे ब्रह्मवाक्य.''

''खामोश...''

महाराजांचा संयम संपला. वीज कडाडावी वा आसूड कडकावा तसा त्यांचा आवाज साऱ्या मंडपात घुमला.

''खामोशऽऽऽ यापुढे एक शब्द जरी उच्चारला तरी कोणताही मुलाहिजा न राखता जिभा कापल्या जातील. आम्ही ब्राह्मणांच्या प्रतिपालनाची प्रतिज्ञा

घेतली आहे म्हणूनच इतका उशीर तुमच्या ब्राह्मण्याचा मुलाहिजा बाळगला आणि तुमची बकवास सहन केली. आमची सहनशीलता म्हणजे आमची दुर्बलता, हतबलता समजता की काय? स्वत:ला धर्माचे रक्षणकर्ते म्हणवणारे तुम्ही आज ब्राह्मण म्हणून येथे तोंड चालवीत आहात ते केवळ परमेश्वर कृपेने तुम्हावरी यवनांचा घाला आला नाही म्हणूनच. येथे तुमचा सन्मान होतो म्हणून ही मुजोरी दाखविता? अन्यथा गनिमाकडचा एक मुसलमान शिपाई जरी सामोरी आला तरी श्वानागत दो पायी शेपूट घालून बारावाटा धावता.

''स्वराज्य संस्थापना आणि स्वधर्माच्या अभिवृद्धीसाठी आम्ही केवळ तोंडाने वल्गना करीत नाही तर त्यासाठी हाती शस्त्र धरिले आहे. त्याचा धाक आज त्रिखंडी दुमदुमतो आहे. काय युक्त आणि काय अयुक्त हे तुम्हासारख्या पोटार्थींकडून शिकण्याची आम्हास गरज नाही. पाप-पुण्याचा धाक कोणास घालिता? अफजलखान मारिला, त्याचा वकील जातीने ब्राह्मण, पण म्लेंच्छांचे मीठ खाऊन म्लेंच्छांपेक्षा म्लेंच्छ झालेला. त्याने आम्हावरी शस्त्र धरिले. त्याचे तलवारीचे घाव झेलीत आम्ही त्यास विनवीत होतो, आम्हास ब्राह्मणावर शस्त्र चालविणे नाही; परंतु म्लेंच्छ वृत्ती कणाकणांत बाणवून स्वत:च्याच धर्माच्या मुळावर उठलेल्यास त्याचा पाड लागेना. असल्या अधर्म्यांचे ब्राह्मण्य ते कोठले? त्यांच्या ब्राह्मण्यापेक्षा आम्हास स्वराज्याचे रक्षण सहस्रपट अगत्याचे. तेव्हा शस्त्राघाते आम्ही स्वहस्ते ब्राह्मण कापून काढिला. रणांगणी लढताना आमचेच स्वकीय आम्हावरी शस्त्रे उगारून येतात तेव्हा आम्ही काय त्यांस जात-गोत पुसतो की काय? योगेश्वराच्या उपदेशे पार्थाने ब्राह्मण असलेल्या प्रत्यक्ष आपल्या गुरुवरी शस्त्र धरिले. प्राणांहुनी प्रिय आजाचा वध केला. तो काय अधर्म? नव्हे सत्य धर्माच्या रक्षणास्तव ते तर त्यांचे परमकर्तव्य.

''अपसमजूत दूर व्हावी, प्रबोधन व्हावे, सामोपचाराने समजवावे म्हणून आम्ही या सभेचा प्रपंच मांडिला. येर रयतेस धर्म कळावा म्हणून धर्मचर्चा मराठीत करविली. या उपरीसुद्धा समजूत पटत नसेल आणि फुकाची आढ्यता संपत नसेल तर समजणाऱ्या भाषेत समजावणी करण्याचाच धर्ममार्ग आम्हापुढे शिल्लक उरतो. तुमच्या आततायी, हटवादी, ब्राह्मण्याच्या रक्षणापरिता स्वधर्माची अभिवृद्धी आम्हास अधिक अगत्याची. मिथ्या धर्मरक्षणाचा तुमचा हट्ट आम्हीच स्वहस्ते पुरवितो. पवित्र धार्मिक विधींसाठी येथे यज्ञवेदी उभारली आहे. त्या कारणे येथे कोणाचे दूषित रक्त

सांडणे युक्त नव्हे. त्या कारणे मोक्षप्राप्तीची तुमची इच्छा आम्ही तुम्हास टकमकावरून लोटून देऊन पुरी करवितो. येसाजी कंक, ढालाईत बोलवा आणि या पाचही ब्राह्मणांच्या मुसक्या आवळा.''

महाराजांचा सात्त्विक संताप पाहून भल्याभल्यांना घाम फुटला. त्यांनी पाच ब्राह्मणांना जेरबंद करून, त्यांचा कडेलोट करण्याची दिलेली आज्ञा ऐकून तर सारी सभा चित्रासारखी तटस्थ झाली. ब्राह्मणांची उर्मट वटवट बंद झाली तरी त्यांच्या मुखावरील मगरुरी कायम होती. मात्र जेव्हा ढालाईतांनी खरोखरच त्यांच्या मुसक्या आवळल्या आणि त्यांना मांडवाबाहेर चालविले, तेव्हा मात्र त्यांचे अवसान गळाले. मग मात्र त्यांनी नुसता आकांत मांडला–

''महाराज, दया करा. क्षमा करा. आमची चूक झाली. पदरात घ्या. आमचा जीव वाचवा शास्त्रीमहाराज. या गरीब ब्राह्मणांचा जीव वाचवा. दया करा महाराज, दया करा...''

झाल्या प्रकाराने अस्वस्थ झालेले गणेशशास्त्री ब्राह्मणांची रदबदली करण्याच्या इराद्याने उभे राहिले असता महाराजांनी हाताच्या इशाऱ्याने त्यांना थोपविले आणि कडक शब्दांत हुकूम सोडला–

''येसाजी, याच क्षणी यांना नेसत्या वस्त्रानिशी गडाखाली न्या. हातीपायी साखळदंड जखडून यांना तातडीने स्वत:च्या गावी रवाना करा. यांच्याच गावातून यांची गाढवावरून धिंड काढा. चावडीसमोर गाव गोळा करून यांनी केलेल्या तमाशाचा झाडा घ्या. आम्ही गोब्राह्मण प्रतिपालक असलो, तरी धर्मरक्षणाच्या आड येणारी अडाणी आणि हटवादी ब्राह्मणांची खोटी पत्रास या राज्यात राखली जात नाही. राखली जाणार नाही हे जगाला नीट समजू देत. शास्त्रीबुवा उद्याचे विधी ठरल्या मुहूर्तावर, ठरल्या रीतीनेच होतील.''

आसनावरून ताडकन उठून ताडताड पावले टाकीत महाराज मंडपाबाहेर पडले. सात्त्विक संतापाने त्यांच्या अंगाला थरकाप सुटला होता. हुजऱ्याने पुढे केलेले चढाव पायी चढविण्याचेसुद्धा त्यांना भान राहिले नाही. मोतद्दाराने पुढे आणलेल्या घोडीवर झेप टाकून त्यांनी टाच दिली आणि घोडी चौखूर उधळीत ते महालाकडे निघून गेले.

★

२री आवृत्ती

पाथ्स ऑफ ग्लॉरी

मूळ लेखक
जेफ्री आर्चर

अनुवाद
सुभाष जोशी

किंमत - ४००/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.

काही लोकांची स्वप्नं इतकी विलक्षण असतात, की ती जर त्यांनी पूर्ण केली तर त्यांचं नाव इतिहासात निर्विवादपणे लिहिलं जातं. फ्रान्सिस ड्रेक, रॉबर्ट स्कॉट, पर्सी फॉसेट, चार्ल्स लिंडबर्ग, एडमंड हिलरी आणि नील आर्मस्ट्रॉंग, ही नावं हेच सिद्ध करतात.
पण जर असं झालं, की एका माणसाने असंच एक स्वप्न उराशी बाळगलं आणि ते पूर्णही केलं, पण याला काहीच पुरावा मागे ठेवला नसेल तर?

'पाथ्स ऑफ ग्लॉरी' अशाच एका माणसाची कथा आहे, पण या असामान्य कादंबरीचं शेवटचं पान उलटेपर्यंत, तुम्हाला त्याचं नाव त्या यादीत टाकावं का नाही, याचा निर्णय घेता येणार नाही कारण जर त्याचं नाव त्या यादीत जोडलं, तर मग त्या यादीतलं एक नाव काढावं लागेल...

वादळातील दीपस्तंभ

जीवनातील आव्हानांचे रूपांतर यशात करा.
विचारांचं रूपांतर यशात करा आणि उत्तम फळ मिळवा

मूळ लेखक
डॉ. क्रेफ्लो डॉलर

डॉ. डॉलर हे जॉर्जिया येथील 'वर्ल्ड चेंजर्स चर्च इंटरनॅशनल', न्यूयॉर्क येथील 'वर्ल्ड चेंजर्स चर्च'; तसेच ह्यूस्टन, लॉस एंजलीस आणि नॉरक्रॉस येथील वर्ल्ड चेंजर्स चर्चसारख्या सॅटलाइट चर्चेसचे संस्थापक आणि वरिष्ठ धर्मोपदेशक आहेत. त्यांचा 'चेंजिंग युवर वर्ल्ड' हा टीव्हीवरील कार्यक्रम जगभरात प्रसिद्ध आहे.

डॉ. डॉलर हे 'चेंज' या ऑनलाइन मासिकाचे प्रकाशक आहेत. या मासिकात रोजच्या जीवनातील समस्यांसंबंधीचे प्रेरणादायी, आव्हानात्मक आणि जीवनात परिवर्तन घडवून आणणारे लेख प्रसिद्ध होतात. धर्मोपदेशकांसाठी असलेल्या 'द मॅक्स' या बातमीपत्राचेही ते प्रकाशक आहेत. त्यांची पुस्तके, सीडीज आदी साहित्य प्रकाशित असून त्यांच्या पुस्तकांचा अमेरिकेतील वेगवेगळ्या ठिकाणच्या ख्रिश्चन कॉलेजच्या अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे.

पैसा हा समृद्धीचा फक्त एक भाग आहे. आरोग्य, नातेसंबंध, संसार, कुटुंब याबाबतीत समृद्धी असेल तर ती खरी समृद्धी.



मूळ लेखक
डॉ. क्रेफ्लो डॉलर
अनुवाद
गौरी गाडेकर

सश्रद्ध नेहमीच जिंकतात

डिसेंबर २००७मध्ये अमेरिकेत अधिकृतरीत्या मंदीची घोषणा झाली, तेव्हा त्याच्या परिणामांना सश्रद्ध कसा प्रतिसाद देतात, त्याचं मी निरीक्षण करू लागलो. मला असं आढळलं की, बऱ्याच लोकांना कठीण परिस्थितीवर मात करण्याकरिता श्रद्धेचा उपयोग कसा करावा तेच ठाऊक नव्हतं. ते पाहून मी खूप अस्वस्थ झालो. हे पुरेसं नव्हतं म्हणून की काय, मला कळलं की, एका अहवालानुसार सश्रद्ध लोकांमधील घटस्फोटांचं प्रमाण अश्रद्ध लोकांमधील घटस्फोटांच्या प्रमाणाएवढंच होतं. दुर्दैवाने मी अशा निष्कर्षाप्रत आलो की, अडचणीच्या प्रसंगी तग धरण्याकरिता श्रद्धेचा आधार कसा घ्यावा, याविषयी बऱ्याच सश्रद्धांना पुरेशी माहिती नाही. त्यामुळे

ताणतणावामुळे कठीण परिस्थितीचा सामना करण्याची वेळ त्यांच्यावर येते. म्हणूनच संकट आलं की, जगातील इतर माणसांप्रमाणेच त्यांच्यावरही दु:ख सोसायची पाळी येते आणि बरे दिवस आले, तरीही हे चालूच राहतं.

मला हेच स्पष्ट करायचं आहे, 'देवाच्या राज्यात कधीही मंदी येत नाही. देव कधीच दिवाळखोर होत नाही.' लक्षात घ्या की, जगात काहीही चाललेलं असलं तरी देव कधीच पराभूत होत नाही. जर आपलं उगमस्थान असलेला देव कधी पराभूत होत नसेल, तर आपण देवावर विश्वास ठेवणारेही कधी पराभूत होऊ शकत नाही. म्हणजेच आपण नेहमीच जिंकतो!

मला ते दिवस अजूनही आठवतात. माझी आर्थिक परिस्थिती एवढी बिघडली होती की, त्यातून बाहेर पडायचा मार्ग मला दिसत नव्हता. माझं वैवाहिक जीवन सुरळीत कसं करावं, तेही मला कळत नव्हतं. काय करावं, हे न कळणं यासारखी दु:खदायक गोष्ट नाही. पण नंतर देवाने मला बायबलमधील तत्त्वांचा साक्षात्कार घडवला आणि त्यायोगे प्रतिकूल परिस्थितीवर विजय मिळवण्याची ताकद मला दिली. बायबलच्या तत्त्वांमधील ज्ञान देवाच्या माणसांनाही मिळावं आणि त्यांनी संकटातून बाहेर यावं, असं मला उत्कटतेने वाटतं. मला जेव्हा या गोष्टींचा साक्षात्कार झाला, तेव्हा मी आर्थिक तणावातून मुक्त झालो. अगदी मला आणि माझी पत्नी टॅफी हिला वर्षानुवर्षं बंधनात ठेवणाऱ्या भल्यामोठ्या कर्जाचा ताणही कमी झाला. डोक्यावर कर्जाचा बोजा असेल, तर त्यातून निर्माण होणाऱ्या ताणतणाव आणि इतर समस्या यांमुळे आपल्या अख्ख्या आयुष्यावरच परिणाम होतो. पण 'शब्दा'च्या ज्ञानाद्वारे देवाने आम्हाला सामर्थ्य दिलं आणि त्या आर्थिक ओझ्यातून मुक्त केलं. आम्ही आता जसे आहोत, जिथे आहोत, तिथपर्यंत देवानेच आम्हाला आणलं आहे.

देवाच्या 'शब्दा'*चा (बायबलचा) अभ्यास करून, ते शिकवून देवाने आम्हाला जे ज्ञान दिलं ते इतरांपर्यंत पोहोचवणं, हाच या पुस्तकाचा उद्देश आहे. याशिवाय समृद्धीकडे बघायच्या तुमच्या दृष्टिकोनाला मला आव्हान द्यायचं आहे. '३ जॉन २' या अवतरणाविषयी आपण पुढे चर्चा करणार आहोत. त्या अवतरणाच्या अर्थाचं तुम्ही चिंतन करावं असं मला वाटतं. कारण तुम्ही अगदी कठीण परिस्थितीत असलात, तरी देव तुम्हाला समृद्ध करील यावर तुम्ही मनापासून विश्वास ठेवणं आवश्यक आहे.

समृद्धीचं खरं स्वरूप

तिसरा जॉन २मध्ये म्हटलं आहे, ''जिवलगांनो, तुम्ही समृद्ध (ईदेजी - प्रॉस्पर) व्हावं, निरोगी व्हावं आणि तुमचा आत्माही समृद्ध व्हावा, ही माझी सर्वांत महत्त्वाची इच्छा आहे.'' 'Prosper – प्रॉस्पर' हा शब्द 'युडू' (euodoó) या ग्रीक शब्दापासून आला आहे. युडू हा ग्रीक शब्द 'गुडबाय', 'फेअरवेल' किंवा 'बॉन व्होयॅज' याप्रमाणे निरोप देताना वापरतात. या मूळ ग्रीक शब्दाचा अर्थ आहे, सुखरूप मुक्कामाला पोहोचण्यात यशस्वी व्हा. म्हणून त्यापासून तयार झालेल्या ईदेजे या शब्दाचा अर्थ आहे, जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात नेहमीच कल्याण होवो.

समृद्धीविषयीच्या या संदेशावर वर्षानुवर्षं टीका होत आली आहे. कारण लोकांना शत्रूने फसवलं आहे. सैतानाला लोकांच्या मनात भरवून द्यायचं असतं – 'धर्मोपदेशकांचा फक्त पैशांवर डोळा असतो.' माझ्याबाबतीत सांगायचं झालं तर, मला स्वत:ला लोकांचा पैसा लुबाडण्यात रस नाही. देवाबद्दल माझ्या मनात नितांत आदर आहे. मी त्याचा सन्मान करतो, असं असताना मी त्याचे लोक, त्या लोकांचे पैसे, यात ढवळाढवळ कशी करीन? उलट देवाच्या पद्धतीने लोकांना समृद्ध झालेलं बघण्यात मला जास्त रस आहे.

पैसा हा समृद्धीचा फक्त एक भाग आहे. आरोग्य, नातेसंबंध, संसार, कुटुंब याबाबतीत समृद्धी नसेल, तर काय उपयोग त्या फुगलेल्या बँक खात्याचा?

आयुष्याच्या प्रत्येक क्षेत्रात यशस्वी होणं, ही खरी समृद्धी. यशस्वी होणं म्हणजे इच्छित पातळीएवढं उत्कृष्ट होणं. उदाहरणार्थ, चैतन्याची समृद्धी म्हणजे पुनर्जन्म, येशू ख्रिस्ताशी अगदी जवळचं नातं जुळणं. जेव्हा माझा आत्मा समृद्ध होतो, तेव्हा माझे विचार, निर्णय, भावना निकोप आणि दृढहोतात. आरोग्याची समृद्धी म्हणजे निरोगी असणं, कोणतीही विकृती वा आजारपण नसणं. देवाच्या इच्छेनुसार समृद्ध होणं म्हणजे प्रत्येक क्षेत्रात समृद्ध होणं. कारण त्याचे दास समृद्ध झाले की, त्याला आनंद होतो. (साम [Psalm]३५:२७)

आपण खरंखुरं समृद्ध व्हावं असं देवाला का वाटतं? कारण त्याची सेवा करण्यात आपला फायदा असतो, हे त्याला जगाला दाखवायचं असतं. जेव्हा आपण समृद्ध होतो, तेव्हा आपण इतरांना मदत करू शकतो, इतरांची

सेवा करू शकतो. जेव्हा चर्च समृद्ध होतं, तेव्हा ख्रिस्ताचा संदेश जगभर पोहोचवण्यासाठी आपण समर्थ होतो. कोणताही डाग किंवा सुरकुती नसलेल्या चर्चसाठी येशू परत येत आहे. याचा अर्थ, तो आजारी, दिवाळखोर, दडपलेल्या भक्तांसाठी परत येत नसून वैभवशाली चर्चकरिता परत येत आहे.

आयुष्याच्या प्रत्येक क्षेत्रात तुम्ही परिपूर्ण होऊ शकता

रोमन्स १२:२मध्ये म्हटलं आहे, ''तुम्ही इतरांप्रमाणे वागू नका; तर तुमच्या मनात नवचैतन्य आणून तुमचं स्वरूप बदला आणि चांगलं, स्वीकारार्ह, परिपूर्ण, देवाच्या इच्छेनुरूप म्हणजे काय ते जगाला दाखवून द्या.'' खरी समृद्धी आणि फसवी समृद्धी यात अंतर आहे. सर्वांत मोठा फरक म्हणजे देवाच्या आशीर्वादामुळे खरोखरीची संपन्नता येते. त्यात देव दुःखाची भर घालत नाही. (प्रोव्हर्ब्स १०:२२). संपन्नता या शब्दाचा या संदर्भात अर्थ होतो पूर्णत्व, अखंडत्व, कोणतीही कमतरता नसलेलं.

अनेक लोक लौकिक मार्गांनी, म्हणजे स्वार्थ, लोभ, लालसा वगैरे मार्गांनी, संपन्न होतात. पण खरंतर, ते स्वतःलाच फसवत असतात. वरवर पाहता त्यांच्याकडे महागडी कार, चांगली नोकरी, सुखी संसार वगैरे सगळं काही असतं. पण नीट पाहिलं तर कळतं की, त्यांच्याजवळ असलेल्या या गोष्टींमुळे त्यांच्या पदरी दुःखच पडतं आहे. कार, घर यांमुळे त्यांना एवढं जबरदस्त कर्ज झालेलं असू शकतं की, लठ्ठ पगाराची नोकरीही पुरी पडणार नाही. काहींचा संसार अगदी आदर्श वाटत असला, तरी बंद दरवाजाआड काय घडतं, त्याची बाहेरून कल्पना येत नाही. काही जणांना अगदी मनासारखी नोकरी मिळाली आहे, असं आपल्याला वाटत असतं. पण त्यांना आत खोलवर जाणवणारं दुःख, एकाकीपणा आपल्याला ठाऊक नसतो. हे झालं लौकिक मार्गाने मिळवलेल्या समृद्धीचं. पण देवाचे मार्ग हे नेहमीच परिपूर्ण असतात. आपल्या सर्व गोष्टी तो परिपूर्ण करून देतो.

लोक मला नेहमी एक प्रश्न विचारत असतात. खऱ्या समृद्धीमागचं रहस्य त्यांना जाणून घ्यायचं असतं. रहस्य हेच आहे की, मी देवाच्या 'शब्दा'नुसार जगतो. जगाच्या, सरकारच्या किंवा इतर कोणाच्याही कार्यपद्धतीवर माझा विश्वास नाही. माझा खरा विश्वास आहे देवावर, त्याच्या कार्यप्रणालीवर. हे पुस्तक वाचत असताना, आपल्याला कधीही निराश न

करणाऱ्या त्या प्रेमळ 'पित्या'वर तुम्ही विश्वास ठेवावा, असं माझं आग्रहाचं सांगणं आहे.

एखाद्या खडतर गोष्टीसाठी तुम्ही संघर्ष करत असाल, जगातील अंदाधुंदीमुळे तुम्ही हैराण झाला असाल, तर हे पुस्तक उघडा. त्यातून बाहेर पडायचा मार्ग तुम्हाला नक्की सापडेल. पण त्यासाठी आवश्यक आहेत दोन महत्त्वाचे बदल. तुमची विचार करण्याची पद्धत आणि देवाच्या राज्याकडे बघायचा तुमचा दृष्टिकोन, या दोन्ही गोष्टींत तुम्हाला बदल करावा लागेल.

देव आपल्याला नेहमीच विजयी करत असतो. हे पुस्तक वाचत असताना तुम्हाला व्यावहारिक ज्ञान मिळेल, बायबलमधील तत्त्वांचं स्पष्ट आकलन होईल. त्यांचं आचरण केल्याने जीवनातील सर्व क्षेत्रांत तुम्हाला चिरस्थायी यश मिळेल. तुम्ही कशाचाही सामना करत असलात, परिस्थिती कितीही गंभीर वाटत असली, तुम्हाला काहीही वाटत असलं, तरी देव तुम्हाला यशाची खात्री देतो. तुम्ही नेहमीच जिंकता. आपण नेहमीच जिंकतो!

तुम्ही समृद्ध व्हा, संपन्न व्हा, यशस्वी व्हा, निरोगी राहा, तुमचा आत्माही समृद्ध व्हावा हीच देवाची इच्छा आहे.

विजयाकडे नेणारं परिवर्तन करायची वेळ आली आहे

आध्यात्मिक दृष्टिकोनातून आपण आपल्या आयुष्याचं व्यवस्थापन केलं पाहिजे. जेव्हा आपण आपल्या जीवात्म्यावर प्रभुत्व मिळवू शकतो, तेव्हा आत्म्यावर आणि शरीरावर ते आपोआपच मिळतं.

बदल सोपा नसतो. मी हे खात्रीपूर्वक सांगू शकतो. कारण एक्या वर्षांत माझ्या आयुष्याच्या वेगवेगळ्या क्षेत्रात मला बऱ्याच तडजोडी कराव्या लागल्या आहेत आणि ते मला खूप कठीण गेलं आहे. अगदी खाण्याच्या सवयीपासून ते संतापाच्या हाताळणीपर्यंत स्वत:त बदल करताना, तोपर्यंत

सवयीचं झालेलं आरामशीर आयुष्य सोडून नवीन काहीतरी स्वीकारणं किती अवघड आहे, ते माझ्या लक्षात आलं. पण देवाकडून उत्कृष्ट गोष्टी मिळवण्याकरिता आपल्यात बदल करणं अपरिहार्य आहे. एक व्यक्ती या नात्याने आपण वाढत आहोत, विकसित होत आहोत, याचा तो पुरावा आहे. आपण जेव्हा आपल्या मनात संजीवन भरण्यासाठी कटिबद्ध असतो, तेव्हाच खरे आणि चिरस्थायी बदल होतात.

जर तुम्ही मोठे होत असाल, तर तुमच्यात परिवर्तन होतच असणार, जेव्हा परिवर्तन होत नाही तेव्हा वाढ खुंटलेली असते. जेव्हा एखादी गोष्ट आपल्या वाढीला, प्रगतीला खीळ घालते, तेव्हा ती बदललीच पाहिजे. मी असं सांगितलं की, लोक अस्वस्थ होतात. खास करून वर्षानुवर्षं ज्या वागणुकीची सवय झालेली असते, त्यात बदल करायला लोक सहसा तयार नसतात. अंगवळणी पडलेल्या साचेबद्ध वर्तणुकीच्या विरुद्ध जाणं हे खरोखरच अवघड असतं. तरीसुद्धा परिवर्तन हे अपरिहार्य असतं. सृष्टीतही मोसमाप्रमाणे पानगळ आणि नवी पालवी फुटणं, हे बदल होतच असतात ना! त्यामुळे तुम्ही स्वीकारा वा नाकारा, बदल हे सदैव होतच राहणार.

या बदलांना कारण असणाऱ्या पाच गोष्टी आपण पाहू या. संसार, आर्थिक व्यवस्थापन, शारीरिक आरोग्य, मुलांचं संगोपन या सर्व क्षेत्रांत त्या लागू पडतात. तुम्ही न चुकता या अमलात आणल्यात तर त्या क्षेत्रात चिरस्थायी बदल झालेले तुम्हाला आढळून येतील.

बदलाची सुरुवात कुठे करावी ते देवाच्या 'शब्दा'त दिलं आहे. आपल्या विचारात परिवर्तन करून ते योग्य मार्गावर कसे आणावेत यासाठीचा विश्वसनीय संदर्भग्रंथ तोच आहे. परिवर्तन प्रक्रियेला सुरुवात कशी करावी आणि ती चालू कशी ठेवावी, याचं सूत्र ॲम्प्लिफाइड बायबलमधील रोमन्स १२:१-२मध्ये सांगितलं आहे :

> ''बांधवांनो, देवाच्या कृपेने मी तुम्हाला कळकळीची विनंती करतो की, पवित्र (एकनिष्ठ, ईश्वरभक्तीला वाहून घेतलेला) आणि देवाला संतुष्ट करणारा जिवंत स्वार्थत्याग म्हणून तुमच्या शरीराचं (तुमचे सर्व अवयव आणि नैसर्गिक शक्ती सादर करून) निर्णायक समर्पण करा. ही तुमची रास्त (तर्कशुद्ध, बुद्धिवान) सेवा आणि आध्यात्मिक उपासना असेल. जग वागतं (आजच्या काळात)

त्याप्रमाणे (बाह्य, वरवरच्या रितीला जुळेल असं बेतलेलं) वागू नका. मनाचं (पूर्ण) नूतनीकरण (नवे आदर्श, नव्या दृष्टिकोनाद्वारे) करून तुमचं स्वरूप बदला, ज्यायोगे देवाची चांगली, स्वीकारार्ह आणि परिपूर्ण इच्छा काय आहे, ते तुम्हाला सिद्ध (तुमच्या स्वत:साठी) करता येईल. एवढंच नव्हे तर चांगली, स्वीकारार्ह आणि परिपूर्ण (देवाच्या दृष्टीने, तुमच्यासाठी) अशी महत्त्वाची बाब काय आहे, हेही तुम्ही सिद्ध करू शकाल.''

गंमत म्हणजे भक्तांना, त्यांची शरीरं देवाला समर्पित करायची गळ घालून पॉलने या उताऱ्याची सुरुवात केली आहे. आपण आपल्या शरीराचं काय करतो, हे देवाला महत्त्वाचं वाटतं, हे यावरून स्पष्ट होतं. जेव्हा आपण जिवंतपणी आपल्या शरीराचं समर्पण करतो, तेव्हा आपण म्हणत असतो, ''देवाच्या 'शब्दा'च्या विरोधात जाणाऱ्या गोष्टींसाठी मी माझ्या शरीराचा वापर होऊ देणार नाही.''

उताऱ्याचा हा भाग व्यभिचार, लैंगिक अनीती वगैरेसारख्या शारीरिक पापांशी संबंधित व्यसनांच्या संदर्भात आहे. जेव्हा आपण निषिद्ध लैंगिक संबंधात सहभागी होतो, तेव्हा आपण मूलत: देवाचं वसतिस्थान भ्रष्ट करत असतो. देव आपल्या आत राहतो. आपलं शरीर हे आपलं नसून देवाचं आहे. जेव्हा आपण लैंगिक पाप करतो, तेव्हा आपण आपल्या शरीराचे गुन्हेगार असतो. (१कॉरिंथिअन्स ६:१३,१८)

मनात नवचैतन्य आणणं आणि आपण आपल्या शरीराचं काय करतो, या दोन गोष्टींच्या परस्परसंबंधावर पॉल जोर देत आहे. मन सांगेल तेच शरीर करतं. ते स्वतंत्रपणे कार्य करत नाही. त्यामुळे जे काही आपण विचार कसा करतो, यावर हुकमत गाजवतं. तेच शेवटी आपण आपल्या शरीराचं काय करतो, यावरही हुकमत गाजवतं. प्रेषित पॉल ख्रिश्चनांशी बोलत होता. याचा अर्थ वासनांवर ताबा मिळवू न शकणाऱ्या, चर्चमधील लोकांना तो मार्गदर्शन करत होता, हे उघड आहे. आज काही बदललं आहे का? काहीही नाही. आजही लोक, अगदी सश्रद्धसुद्धा देवाची आराधना करण्यापेक्षा व्यसनांची, अपवित्र गोष्टींची उपासना करण्यासाठी आपल्या शरीराचा उपयोग करत आहोत. त्यामुळे मानसिकतेत बदल करणं अत्यावश्यक आहे.

तो पुढे सांगतो की, आजच्या जगात लोक जसं वागतात, त्याचं अनुकरण आपण करता कामा नये. बदलाच्या संदर्भात हा सर्वांत महत्त्वाचा

२०वी आवृत्ती

वाइज अँड अदरवाइज

मूळ लेखिका - सुधा मूर्ती

अनुवाद - लीना सोहोनी

किंमत - १५०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.

भारताच्या आर्थिकदृष्ट्या अत्यंत मागास भागांमध्ये सुधा मूर्ती यांनी भटकंती केली आहे. त्या पायी फिरल्या आहेत, त्यांनी बसनंही प्रवास केला आहे. या भागात अठराविश्वे दारिद्र्यात राहणाऱ्या माणसांच्या दारात आरोग्याच्या आणि शिक्षणाच्या सुविधा नेऊन पोचवण्यासाठी त्यांनी आटोकाट प्रयत्न केले आहेत. त्यांच्या या कार्यामुळेच समाजाच्या विविध स्तरांतील असामान्य व्यक्तींच्या सहवासात त्या आल्या. मग ते मुंबईतून उठून जाऊन भूकंपग्रस्त गुजरातमध्ये स्थायिक होणारं भिकाऱ्याचं कुटुंब असो, हुंड्यासाठी बळी गेलेल्या एका तरुणीची माता असो... नाही तर मोठ्या रकमेचा चेक देणगी म्हणून पाठवणारा अनामिक दाता असो... या सर्वांमुळे, त्यांच्या हृदयाला स्पर्श करून जाणाऱ्या कहाण्यांमुळे आणि त्यांच्या मुलखावेगळ्या जीवनविषयक तत्त्वज्ञानामुळे सुधा मूर्तींचं जीवन समृद्ध होऊन गेलं आहे. एक प्राध्यापिका आणि एक समाजसेविका या दोन्ही नात्यांनी त्यांना जे काही विलक्षण अनुभव आले ते त्यांनी आपल्यापुढे मांडले आहेत. विनोदाची झालर असलेल्या त्यांच्या घरगुती, मनमोकळ्या लेखनशैलीतून निर्माण झालेलं हे पुस्तक सुधा मूर्ती यांचं कार्य आणि त्यांचं जीवनविषयक तत्त्वज्ञान यांचं व्यापक दर्शन घडवणारं आहे.

मुद्दा आहे. वस्तुस्थिती ही आहे की, आजच्या जगाने देवाच्या 'शब्दा'च्या विरोधात असणाऱ्या कल्पनांना कवटाळलं आहे. आजच्या समाजाचे आदर्श, मूल्यं ही देवाच्या इच्छेच्या अगदी विरुद्ध टोकाची आहेत. आपल्यापैकी बरेच जण तशीच मानसिकता बाळगत लहानाचे मोठे झाले आहेत. आईवडील, मित्रमैत्रिणी, सहकारी या सर्वांचाच आपल्या विचार करण्याच्या पद्धतीवर, आपल्या श्रद्धांवर प्रभाव पडलेला असतो. आपल्यातील इतर काही लोक धार्मिक वातावरणात वाढलेले असतात. म्हणजे ते चर्चला नियमितपणे जातात. पण 'शब्दा'ची तत्त्वं रोजच्या जगण्यात आचरणात कशी आणावीत, ते त्यांना कळलेलं नसतं.

जीवनाच्या वेगवेगळ्या बाबींच्या संदर्भात आपण भौतिक कल्पनांनी वेढलेले असतो, त्या आपल्या मनावर बिंबवल्या गेलेल्या असतात. त्यामुळेच आपली विचारसरणी योग्य स्थानावर आणण्यासाठी 'शब्दा'कडून सतत नवीन ज्ञान मिळत राहणं अत्यावश्यक ठरतं. जगाबरहुकूम वागण्याऐवजी आपल्या मनाचं नूतनीकरण करून स्वत:चं स्वरूप बदलण्यावर लक्ष केंद्रित केलं पाहिजे. एखाद्या गोष्टीचं नूतनीकरण करणं म्हणजे तिची पुनर्रचना करणं किंवा पुन्हा नवीन करणं.

ॲडम आणि इव्हने ईडनच्या उद्यानात पाप करण्यापूर्वी देवाचं जीवन त्यांच्या मनांवर बिंबवलं गेलं होतं. ती दोघं आपला जीव, आत्मा आणि शरीराद्वारे देवाशी जोडली जाऊ शकत होती. मना केलेल्या झाडाचं फळ खाऊन त्यांनी देवाची अवज्ञा केली आणि ती दोघं शापाशी जोडली गेली. त्यांच्या मनावर पाप-मृत्यूच्या नियमाचं सावट पडलं आणि ती भावनेच्या आहारी गेली. त्याचा प्रभाव त्यांच्या विचारशक्तीवरही पडला.

तथापि, येशू ख्रिस्ताद्वारे आपण शापित विचारसरणीच्या कचाट्यातून मुक्त झालो आहोत. शांती, समग्रता आणि देवाशी एकवाक्यता ही मनाची मूळ स्थिती असते. आपल्या मनाला, ती स्थिती पुन्हा मिळवून देण्याची क्षमता असलेल्या शक्तीशी आपण आता पुन्हा जोडले जाऊ शकतो. हे नूतनीकरण 'शब्दा'च्या पुलामुळे शक्य होतं.

आपल्या विचारसरणीत बदल करून ती देवाच्या 'शब्दा'शी समांतर करावी. त्यामुळे आपण 'शब्द' पाहू शकतो, आपल्याला त्याचे आकलन होऊ शकते. एवढंच नव्हे, तर आपण आपल्या आयुष्यात 'शब्द' आचरणात आणू शकतो. यालाच देवाची पूर्ण इच्छा काय आहे, ते स्वत:साठी सिद्ध

करणं, असं म्हणतात. आपल्या मनात संजीवन भरलं की, देवाचा 'शब्द' हेच सत्य आहे आणि तोच आपला अंतिम आधार आहे, याबद्दल आपली खात्री पटते आणि आपल्याला निश्चित वाटतं.

मनात नवचैतन्य आणणं ही एकदाच करायची गोष्ट नाही, तर ती आयुष्यभर चालू राहणारी प्रक्रिया आहे. मनाला नवीन ज्ञानाची ओळख करून देणं, एवढ्यापुरतंच ते मर्यादित नाही. जुन्या मोहाला बळी न पडणं हा मनाच्या नूतनीकरणाचा पुरावा आहे. कारण आता विचारशैली बदललेली असते, कल्पना नवीन असतात, त्या विवक्षित क्षेत्राबद्दलचा दृष्टिकोनही बदललेला असतो. पूर्वीचा मोह आताच्या या बदललेल्या मानसिकतेची बरोबरी करू शकत नाही. पण आपण पूर्वीचीच विचारपद्धती कायम ठेवल्यास कितीही जास्त प्रमाणात नवीन ज्ञान आपल्याला मिळालं, तरी खरं परिवर्तन घडून येणार नाही. फक्त शिकण्याने बदल होत नाही, तर आपण जे शिकलो ते अवगत करून त्यानुसार वागण्यानेच बदल घडत असतात.

व्यसनांवर विजय मिळवण्याचा प्रयत्न करताना देवाच्या 'शब्दा'ने मन सतत संस्कारित करत राहिलं पाहिजे, हे बरेचदा लोकांच्या लक्षात येत नाही. तसंच, सुधारणा दिसू लागल्यावर 'शब्दा'साठी खर्च करायच्या वेळात कपात केली तरी चालेल, असं मानणं ही स्वत:चीच फसवणूक असते. खरंतर उर्वरित आयुष्यभर हे मनाचं नूतनीकरण निर्धारपूर्वक करत राहिलं पाहिजे.

बदलाच्या पाच पायऱ्या

मायकल जॅक्सन एक गाणं गायचा – 'मॅन इन द मिरर'. त्यात म्हटलं आहे की, आरशात बघा आणि स्वत:पासूनच सुरुवात करा. आपल्या आयुष्यात आणि आपल्या भोवतालच्या जगात बदल घडवून आणायला भाग पाडा. आपल्या प्रतिबिंबाकडे पाहिलं की, आपण नक्की कसे दिसतो, ते स्पष्टपणे आपल्याला कळतं. पण आपण कसे दिसत आहोत, हे आपण बघू शकलो नाही, तर आपले केस विंचरायला हवे आहेत का, आपल्याला प्रसाधनाची आवश्यकता आहे का, याविषयी आपण काहीच खूणगाठ बांधू शकणार नाही. आपला चेहरा नीट करण्यासाठी आपण आरशात बघतो. त्याचप्रमाणे 'शब्दा'च्या आरशातून स्वत:कडे बघितलं पाहिजे. आपण कुठे आहोत, त्याची पूर्ण जबाबदारी घेऊन स्वत:त आवश्यक ते बदल घडवून आणले पाहिजेत.

पहिली पायरी : जबाबदारी

परिवर्तनाची पहिली पायरी आहे, जबाबदारी. ही सर्वांत कठीण पायरी आहे. तिच्यापुढे कोणत्याही सबबी टिकाव धरू शकत नाहीत. परिवर्तनाच्या संदर्भात जबाबदारी किती महत्त्वाची आहे, हे सांगायला शब्द अपुरे पडतील. आपल्या जीवनातील सध्याची परिस्थिती हा आपण घेतलेल्या निर्णयांचा परिणाम आहे. त्यासाठी आपण देवाला, आपल्या जोडीदाराला, शेजाऱ्याला, व्यवसायातील वरिष्ठांना किंवा इतर कोणालाही दोष देऊ शकत नाही. जोपर्यंत आपण त्याची पूर्ण जबाबदारी घेत नाही, तोपर्यंत आपला आपल्यावर ताबा असत नाही. त्यामुळे आपण बदल घडवून आणण्यास असमर्थ असतो.

''मी माझी आणि माझ्या आयुष्याची पूर्ण जबाबदारी स्वीकारतो,'' असं एखादा माणूस म्हणतो, तेव्हा काय होतं? त्याच्या बोलण्याचं सार असतं, ''माझ्यात बदल घडवून आणण्याची मी पूर्ण जबाबदारी घेतो.'' पण तो इतरांवर दोषारोप करणं चालू ठेवतो, तेव्हा आयुष्यात चांगलं फळ मिळण्यासाठी आवश्यक त्या तडजोडी करायची त्याची तयारी नाही, हेच तो दर्शवत असतो. आपल्या आयुष्याच्या नाटकात आपण निभावलेल्या भूमिकेची जबाबदारी घेण्यापेक्षा बाहेरच्या कोणालातरी दोष देणं सोपं असतं.

काही वर्षांपूर्वी मादक पदार्थाच्या सेवनाचं व्यसन असलेल्या एका तरुणाचा मी सल्लागार-मदतनीस होतो. काही काळाने तो त्यातून पूर्णपणे बाहेर आला. त्याचं सगळं व्यवस्थित चाललं होतं. अचानक तो काही दिवस गायब झाला. त्या काळात पुन्हा तो व्यसनाकडे वळला. तो पुन्हा चर्चमध्ये आला, तेव्हा मला म्हणाला की, तो माझ्यावर चिडला होता. तो पुन्हा व्यसनाकडे वळला, त्याला मीच जबाबदार होतो म्हणे. मला धक्का बसला. त्याच्या म्हणण्याचा अर्थ होता, ''मी स्वत:त बदल करायचं नाकारत आहे, हा तुमचा दोष आहे.'' वास्तविक त्याच्या व्यसनाला इतर कोणी नसून तो स्वत:च जबाबदार होता.

जेव्हा भलतंच काहीतरी होऊन बसतं, तेव्हा आणखी एकाला दोष देण्याकडे आपला कल असतो. तो म्हणजे सैतान. आपल्याला ठाऊक आहे की, सैतान खरोखरच अस्तित्वात असतो. आपलं आयुष्य उद्ध्वस्त करायच्या प्रयत्नात तो सदैव असतो. 'चोरा, मारा, सर्वनाश करा' हे त्याचं ब्रीद असतं. पण आपण त्याच्या आमिषाला बळी पडलो नाही, तर तो

काहीही करू शकत नाही. पण स्वत:च निर्माण केलेल्या परिस्थितीसाठी सैतानाला दोष देणारे कितीतरी लोक मी पाहिले आहेत. कोणत्यातरी स्तरावर आपली परवानगी असल्याशिवाय शत्रू आपल्या आयुष्यावर अतिक्रमण करू शकत नाही. समजा, त्याने तसा प्रयत्न केलाच, तर देवाच्या 'शब्दा'चे अधिकार वापरून आपण त्याला पळवून लावू शकतो.

आर्थिक क्षेत्रात लोक सैतानाला त्याच्या अपराधांच्या तुलनेत जास्त दोष देतात. वास्तविक स्वत:च्या चुकीच्या सवयींमुळे बरेच लोक आर्थिक कोंडीत सापडलेले असतात. आपल्या बँकेची खाती आपण नीट तपासली, तर आपल्या लक्षात येईल की, या समस्येचं मूळ अतोनात खर्च करायचं व्यसन आणि ऐपतीबाहेरचा खर्च हेच आहे. आपण कमावतो त्यापेक्षा जास्त खर्च केला, तर आपण गोत्यात येतो. आपल्या चुकीच्या निर्णयांसाठी सैतानाला दोष देता येणार नाही.

वैवाहिक जीवनाच्या, कुटुंबाच्या बाबतीतही हेच होत असं. ''माझ्या वैवाहिक जीवनाची जी परिस्थिती आहे, त्याला मीच जबाबदार आहे. माझी मुलं असं वागतात, त्याला मी जबाबदार आहे. माझ्या स्वार्थामुळेच माझी ही अवस्था झाली आहे,'' असं म्हणा आणि बघा कशी प्रभावशाली घटना घडते ते. आपल्या अवस्थेसाठी इतरांना दोष देण्यात अर्थ नाही.

जबाबदारी म्हणजे व्यवस्थापन. आध्यात्मिक दृष्टिकोनातून आपण आपल्या आयुष्याचं व्यवस्थापन केलं पाहिजे. जेव्हा आपण आपल्या जीवात्म्यावर प्रभुत्व मिळवू शकतो, तेव्हा आत्म्यावर आणि शरीरावर ते आपोआपच मिळतं.

देवाचा 'शब्द' दुधारी तलवारीपेक्षाही जास्त धारदार आहे, जीव आणि आत्मा यांमधील रेषासुद्धा तो दुभंगू शकतो, याविषयी हिब्रूज ४:१२मध्ये सांगितलं आहे. या उताऱ्यावरून आपण असा निष्कर्ष काढू शकतो की, फक्त देवाचा 'शब्द'च माणसाच्या अंतरंगात खोलवर शिरू शकतो. माणसात खरंखुरं परिवर्तन घडवून आणणारी ती एकमेव गोष्ट आहे.

मॅथ्यू १२:३५मध्ये म्हटलं आहे की, माणसाच्या आत असणाऱ्या भांडारावरून बाहेर काय घडणार ते ठरतं. जर तुमच्या हृदयात चांगल्या गोष्टी भरलेल्या असतील, तर तुमच्या आयुष्यात चांगल्याच गोष्टी प्रकट होतील. पण तुमच्या हृदयात जर भौतिक, अपवित्र गोष्टींची भरताड झाली असेल, तर तुमच्या आयुष्यात तशाच गोष्टी येत राहतील. तुमच्या अंतरंगात जो खजिना

भरला असेल, तोच शेवटी बाहेरही दिसतो. हे तत्त्व जबाबदारी आणि आयुष्याच्या व्यवस्थापनात कुठे बसतं? आपल्या हृदयात बीजं पेरण्याची जबाबदारी आपली आहे. त्या बीजांवरूनच, आपल्या आयुष्यावर त्यांचा काय परिणाम होणार, हे निश्चित होतं. परिवर्तन घडण्यासाठी आपण देवाच्या 'शब्दा'चं बीज आपल्या जीवात्म्यात रोवलं पाहिजे. त्यातच आपलं अंतरंगापासून बाह्यांगापर्यंत परिवर्तन करायची शक्ती त्यातच असते.

आपला जीव किंवा हृदय हे आपल्या अस्तित्वाचा गाभा आहे. म्हणूनच आपण आपल्या या भागाची काळजी कशी घेतो, यावर आपलं भविष्य ठरतं. आपल्या आध्यात्मिक आयुष्याचं योग्य व्यवस्थापन करण्यासाठी पुढील पाच गोष्टी करणं आवश्यक आहे.

प्रार्थनेच्या वेळाचा योग्य उपयोग करा

आपण देवाशी जोडलेले असलो पाहिजे. रोज त्याच्या संपर्कात राहण्यासाठी संकल्पित कामाच्या यादीत प्रार्थना ही वरच्या क्रमांकावर असली पाहिजे. देवाच्या उपस्थितीत केलेल्या प्रार्थनेद्वारे आणि त्याच्या संगतीत घालवलेल्या वेळामुळे आपण आपल्या जिवात रोजच्या रोज नवचैतन्य भरत असतो.

मी जेव्हा पहाटे प्रार्थना करत, 'शब्द' वाचत, भजनं-स्तवनं गात देवाच्या सहवासात वेळ घालवतो; तेव्हा मी अंतर्यामी ताजातवाना होतो. देवाबरोबरच्या या प्रार्थनेच्या काळात मला एवढी शक्ती मिळते की, काहीही अंगावर आलं तरी ते शिंगावर घेण्याएवढा आत्मविश्वास मला मिळतो. लक्षात ठेवा, प्रार्थना हे स्वगत नसून तो संवाद असतो. याचा सोपा अर्थ असा की, तुम्ही देवाशी बोलणं जेवढं महत्त्वाचं आहे, देवाला तुमच्याशी बोलू देणंही तेवढंच महत्त्वाचं आहे. कित्येक गोष्टी तुम्हाला सांगाव्यात, अशी त्याची इच्छा असते. त्यामुळे तुमच्या आत्म्याला नवचैतन्य मिळेल आणि तुमच्या आयुष्याला योग्य दिशा मिळेल. देवासोबतच्या प्रार्थनेच्या वेळाच्या या महत्त्वाच्या बाजूकडे दुर्लक्ष करू नका.

हृदयाला जपा

तुमचं हृदय हे सुपीक जमिनीसारखं आहे. त्यात काहीही पेरलं तरी ते उगवतं. मी त्याची बागेशी तुलना करतो. त्यात योग्य बी पेरलं, तर इष्ट फळ मिळतं. त्याच धर्तीवर तुमच्या हृदयाच्या बागेत तण वाढणार नाही याची

तुम्ही काळजी घेतली पाहिजे. तुम्ही नेहमी तुमच्या हृदयात कोणत्या गोष्टींना प्रवेश देता? तुम्ही जे पाहता, जे ऐकता ज्याविषयी बोलता त्या सर्व भौतिक गोष्टींमुळे तुमचा जीवात्मा दूषित होतो आणि 'तुम्हाला वाईट फळ' मिळतं का? की तुम्ही तुमचे डोळे, कान, तोंड देवाच्या 'शब्दा'ला समांतर ठेवून जीवात्म्याचं फळ मिळवता? तुमच्या जीवनाच्या सर्व गोष्टी हृदयात उत्पन्न होत असतात. म्हणून तुमच्या हृदयावर अपवित्र गोष्टींचा प्रभाव पडणार नाही, याची दक्षता घ्या.

नाती जपा

आपण ज्या लोकांच्या सहवासात असतो, त्यांचा प्रभाव आपल्यावर पडण्याची दाट शक्यता असते. म्हणूनच ज्या लोकांची जीवनशैली, नैतिकता आणि मूल्यं देवाच्या आदर्शानुसार नसतात, त्यांची संगत टाळा अशी सूचना 'शब्द' देत असतो. याचा अर्थ असा नाही की, तुम्ही सर्वांशी प्रेमाने वागू नका. पण आध्यात्मिकदृष्ट्या अनुरूप नसणाऱ्या व्यक्तींशी जास्त सलगी करू नका. संबंधांचं योग्य व्यवस्थापन केलं नाही, तर आपल्यावर दुष्परिणाम होण्याचा संभव असतो. कोणाशी किती संबंध ठेवावे याच्या निवडीला आपणच जबाबदार असतो.

'शब्द' आत्मसात करण्याची जबाबदारी घ्या

शरीर सुस्थितीत ठेवण्याकरिता आपण अन्न खातो. त्याप्रमाणे आपल्या जीवात्म्यालाही योग्य आहार दिला पाहिजे. तो आहार फक्त देवाच्या 'शब्दा'तूनच मिळतो. देवाच्या 'शब्दा'पासून मिळणारं पोषण रोज देऊन आपण जीवात्म्याला बळकट केलं पाहिजे.

आपण आपली विचारशैली एकतर 'शब्दा'शी मिळतीजुळती होईल अशी विकसित करत असतो किंवा आपण जगाप्रमाणे विचार करत असतो. अधलंमधलं असं काही नसतंच. दोन्ही मानसिकता शब्द आणि प्रतिमा यांच्या माध्यमातून येतात. जगातील शब्द आपली विचारपद्धती ठरवतात तर देवाच्या 'शब्दा'तील शब्द आपली मानसिकता ठरवतात. याचाच अर्थ, आपण आपल्या मनाला काय खाद्य पुरवतो त्यावर आपलं वैचारिक जीवन ठरतं. आपल्या जीवात्म्याचं पोषण करण्यासाठी आपण 'शब्दा'च्या सान्निध्यात किती वेळ घालवतो, त्याचं प्रतिबिंब आपल्या तोंडातून बाहेर पडणाऱ्या शब्दांत दिसतं. दुर्दैवाने, खाली बसायची, बायबल उघडायची, ते

वाचायची, त्याचं मनन करायची सक्ती देव आपल्यावर करत नाही. 'शब्दा'साठी आपण किती वेळ द्यायचा, ही पूर्णपणे आपली जबाबदारी असते.

स्तवन आणि पूजेच्या वेळाची जबाबदारी घ्या

स्तवन आणि उपासना या फक्त रविवारी चर्चमध्ये जाऊन करायच्या गोष्टी नसून ती जीवनशैली असली पाहिजे. देवाचं स्तोत्र म्हणणं म्हणजे कसलातरी धार्मिक व्यायाम नव्हे आणि उपासना म्हणजे देवासमोर धिम्या गतीने गात असलेलं गाणं नव्हे. देवाविषयीच्या कृतज्ञतेची अभिव्यक्ती म्हणजे स्तोत्र. त्यामुळे देवाने बोललेलं आपल्याला ऐकू येऊ लागतं. उपासना म्हणजे देवाने आपल्याला दिलेल्या आदेशाचं पालन. आपल्या देवाशी असलेल्या जिव्हाळ्याच्या नात्यातून ती जन्माला येते.

स्तवन हे चर्चमधील सभांपुरतंच मर्यादित नाही. खरंतर, तुम्ही कुठेही तोंड उघडून देवाची स्तुती करू शकता. त्याने तुमच्यासाठी ज्या काही विलक्षण गोष्टी केल्या, त्या स्पष्टपणे सांगा आणि त्याचे आभार माना. तुमच्या आयुष्यात त्याचं जे स्थान आहे, त्याबद्दल त्याचं स्तवन करा. गाऊन, नाचून, टाळ्या वाजवून मोठ्या आवाजात देवाचं स्तवन केलंत, तर शत्रू दुर्बल होऊन जातो. शिवाय त्या स्तवनामुळे त्या परिस्थितीत देवाची शक्ती प्रवाहित होते. खास देवाच्या स्तवनासाठी म्हणून रोज थोडा तरी वेळ बाजूला काढा. याचा परिणाम म्हणून तुमच्या जीवात्म्याला काय ऐकू येतं तिकडे लक्ष द्या. देव तुम्हाला जे काही करायला सांगेल ते करून त्याची उपासना करा.

आपल्या आयुष्यात, जबाबदारी घेण्याबरोबरच आणखी काही गोष्टी करणं आवश्यक आहे. त्यांच्याविषयी बोलू या.

दुसरी पायरी : तुमच्या श्रद्धांचा पुनर्विचार करा

मी अगोदरही बोललो आहे की, देवाच्या 'शब्दा'च्या विरुद्ध असणाऱ्या श्रद्धा आणि मानसिकता आपल्या मनावर बिंबवलेल्या असतात. आपल्या श्रद्धा काय आहेत आणि आपण त्या का मानतो, याचं बारकाईने मूल्यमापन केल्याशिवाय परिवर्तन घडूच शकणार नाही. उदाहरणार्थ, जर विषयवासना ही तुमची समस्या असेल, तर तुमची मानसिकता तशी कशामुळे झाली. तुमच्या या दोषाकडे दुर्लक्ष करणाऱ्या कोणत्या भावनेला, विचाराला तुम्ही तुमच्या जीवात्म्यात शिरू देता, या प्रश्नांची उत्तरं तुम्ही

शोधली पाहिजेत.

एखादी वर्तणूक देवाच्या 'शब्दा'नुसार चुकीची आहे, असं तुमच्या लक्षात आलं की, तुमची जुनी श्रद्धा टाकून त्याजागी सत्याची स्थापना करायचा निर्धार करा. देवाचा 'शब्द' त्याविषयी काय सांगतो ते शोधा आणि खोट्या गोष्टीवर विश्वास ठेवण्याऐवजी सत्याला धरून रहा.

तिसरी पायरी : जुन्या गोष्टी टाकून द्या

ही पायरी जास्तच आव्हानात्मक आहे. कारण ती आनंददायक, उपभोग्य गोष्टींपासून दूर जायला भाग पाडते. लोक म्हणतात, धार्मिक वृत्तीने जगणं, हे कंटाळवाणं असतं आणि आपण जेव्हा येशू ख्रिस्ताला अनुसरतो तेव्हा आपण बऱ्याच गोष्टींना मुकतो. पण प्रत्यक्षात मात्र देवाच्या आज्ञा पाळल्यामुळे पाप आणि अवज्ञेचे दुष्परिणाम तसंच क्षोभ, गोंधळ यांना आपण मुकतो. या गोष्टींना मुकायला मला काहीही वाटणार नाही.

तुमच्या जुन्या गोष्टींना सोडायला लावायची बळजबरी देव तुमच्यावर करणार नाही. तुमच्या आयुष्यावर अंमल गाजवणाऱ्या वासनांच्या आहारी जायला प्रतिकार करणं, हा शेवटी तुमचा वैयक्तिक निर्णय आहे. हा निर्णय तुम्ही घेतलात, म्हणजे अर्धी लढाई तुम्ही जिंकल्यासारखंच आहे. आनंदाची गोष्ट म्हणजे जर तुम्हाला त्यातून खरोखरच बाहेर पडायचं असेल तर देव तुम्हाला मदत करील.

आध्यात्मिक परिपक्वता ही तुम्ही किती वर्षं पापमुक्त होत आला आहात यावरून किंवा तुम्ही किती काळ चर्चचे सदस्य आहात, त्यावरून ठरत नसते. तुम्ही सातत्याने जे निर्णय घेता त्यावरून आणि ते निर्णय 'शब्दा'शी जुळणारे आहेत का, यावरून ती ठरते. त्याचप्रमाणे कठीण प्रसंगी आपण 'शब्दा'चा आधार कसा घेतो, यावरूनही आपला परिपक्वतेचा स्तर ठरतो. आपल्या निर्णयांवरून आपण एखाद्या क्षेत्रात कसे विकसित होत आहोत तेही कळते.

चौथी पायरी : तुमच्या नवीन विचारपद्धतीचं पुनरावलोकन करा

आपल्या मनात प्रवेश करणाऱ्या नव्या संकल्पनांचा आपण सतत करत असलेला विचार आणि मनन यांचा अपरिहार्य परिणाम म्हणजेच आपल्यातील बदल. ही तत्त्वं आपल्या डोळ्यांसमोर राहतील, आपल्या कानांवर पडतील अशी ठेवून त्यांची पुन्हापुन्हा उजळणी करण्यासाठी रोज

वेळ काढणं महत्त्वाचं आहे. सत्याच्या साहाय्याने आपण मनाचं नूतनीकरण करत राहिलो आणि आपण आत घेत असलेल्या नव्या माहितीचं पुनरावलोकन करत राहिलो तर आपण आपल्या जुन्या मानसिकतेकडे पुन्हा वळण्याची शक्यता कमी होते.

पाचवी पायरी : तुमचे विचार उच्च स्वरात दुमदुमू द्या

विचार उच्च स्वरात दुमदुमणं म्हणजे खरंतर ते मोठ्याने उच्चारणं. हा श्रद्धेचा, विश्वासाचा कबुलीजबाब आहे आणि त्यामुळे देवाच्या 'शब्दा'तील सत्याच्या पायावर आपलं हृदय स्थिर करायला मदत होते. रोमन्स १०:१०मध्ये म्हटलं आहे, ''हृदयामुळे माणूस सदाचरणी होतो. आणि तोंडाने कबुलीजबाब देऊन तो पापविमोचन करतो.'' देवाच्या 'शब्दा'च्या कबुलीजबाबामुळे आपण मोक्षाच्या मार्गावर चालू लागतो. आपलं मन पुन्हा शांती, समग्रता आणि देवाशी एकसंधता असलेल्या स्थानी जातं. प्रत्येक वेळी 'शब्दा'चा उच्चार केला की, तो आपल्या कानात शिरतो व हृदयात स्थिरावतो. कबुलीजबाबाद्वारेच आपण आपल्या मनावर अतिक्रमण करणारे अपवित्र विचार टाकून देऊ शकतो.

शब्दांतूनच विचार उत्पन्न होतात. त्यामुळे बोलण्याची पद्धत बदलून तुम्ही तुमच्या प्रबळ विचारधारेत परिवर्तन करू शकता. आपण कसे अपयशी ठरलो आहोत, आपल्या आयुष्याचा कसा विचका झाला आहे, याविषयी वारंवार बोलत राहण्यापेक्षा तुम्हाला काय व्हायचं आहे आणि कुठे पोहोचायचं आहे, त्याविषयी बोला. तुम्ही कदाचित तिथपर्यंत पोहोचला नसाल, पण तुम्हाला आयुष्यात काय हवं आहे हे बोलत राहाल, तर कधी ना कधी ते वास्तवात येईलच.

एखाद्या वर्तणूक समस्येवर किंवा व्यसनमुक्तीसाठी तुमचा संघर्ष चालू असेल तर तुम्ही त्यातून मुक्त झाल्याचं फक्त चित्र बघण्याऐवजी मोठ्याने म्हणा, ''मी व्यसनातून मुक्त झालो आहे. माझा जीव, आत्मा, शरीर समृद्ध झालं आहे. मी जुन्या सवयींमध्ये अजिबात अडकलेलो नाही.'' बदलाच्या प्रक्रियेत तोंडाचाही सहभाग होतो तेव्हा त्याचे चांगले परिणाम होण्याचा वेगही वाढतो.

तुम्ही सध्या कोणत्याही समस्येला सामोरं जात असलात तरी हातपाय गाळू नका. अजून वेळ गेलेली नाही. व्यसनं, वाईट सवयी, चुकीच्या मानसिकता यासारख्या तुमच्या समस्या देवाच्या 'शब्दा'समोर टिकाव धरू

शकणार नाहीत. एकंदर परिस्थिती कदाचित गोंधळाची, अव्यवस्थेची आहे, असं वाटेल. पण अव्यवस्थेतून सुव्यवस्था करण्यात देव पटाईत आहे. तुम्हाला क्षणभरासाठीही सैतानाकडून पराभूत व्हायची गरज नाही. या सगळ्या प्रक्रियेत कदाचित तुम्ही रडकुंडीला याल, पण सतत त्याविषयी स्पष्टपणे, मोठ्याने बोलत रहा आणि पहा, तुम्ही कसे त्यातून बाहेर येता ते!

तुम्ही बदलता आहात! तुमच्यात परिवर्तन होत आहे. देवाच्या 'शब्दा'च्या शक्तीमधील विश्वासाला मुक्त करा; म्हणजे तुमच्यात अंतर्बाह्य बदल होतील. तुम्ही जिंकला आहात! तुम्ही विजयी आहात!

★

२री आवृत्ती

मी का नाही?

लेखिका
पारू नाईक

किंमत - १३०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.



'मी का नाही?' हा प्रश्न विचारू धजणाऱ्या तृतीयपंथी समाजाची ही कहाणी! या कादंबरीची नायिका असलेल्या नाझच्या वाट्यालाही हे दु:ख येते. पण तिचे वडील सोडून सगळे कुटुंब, विशेषत: तिची आई तिला भक्कम पाठबळ देते. या पाठबळाच्या जोरावर नाझ 'हिजडा समाज' स्थापन करते. यातून ती या समाजाला स्वावलंबी आणि सुसंघटित तर करतेच; पण प्रसंगी कठोर भूमिका घेऊन त्यांचे प्रश्नही सोडवते. हिजडा समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी एक चळवळ उभारते. समाजात पदोपदी होणारा अपमान, टिंगलटवाळी यांना दाद न देता निर्भीडपणे स्वत:च्या प्रश्नांसाठी न्यायालयापर्यंत धडक मारते.

'मी का नाही' हा एक शोध आहे. तो किती भेदक आहे, हे कादंबरी वाचताना उमगत जाते. त्याचे उत्तर शोधताना वाचक अस्वस्थ तर होतोच; पण निरुत्तरही होतो!

११वी आवृत्ती

खेकडा

लेखक
रत्नाकर मतकरी

किंमत - १००/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.

'खेकडा' या कथासंग्रहातील बहुतेक सर्वच कथांमधून जे भय दाटून राहिलेले आहे, ते वाचकाला कडकडून दंश करणारे आणि जिव्हारी झोंबणारे आहे.या भयात वाचकाचे अवघा मनोव्यापार झपाटून टाकण्याची शक्ती आहे. या कथा वाचून अंगावर जो सरसरून काटा उभा राहतो, तो दीर्घ काळ तसाच टिकून राहतो; कारण या कथा मूलभूत वास्तव कधी विसरत नाहीत.

जसे 'तुमची गोष्ट' आरंभीच लेखक सांगतो, 'ही तुमची गोष्ट आहे म्हणजे तुमच्याही बाबतीत घडू शकेल अशी' आणि शेवटीही निक्षून सांगतो, 'तुमची म्हणून सांगितलेली ही गोष्ट तुमची नव्हेच; एक आपली शक्यता सांगितली एवढेच.' पण तरीही या कथेत ज्या थरारक अनुभवांचे निवेदन आहे, त्याचा प्रभाव इतका विलक्षण आहे की, अपराधाचा स्पर्श तुमच्या मनीमानसी नसूनही, तुमच्या गळ्याभोवती फासाचा स्पर्श झाल्याची भावना तुम्ही अनुभवता.

रत्नाकर मतकरी हे एक सिद्धहस्त कथाकार आहेत आणि या कथासंग्रहातील कथा मराठी भाषेत तरी दुर्मिळ अशा आहेत. या कथांचे अन्य भाषांतून अनुवाद झाले तर ते फक्त मतकरींचेच प्राप्त यश वृद्धिंगत करतील असे नव्हे, तर परिणामी मराठी भाषेलाही ललामभूत ठरतील.

नव्या विज्ञानकथा

संकरित

लेखक - डॉ. संजय ढोले

विज्ञानकथाकार डॉ. संजय ढोले हे पुणे विद्यापीठातून भौतिकशास्त्र विषयात पीएच.डी. व सध्या विद्यापीठाच्याच भौतिकशास्त्र विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. न्युक्लिअर, प्रवेगक, किरण, स्मृतिपटले, अर्धवाहक पदार्थ, निर्वाहक पदार्थ, स्फटिके यांसारख्या भौतिकशास्त्रातील उपशाखांमधून संशोधन सुरू. संशोधनानिमित्त विविध देशांमध्ये वास्तव्य व तेथील नामवंत संशोधन संस्थांशी आणि विद्यापीठांशी देवाण-घेवाण.'प्रतिशोध' व 'प्रेमाचा रेणू' आणि 'अश्मजीव' नावाचे विज्ञानकथासंग्रह प्रसिद्ध. 'मराठीतील विज्ञानकथा', 'दरवळ', 'मोहर', 'यांनी घडवलं सहस्रक' यांसारख्या संपादित प्रकाशनात सहभाग. 'अंतराळातील मृत्यू' या विज्ञानकथेचा पुणे विद्यापीठांतर्गत महाविद्यालयीन अभ्यासक्रमात समावेश, 'प्रेमाचा रेणू' या विज्ञानकथा संग्रहाचा पुणे विद्यापीठाअंतर्गत एम.ए.च्या अभ्यासक्रमात (शैक्षणिक स्वायत्तता) समावेश. 'सोन्याची खाण' या विज्ञानकथेस अखिल भारतीय बाल-कुमार साहित्य संमेलनातर्फे दिला जाणारा 'गोपीनाथ तळवलकर' उत्कृष्ट कथा पुरस्कार (२००५), र. धों. कर्वे, ललित विज्ञान वाङ्मयीन पुरस्कार 'प्रेमाचा रेणू' या विज्ञान कथासंग्रहास (२००८). महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड संचालित न. चिं. केळकर ग्रंथालयाचा 'साहित्य साधना' पुरस्कार 'प्रेमाचा रेणू' या विज्ञानकथा संग्रहास (२०१०). 'अश्मजीव' या विज्ञानकथा संग्रहास 'संत तुकडोजी महाराज' ललित विज्ञान वाङ्मय पुरस्कार, (२०११). मराठीतून विज्ञान प्रसारासाठी इंडियन फिजिक्स असोसिएशनतर्फे 'मो. वा. चिपळोणकर' पुरस्कार (२०१३). महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणेतर्फे विज्ञानविषयक लेखनासाठी 'गो. आ. परांजपे' विशेष ग्रंथकार पुरस्कार, (२०१५).

विज्ञानकथेचे बदलते स्वरूप



लेखक - डॉ. संजय ढोले

डॉ. नागनाथ कोतापल्ले यांच्या प्रस्तावनेतील काही भाग

आज मराठीतील विज्ञान साहित्य समृद्ध होत आहे. विविध माहितीपर मजकूर जसा मराठीमध्ये येत आहे त्याचप्रमाणे कथा-कादंबरी या साहित्यरूपांमधूनही ते व्यक्त होत आहे. मराठी माणसाची विज्ञानविषयक जाणीव समृद्ध करण्याचे कार्य हे विज्ञान साहित्य करीत आहे. हे मराठी साहित्याच्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहे. निरंजन घाटे, जयंत नारळीकर, पंडित विद्यासागर, बाळ फोंडके, लक्ष्मण लोंढे, यशवंत देशपांडे, द. व्यं. जहागीरदार आणि इतर काही विज्ञान लेखक विज्ञान साहित्याचा प्रवाह समृद्ध करीत आहेत. त्यात आता आणखी एका लेखकाचा समावेश करावा लागेल. डॉ. संजय ढोले हे ते लेखक होत. गेल्या एक तपाहून अधिक काळापासून ते विज्ञानकथा लिहीत आहेत आणि त्यांचा चौथा विज्ञानकथांचा संग्रह प्रकाशित होत आहे.

विज्ञानकथेमध्ये विज्ञानातील एखादी कल्पना असते, अगर एखादे संशोधन असते. पुष्कळदा ती कल्पना सामान्य वाचकांच्या आकलनापलीकडीलही असते. परंतु डॉ. संजय ढोले यांचे वैशिष्ट्य असे की, अशी कुठलीही कल्पना ते वाचकाच्या आकलनकक्षेत आणतात. त्यामुळे त्यांची कथा वाचकांच्या मनाचा चटकन ताबा घेते, परंतु त्याहीपेक्षा

महत्त्वाचे म्हणजे त्या त्या कल्पनेच्या निमित्ताने येणारी माणसे डॉ. संजय ढोले यांना महत्त्वाची वाटतात. त्यांचे मनोविश्व त्यांना महत्त्वाचे वाटते. त्या व्यक्तीच्या भोवतीचा समाज आणि सामाजिक ताणतणाव महत्त्वाचे वाटतात. त्यामुळे डॉ. संजय ढोले यांची कथा एकाच वेळी विज्ञानकथाही असते आणि सामाजिक ताणतणाव व्यक्त करणारी सामाजिक कथाही असते. उदाहरणार्थ, या कथासंग्रहातील 'परिवर्तन' ही कथा पाहा. या कथेचा प्रारंभ एखाद्या रहस्यकथेसारखा होतो. अंधारातून काचा बंद करून सुसाट वेगाने धावणारी कार एका हॉटेलपुढे थांबताच संरक्षकांचे कवच फोडून रुबाबदार पावले टाकीत निघालेला राजन अन् अनपेक्षितरीत्या होणारा गोळीबार हे सारेच एखाद्या रहस्यकथेप्रमाणे आहे. परंतु रहस्यात कथा अडकून पडत नाही. हृदयाची चाळणी झालेल्या राजनला इस्पितळात दाखल केले जाते आणि तो मोठा गुंड आहे हे लक्षात येते. आपल्याला वाटते आता लेखक गँगवॉरची कथा सांगतो की काय पण तसे होत नाही. त्याला कसे वाचवायचे हाच सगळ्यांच्या पुढचा महत्त्वाचा प्रश्न आहे. हृदय बसवणे आवश्यक ठरते आणि येथून पुढे या कथेत विज्ञानाचा प्रवेश होतो. दुसऱ्याचे हृदय मिळणार कसे आणि हे शरीर ते स्वीकारणार तरी कसे हा अत्यंत अवघड प्रश्न उभा राहतो. मग त्याच अवयवाच्या ऊति विकसित करून तो अवयव तयार करता येतो हे तंत्र येथे वापरले जाते. संशोधक त्याच हृदयाच्या ऊति विकसित करतात आणि संपूर्ण हृदय तयार होते. ते शरीरामध्ये बसवले जाते. राजन पूर्ववत होतो.

येथे विज्ञानातील एक कल्पना असली तरी त्या निमित्ताने लेखकाने वैद्यकीय विश्व उभे केले आहे. ऊति विकसित करणाऱ्या शास्त्रज्ञांचे विश्व उभे केले आहे आणि त्यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे गुंडांचे संपूर्ण विश्व त्यांच्या निष्ठा, त्यांच्या दिलदारपणासह येथे उभे करण्यात आले आहे. त्यामुळे ही विज्ञानकथा सामाजिक ताणतणाव व्यक्त करणारी कथाही होऊन जाते.

डॉ. संजय ढोले यांच्या कथेचे आणखी एक फार महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे विज्ञानाचा वापर समाजातील गरिबांच्या, शोषितांच्या उत्थानासाठी व्हायला पाहिजे असे त्यांना फार तीव्रतेने वाटते. त्यांच्या बहुसंख्य कथांचे नायक शास्त्रज्ञ आहेत. परंतु या सगळ्यांनी आपले खेड्याशी असणारे नाते टिकवून ठेवले आहे. म्हणजे ते प्रयोगशाळेत हरवून गेले नाहीत की शहराच्या झगमगाटामध्येही हरवून गेले नाहीत. सतत त्यांना आपला गाव आठवतो.

गावातल्या लोकांची आपल्या संशोधनामुळे प्रगती झाली पाहिजे असे त्यांना वाटत राहते. हे वाटणे डॉ. संजय ढोले फार समर्थपणे व्यक्त करतात. उदाहरणार्थ, 'उत्परिवर्तन'मधील डॉ. नेरकर बियाणांवर न्यूट्रॉन प्रक्रिया करून घेतात आणि गावाकडच्या शेतीत ती बियाणे लावतात. त्यामुळे शेतकऱ्यांना भरघोस पीक प्राप्त होते. आजूबाजूची खेडीही समृद्ध होतात. यात डॉ. नेरकर आणि त्यांच्या विद्यार्थिनीला प्राण गमवावे लागतात. कारण न्यूट्रॉन प्रक्रिया केलेल्या आंब्याची झाडे विद्युत्भारित होऊन गेलेली असतात. हे कोणाच्याच लक्षात येत नाही पण त्यांचे सहकारी शास्त्रज्ञ असलेले डॉ. संपत भोसेकर मात्र या रहस्याचा शोध घेतात. त्यातून संपूर्ण परिसर विजेच्या दृष्टीने समृद्ध होऊन जातो. म्हणजे डॉ. नेरकरांना प्राण गमवावे लागले तरी त्यांच्या संशोधनामुळे आणि त्यांच्या आंतरिक इच्छेमुळे सगळा ग्रामीण परिसर उजळून निघतो.

'कोळिष्टक'सारख्या कथेतही कोळ्यांची जाळी शेतांच्या बांधावर निर्माण केली तर पिकावर पडणाऱ्या किडीचा नाश होऊ शकतो असे डॉ. शरणकुमार मगरे यांना वाटते आणि ते आपल्या गावाकडे तो प्रयोग करतात. त्यांना एका मर्यादेपर्यंत यशही येते किंवा 'दुर्गम्य' कथेतील दोन्ही शास्त्रज्ञ आपल्या गावाशी, तेथील आदिवासी पाड्याशी अत्यंत जिव्हाळ्याचे नाते ठेवून आहेत. हा आजचा जगभराचा कळीचा प्रश्न आहे. दहशतवादी कारवाया कशा रोखाव्यात आणि मानवी संहार कसा थांबवावा हे निदान भारताला तरी कळेनासे झाले आहे. परंतु 'मोहीम फत्ते' यामध्ये मात्र गर्दीच्या ठिकाणी नेमका बॉंब कोठे ठेवला गेला आहे ते शोधण्याची यंत्रणा विकसित करता येऊ शकते हे डॉ. संजय ढोले यांनी सांगितले आहे. अंतरिक्षातील उपग्रह, संगणक, शास्त्रज्ञ आणि पोलीस यंत्रणा यांच्यातील समन्वयामधून गर्दीत ठेवलेले बॉंब सापडू शकतात असे डॉ. ढोले यांनी दर्शविलेले आहे. 'उद्ध्वस्त' या कथेमध्येही संशोधनामधून दहशतवादी कारवाया नियंत्रणात आणू शकता येतात हे त्यांनी सांगितले आहे. कोमामध्ये गेलेल्या व्यक्तीच्या मदतीला रोबो देता येऊ शकतो आणि त्यामुळे अशा व्यक्तीच्या नातेवाइकांवरील ताण कमी होऊ शकतो हे डॉ. संजय ढोले यांनी 'अस्तित्व' या कथेतून सूचित केले आहे. तर 'अखेर तो परतला' या कथेमध्ये अपघातात स्मृती गमावलेल्या रुग्णाला कृत्रिम स्मृतिपटल लावता येऊ शकते हेही त्यांनी दाखविलेले आहे. समीर वेलणकर या अपघातग्रस्त व्यक्तीची संपूर्ण स्मृती

गेलेली आहे परंतु मज्जासंस्थेवर काम करणाऱ्या संशोधकामुळे त्याला विज्ञानाने विकसित केलेले कृत्रिम स्मृतिपटल बसविले जाते व तो पूर्ववत होतो. थोडक्यात काय की, विज्ञानातून ग्रामीणांना, खेडुतांना, शोषितांना आणि संकटग्रस्तांना मदत होऊ शकते किंवा त्यांच्यासाठी उपयोगी असणारे संशोधन झाले पाहिजे व ते होऊ शकते हेच डॉ. संजय ढोले त्यांच्या कथांमधून सांगत आहेत. तसेच दहशतवादासारख्या आंतरराष्ट्रीय प्रश्नावरही विज्ञानातील संशोधनामधून अचूक मार्ग सापडू शकतात यावर ते ठाम आहेत. त्यामुळेच त्यांच्या कथा एकूण विज्ञान साहित्यात वेगळ्या ठरतात. तसेच विज्ञानाचा आधुनिक काळात क्रूरकर्मासाठीही वापर होऊ शकतो, हेही ते सूचित करतात. 'संकरित' ही कथा हेच सांगू पाहते. याचा अर्थ असा की, मानवी जीवनाला विज्ञान हे केवळ वरदान नाही तर त्यापासून फार मोठा धोकाही आहे हेही ते सूचित करतात. म्हणून 'विज्ञान कशासाठी?' हा पुन्हा महत्त्वाचा प्रश्न ठरतो. हा प्रश्न ते उपस्थित करतात म्हणजे विज्ञानाकडे ते भाबडेपणाने बघत नाहीत, तर अत्यंत डोळसपणेच पाहतात हेच दिसते.

अमर्याद आहे, मानवी बुद्धीच्या कक्षेत न येणारा आहे म्हणून माणसाने नेहमी निसर्गापुढे लीन होऊन राहिले पाहिजे असे त्यांना वाटते. माणसाने विज्ञानाकडे भाबडेपणाने पाहू नये तसेच आपल्या बुद्धिमत्तेचा अहंकारही बाळगू नये याची जाणीव त्यांच्या कथांमधून सतत होत राहते आणि ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. 'उत्परिवर्तन'या कथेमध्ये संशोधक असणाऱ्या डॉ. नेरकर आणि त्यांच्या विद्यार्थिनीला प्राण गमवावा लागतो किंवा 'कोळिष्टक' मध्येही केलेल्या प्रयोगामुळे एका गावकऱ्याला जीव गमवावा लागलेला आहे. शेवटी शास्त्रज्ञ असणाऱ्या शरणकुमार मगरे यांना शेताच्या भोवती केलेला कोळिष्टक उभारण्याचा प्रयोग आग लावून नष्ट करावा लागतो. 'विचारवहन' या कथेत तर ही जाणीव फार स्पष्टपणे आणि प्रभावीपणे आली आहे. या कथेतील डॉ. बनकर यांनी मानवी मनातील विचार भावना ओळखण्याचे तंत्र विकसित केले आहे. हस्तस्पर्श झाल्यावर ज्या लहरी उमटतात ते वाचण्याचे तंत्र त्यांनी विकसित केले आहे. त्यातूनच आपल्याला मित्र मारून टाकणार आहेत हे त्यांना कळते. ते तशी तक्रार पोलिसांकडे करतात. कधी नाही ते पोलीस कार्यक्षम होतात. डॉ. बनकरांवर विश्वास ठेवून बनकरांबरोबर जातात. डॉ. बनकर मित्रांकडे पार्टीत सहभागी होतात आणि त्यांच्यावर प्राणघातक हल्ला होतो. गुन्हेगार म्हणजे त्यांचे मित्र काही

होण्याच्या आत पकडले जातात. डॉ. बनकरांनी विकसित केलेले तंत्र अचूक आहे याचा अनुभव येतो. ते त्यांच्या मृत्यूला चकवा देऊ शकलेले असतात. परंतु आरोपींना पकडून पोलीस स्टेशनमध्ये आणताना मात्र एका सुसाट ट्रकने डॉ. बनकरांच्या कारला धडक दिली आणि त्यातच त्यांचा अंत होतो. म्हणजे त्यांनी माणसाच्या मनातील ओळखून आपले मरण टाळलेले असले तरी ते काही क्षण पुढे ढकलले गेलेले असते. त्या दिवशी त्या क्षणी त्यांना मृत्यू येणार हे जणू ठरलेलेच असते. निसर्ग त्याच्या पद्धतीने कार्य करतो. त्याच्या व्यवहारात तुम्ही कितीही हस्तक्षेप केला तरी एका मर्यादेच्या पुढे मानवी बुद्धीला जाता येत नाही असेच डॉ. संजय ढोले यांनी सूचित केले आहे.

'सॉकर' या कथेचाही या संदर्भात विचार करता येईल. यातील संशोधक मूल न होऊ शकणाऱ्या जोडप्याला मुलाची प्राप्ती करून देतात. मानवी गुणसूत्रांची साखळी प्रयोग करून तोडतात आणि स्त्रीबीज आणि पुरुषबीजात पूरक होऊन जननक्षम होतात. त्या जोडप्याला मूल होते. एवढेच नाही तर हे मूल पुढे जागतिक फुटबॉलमध्ये विक्रम करणारे ठरते. अद्‌भुत चपळता, चिवटपणा आणि शक्ती त्या मुलात निर्माण झालेली असते. हा प्रयोग करताना ते संशोधक म्हणतात, मी निसर्गामध्ये हस्तपेक्ष करीत आहे हे बरोबर आहे की नाही या संभ्रमात ते असतात. तरीही प्रयोग करतात. एका प्रकारे लेखकाने निसर्गामध्ये हस्तक्षेप करू नये असेच सूचित केले आहे किंवा हस्तक्षेप केला तरी निसर्ग या हस्तपेक्षाचा नियम होऊ देत नाही हेही त्यांनी सूचित केले आहे.

फुटबॉलपटू पोराचा सर्वांगाने अभ्यास करण्याचा निर्णय आंतरराष्ट्रीय फुटबॉल संघटना घेते आणि शास्त्रज्ञ काळजीत पडतो. कारण त्याने त्या मुलाबाबत गुणसूत्राची केवळ साखळीच तोडली नव्हती तर त्या साखळीमध्ये माकडाचे आणि कोळ्याचे जीन्स टाकलेले असतात. त्यामुळे त्या खेळाडूमध्ये चिवटपणा आणि चपळता आलेली होती. हा एक अद्‌भुत प्रयोग होता आणि तो यशस्वी झालेला होता. त्या मुलावर संशोधन झाले असते तर हा सगळा प्रयोग जगजाहीर झाला असता आणि जगभर गोंधळ उडाला असता. ही त्या शास्त्रज्ञाची चिंता आहे. उद्या अशा प्रकारे जीन्स मिसळण्याची स्पर्धाही निर्माण झाली असती आणि तो एक वेगळा नियम तयार झाला असता. ही निसर्गामध्ये मोठीच ढवळाढवळ होती. परंतु निसर्ग अमर्याद

आणि अगम्य आहे. भारतीय खेळाडूंना घेऊन निघालेल्या विमानाला हवेतच अपघात होतो आणि 'रहस्य' रहस्यच राहते. या रहस्याचा नियम होऊ नये याची काळजी निसर्गानेच समर्थपणे घेतली होती. एका अर्थाने निसर्ग समजून घेणे आणि निसर्ग अमर्याद आहे हे मान्य करणे हेच शास्त्रज्ञांच्या दृष्टीनेही योग्य आहे असेच जणू डॉ. संजय ढोले यांना सुचवायचे आहे. एक फार महत्त्वाची जाणीव त्यांच्या कथालेखनामधून प्रकट होते. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये विविध ज्ञानक्षेत्रांच्या संकटाची कल्पना उदयास आली. जीवनाचे, निसर्गाचे यथार्थ आकलन करायचे असेल तर एकच एक ज्ञानशाखा पुरेशी होत नाही. त्या पलीकडेही खूप काही उरलेले असते. म्हणून विविध ज्ञानशाखांच्या मदतीने जीवनातील व निसर्गातील रहस्ये उलगडली पाहिजेत हा दृष्टिकोन पुढे आला. तसेच ज्ञानक्षेत्राचा विकास व्हायचा असेल तर आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन स्वीकारला पाहिजे असेही जगभरातल्या ज्ञानाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या प्रज्ञावंतांना वाटू लागले. त्यातूनच आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन आणि अभ्यास विकसित होत गेले. आज तर आंतरविद्याशाखीय अभ्यास हेच ज्ञानक्षेत्रामध्ये केंद्रस्थानी आले आहेत. या दृष्टिकोनामुळेच विविध विद्याशाखा जवळ येऊ लागल्या आहेत. 'पॉलिटिकल इकॉनॉमी' काय किंवा 'ॲग्रो इकॉनॉमिक्स' काय हे आंतरविद्याशाखीय अभ्यास आहेत. येथून पुढे शाखांचे वेगळेपण टिकविण्याला काही अर्थ उरणार नाही. आपण एखाद्याच विषयात विशेषीकरण (specialisation) करण्यालाही काही अर्थ राहणार नाही. ज्ञानक्षेत्रात झालेल्या बदलाची जाणीव डॉ. संजय ढोले यांच्या विज्ञानकथांमधून सतत होत राहते. त्यांच्या याआधीच्या कथा – संग्रहात विविध शास्त्रे आणि नॅनो टेक्नॉलॉजी यांच्या संयोगातून निर्माण होणाऱ्या एका वेगळ्या जगाचे चित्रण झालेले दिसते. या कथासंग्रहामध्येही हाच आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन सतत जाणवत राहतो. उदाहरणार्थ, 'उत्परिवर्तन'कथेमध्ये वनस्पतीशास्त्राचे संशोधक प्राध्यापक डॉ. नेरकर यांच्या डोक्यात बियाणांवर न्यूट्रॉनची प्रक्रिया केली पाहिजे अशी कल्पना येते व ते पदार्थ विज्ञान विभागातील डॉ. संपत भोसेकर यांची मदत घेतात. विज्ञानातील दोन ज्ञानशाखा जवळ येतात आणि संपूर्ण ग्रामीण परिसर बदलून जातो, याचे चित्रण 'उत्परिवर्तन'या कथेमूधन येऊन जाते.

जनुकीय संशोधनाला त्यांच्या कथांमधून बरेच प्राधान्य मिळालेले आहे.

उदाहरणार्थ, 'सॉकर'सारख्या कथेमध्ये माणसामध्ये माकड आणि कोळी यांचे जीन्स सोडले गेले असे चित्रण येते पण असे काही करायचे असेल, तर वैद्यकशास्त्राची मदत घ्यावी लागते. म्हणून 'सॉकर' या कथेमध्ये डॉक्टर आणि शास्त्रज्ञ एकत्र येतात आणि एका अफाट माणसाचा जन्म होतो. 'परिवर्तन' या कथेमध्येही डॉक्टर आणि मानवी जीन्सवर संशोधन करणारे शास्त्रज्ञ एकत्र येतात आणि एका व्यक्तीला जीवदान मिळते. 'अस्तित्व' आणि 'अखेर तो परतला' या दोन कथांमध्येही वैद्यकशास्त्र आणि मेंदूवर काम करणारे संशोधक यांच्या संयोगातून काही नवीन घडताना दिसते. पहिल्या कथेमध्ये अपघातात सापडून जायबंदी झालेल्या आणि कोमात गेलेल्या माणसाच्या मदतीला रोबो देता येऊ शकतो असे चित्रण लेखक करतात. अशा रुग्णांच्या मेंदूमध्ये व्यवहार चालू असतात. (जरी ते कोमात असले तरी) व त्या व्यवहाराचे रूपांतर संदेशात करून रोबोद्वारा त्यालाच मदत करता येऊ शकते. अर्थात या कथेमध्ये प्रयोग यशस्वी होतो, परंतु कोमातील रुग्ण आपले आयुष्यच रोबोमार्फत संपवून टाकतो, अशी ही कथा आहे. दुसऱ्या कथेत अपघातामध्ये एका रुग्णाची संपूर्ण स्मृती गेली आहे. त्याला बोलता येते. बाकीचे व्यवहार तो करतो परंतु त्याची स्मृती मात्र हरवून जाते. अशा वेळी कृत्रिम स्मृतिपटल निर्माण करण्याचे कार्य आय. आय. टी. मधील शास्त्रज्ञ करतात. हे स्मृतिपटल जोडले जाते व रुग्ण पूर्ववत होतो. म्हणजे येथे वैद्यकशास्त्र आणि तंत्रविज्ञान यांच्या एकत्रीकरणामधून एका रुग्णाला जीवदान मिळते. 'परिवर्तन' मध्येही एका ऊतिपासून संपूर्ण अवयव विकसित करण्याचे तंत्र शास्त्रज्ञ विकसित करतात असे दर्शविले आहे. असे तंत्र वैद्यकशास्त्राच्या दृष्टीने वरदान ठरू शकते हेच जणू ते 'परिवर्तन' मधून सूचित करीत आहेत. एकंदरीत काय की, नव्या जगाचा मंत्र म्हणजे आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन- त्याची जाण डॉ. संजय ढोले व्यक्त करतातच पण त्याच्या वापरातून माणसासाठी केवढे तरी मोठे धन प्राप्त होणार आहे हेही सांगतात.

दोन कथांबद्दल मात्र विशेषत्वाने लिहावे लागेल. एक म्हणजे 'अकल्पित' या कथेमध्ये एका स्त्रीला पुरुषाशी मीलन न होताही गर्भसंभव झालेला दर्शविला आहे. मालन नावाची स्त्री जेथे किरणोत्सर्ग होतात अशा प्रयोगशाळेत काम करीत असते आणि त्या किरणोत्सर्गाचा परिणाम होऊनच तिच्या स्त्रीबीजाचे स्वयंक्लोनिंग होते व ती गरोदर राहते. अशक्य वाटणारी

गोष्ट कशी संभवू शकते ते विज्ञानाच्या साह्याने लेखकाने फार चांगल्या रीतीने प्रकट केले आहे. 'सॉकर' या कथेमध्येही किरणांच्या साह्याने गुणसूत्रांची मालिका बदलता येऊ शकते. त्यात नवे जीन्स मिसळता येऊ शकतात याचे दिग्दर्शन डॉ. संजय ढोले यांनी केले आहे. अधून-मधून परग्रहावर जीवसृष्टी आहे किंवा नाही याची चर्चा होत असते. 'दुर्गम्य' या कथेमध्ये पृथ्वीच्या बाहेर कुठल्या तरी ग्रहावर राहणारे मानवसदृश्य मानव पृथ्वीवर तोरणमाळच्या भागात येऊन राहतात याचे चित्रण कथाकाराने केले आहे. ते मानवासारखे दिसत असले तरी मानवापेक्षा निश्चित वेगळे असतात. ते कोणीतरी वेगळेच आदिवासी असावेत म्हणून संशोधक त्यांच्यावर संशोधन करू लागतात आणि एके दिवशी मात्र संशोधकांना दीर्घ निद्रेत लोटून ते कसल्या तरी यानात बसून निघून जातात. ते नेमके कुठल्या ग्रहावरील लोक आहेत, येथे येण्याचा त्यांचा हेतू काय आहे? हे आणि यासारखे अनेक प्रश्न लेखक ध्वनित करीत जातात. आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन स्वीकारणाऱ्या या कथा विज्ञानाच्या बैठकीवर तर उभ्या असतातच पण 'कथा' म्हणूनही त्या भक्कमपणे उभ्या राहतात आणि हे डॉ. संजय ढोले यांचे खरेखुरे सामर्थ्य आहे. जाता जाता त्यांच्या कथालेखनाच्या संदर्भातील आणखी एक वैशिष्ट्याचा उल्लेख केलाच पाहिजे. डॉ. संजय ढोले आपल्या कथांमधून मराठी संज्ञांचा आवर्जून वापर करतात. रूढसंज्ञा मिळाल्या नाहीत तर त्यांची ते निर्मितीही करतात. ही बाब मराठी भाषेच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. 'किरणोत्सर्ग', 'मूलद्रव्ये', 'समस्थानिके', 'केंद्रक', 'ऊति', 'स्मृतिपटल', 'जनुक', 'गुणसूत्रे', 'उत्परिवर्तन', 'जनित्र', 'किरणोत्सारिता', 'आयनीकरण', 'विद्युत्भार', 'विसर्जन', 'मूळपेशी', 'संकरित', 'मस्तिष्क स्तंभातील प्रेरक', 'कोशिका', 'मेरू', 'अतिसूक्ष्म', 'पेशिका' या आणि यांसारख्या असंख्य संज्ञा ते सहजपणे वापरतात. यातूनच एखादेवेळी 'स्वयंक्लोनिंग' सारखी मराठी इंग्रजी संज्ञाही तयार होऊन जाते.

एकंदरीत मराठीतील विज्ञान साहित्य समृद्ध करणाऱ्या या कथा आहेत. या कथा वाचल्यानंतर त्यांच्याबद्दलच्या अपेक्षा अधिकच वाढतात. डॉ. संजय ढोले यांच्या पुढच्या वाटचालीबद्दल त्यांना शुभेच्छा!

प्रा. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले
ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक

★

२री आवृत्ती

अण्णा हजारे

संपादक
प्रदीप ठाकूर आणि पूजा राणा

अनुवाद
धनंजय बिजले

किंमत - १४०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.

भारतीय राजकारणातील भ्रष्टाचाराचा आणि तो दूर करण्यासाठी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी पुकारलेल्या एकहाती लढ्याचा सर्वांगीण ऊहापोह या पुस्तकात करण्यात आला आहे. भ्रष्टाचाराविरुद्ध कडक पावले उचलण्यासाठी, भ्रष्ट नोकरशहांना लगाम घालण्यासाठी आतापर्यंत कोणती विधेयके आणण्यात आली, नेमके काय प्रयत्न करण्यात आले, याचा इतिहास या पुस्तकात मांडण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर भ्रष्टाचाराविरुद्ध कडक कायदा आणण्यात ज्यांनी अडथळे आणले त्यांच्याविरुद्ध नागरी समाजाचा असलेला रागसुद्धा येथे उद्धृत करण्यात आला आहे. नागरी समाजाच्या संतापाचे अण्णा हजारे यांनी व्यापक जनआंदोलनात रूपांतर केले. यामुळे यासंदर्भातील विधेयक संसदेत मांडणे किती तातडीचे आणि आवश्यक आहे, हे खासदारांना उमगले. भारतातील उच्च स्तरावरील भ्रष्टाचार आणि यामुळे देशातील अर्थव्यवस्थेचा आणि लोकांच्या कल्याणाचा कसा लचका तोडला जात आहे, याचा समग्र आढावा या पुस्तकात घेण्यात आला आहे. सार्वजनिक क्षेत्रात भ्रष्टाचाराचा गंभीर गुन्हा करणाऱ्या लोकांविरुद्ध कारवाई करण्यास सध्याच्या कायद्यात कशा त्रुटी आहेत, यावरही हे पुस्तक झगझगीत प्रकाश टाकते. आधी केले; मग सांगितले, या न्यायाने अण्णांनी आयुष्यभर कार्य केले.

ज्या माणसाला स्वत:चे कुटुंब नाही, संपत्ती नाही. बँकेत ठेव नाही, त्याने स्वत:ला 'फकीर' म्हणवून घेण्यात काहीही आश्चर्य नाही.

टॉनिकचे संपादक मानकरकाका यांचे निधन

'टॉनिक' या मुलांच्या दिवाळी अंकाचे संपादक, चित्रकार कृष्णा ल. मानकर ऊर्फ मानकरकाका यांचे २७ नोव्हेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. ते ७८ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी कथा, मुलगा चित्रभूषण, सून व दोन नातवंडे असा परिवार आहे.

कौटुंबिक कामासाठी मानकरकाका विठ्ठलवाडी येथे गेले होते. तेथूनच ते विद्यार्थी उत्कर्ष मंडळाच्या विवेकानंद व्याख्यानमालेस जाण्यासाठी निघाले असता त्यांना लोकलमध्ये अस्वस्थ वाटू लागले. प्रवाशांनी त्यांना रुग्णालयात दाखल केले, परंतु उपचारादरम्यान त्यांचे निधन झाले. मानकरकाका यांच्यावर सानेगुरुजींच्या विचारांच्या पगडा होता. या प्रभावातून त्यांनी मुलांवर संस्कार व्हावेत या दृष्टिकोनातून १९७९ पासून 'टॉनिक' हा दिवाळी अंक प्रकाशित करण्यास सुरुवात केली. गेली ३६ वर्षे अथकपणे 'टॉनिक' या दिवाळी अंकाचे नियमित प्रकाशन होते. यंदाचा दिवाळी अंक 'जपान' या देशावर आधारित आहे.

'टॉनिक'ला गेल्या ३६ वर्षांत ५६ पुरस्कार मिळाले आहेत. मानकरकाका दरवर्षी बालचित्रकारांचे प्रदर्शन भरवीत व उत्कृष्ट चित्रांना पारितोषिकेही देत होते, तसेच ते काका जेव्हा एखाद्या कार्यक्रमाला जात, तेव्हा तेथे भावलेल्या व्यक्तीचे चित्र काढून त्या व्यक्तीला भेट म्हणून देत.

डॉ. यशवंत रायकर यांचे निधन

डॉ. यशवंत रायकर यांचे नुकतेच ठाण्यात निधन झाले. ते ८३ वर्षांचे होते. भटकंती आणि व्यासंग या दोन्ही वृत्तींचा समतोल त्यांनी व्यक्तिमत्त्वात साधल्यानेच त्यांच्या लिखाणाला, संशोधनाला शिस्त होती.

१९३२ मध्ये अलिबागेत जन्म. त्यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण तेथेच.

त्यानंतर घरच्या परिस्थितीनुसार नोकरी करून त्यांनी नाइट कॉलेजमध्ये पुढील शिक्षण. पुढे इतिहासात एमए करण्यासाठी बडोद्याच्या सयाजीराव गायकवाड विद्यापीठात प्रवेश केला. तेव्हा त्यांची पुरातत्त्व संशोधनाकडे वाटचाल सुरू झाली. या काळात महाराष्ट्र व गुजरातेत त्यांनी भरपूर भ्रमंती केली. त्यानंतर भोपाळमध्ये काही काळ अध्यापन केल्यावर त्यांची अरुणाचल प्रदेशात पुरातत्त्व खात्यात नियुक्ती झाली. अरुणाचलला पुरातत्त्व विभागाच्या नकाशावर आणण्याचे महत्त्वाचे काम त्यांनी केले. त्यांच्याच नेतृत्वाखाली लोअर दिबांग खोऱ्यात भीष्मकनगरचा किल्ला, रुख्मिणी नाती, इंटा पुखरी, नदम पुखरी येथे महत्त्वपूर्ण उत्खनने पार पडली.

ईशान्येतील राज्यांमध्ये जोखमीचा प्रवास करताना त्यांनी भारताच्या सीमा जाणून घेतल्या. अंदमान-निकोबारमध्ये उत्खनन करताना तेथील आदिवासी जमातींशी संवाद साधला. १९८० मध्ये ते वरळीच्या नेहरू सेंटरमध्ये आले, तेव्हा पं. जवाहरलाल नेहरू यांच्या 'भारत एक शोध' ग्रंथाचा सचित्र आविष्कार प्रदर्शनरूपात मांडण्याचा प्रकल्प त्यांनी साकारला. त्याच काळात सोफाया, भारतीय विद्या भवन तसेच मुंबईतील वास्तुरचना कॉलेजमधील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण द्यायचे. केंद्र सरकारच्या पर्यटन विभागासाठी गाईड्सना इतिहासाची दृष्टी देण्याचे कामही त्यांनी केले.

मुंबईतील विविध सांस्कृतिक संस्था तसेच ट्रेकर मंडळींच्या उपक्रमांमध्येही ते उमेदीने सहभागी होत. त्यातून घारापूरी, कान्हेरी, रायगड, हरिश्चंद्रगड, यासारख्या स्थळांवर त्यांनी जिज्ञासूंसाठी शिक्षणसहली घेतल्या. याच काळात 'महाराष्ट्र टाइम्स' मधला त्यांचा अनोळखी मुंबई हा स्तंभ लोकप्रिय झाला व त्याचे पुढे 'मुंबई: ज्ञात व अज्ञात' हे पुस्तकही झाले.

दामू देवबाग्याची दुनिया, अथातो ज्ञान जिज्ञासा, अथातो धर्म जिज्ञासा या ग्रंथांसह त्यांनी विपुल लिखाण केले. लवकरच हे धन ई-बुकरूपातही येणार आहे.

सईद जाफरी यांचे निधन

बॉलिवूड तसेच, हॉलिवूड आणि ब्रिटिश चित्रपटांतून अनेक चरित्र भूमिका साकारणारे आणि सिनेरसिकांवर आपल्या सहजसुंदर अभिनयाची छान सोडणारे बुजुर्ग चरित्र अभिनेते

सईद जाफरी यांचे ब्रेन हॅमरेजमुळे नोव्हेंबरमध्ये लंडनमध्ये निधन झाले. ते ८६ वर्षांचे होते. गेली काही वर्षे ते कर्करोगाने आजारी होते. त्यांच्या पश्चात दुसरी पत्नी जेनिफर आणि पूर्व पत्नी मधुर यांपासूनच मीरा, झिया, सकीना या मुली आहेत.

सईद जाफरी यांची पुतणी शाहीन अगरवाल यांनी फेसबुकच्या माध्यमातून ही दु:खद बातमी दिली.

बालसाहित्यकार सुरेखा पाणंदीकर यांचे निधन

बालकुमारांसाठी मराठी, इंग्रजी आणि हिंदी भाषेतून वैविध्यपूर्ण लेखन करणाऱ्या ज्येष्ठ बालसाहित्यकार सुरेखा पाणंदीकर (वय ८०) यांचे नुकतेच दिल्ली येथे निधन झाले. त्यांच्यामागे पती आणि दोन मुलगे असा परिवार आहे. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ आणि 'फिक्की'चे (फेडरेशन ऑफ इंडस्ट्रीज) माजी महासचिव डॉ. डी. एच. पाणंदीकर यांच्या त्या पत्नी होत.

सुरेखा पाणंदीकर या ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी व माजी केंद्रीय मंत्री काकासाहेब गाडगीळ यांच्या कन्या आणि माजी केंद्रीय मंत्री बॅ. विठ्ठलराव गाडगीळ यांच्या भगिनी होत. 'दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स'मधून पदवी संपादन केल्यानंतर पाणंदीकर यांनी बालकुमार साहित्य आणि ग्रंथालय चळवळीसाठी आपले आयुष्य वेचले. मुलांचे शिक्षण आणि सर्वांगीण विकास या उद्दिष्टांसाठी कार्य करणाऱ्या संस्थांमध्ये पाणंदीकर यांनी काम केले. मुले आणि महिलांशी संबंधित वेगवेगळ्या सामाजिक आणि आर्थिक विषयांवर मराठी वृत्तपत्रे आणि नियतकालिकांतून त्यांनी सातत्याने लेखन केले. बालसाहित्यातील योगदानाबद्दल सुरेखा पाणंदीकर यांना अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेने जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित केले होते.

लेखिका मीना वांगीकर यांचे निधन

लेखिका, अनुवादक मीना वांगीकर (वय ६५) यांचे दीर्घ आजारपणामुळे पुण्यात निधन झाले. अनुवादातून त्यांनी कन्नड आणि मराठी भाषांमधील संबंध दृढ करण्याचे काम केले.

वांगीकर यांचा जन्म धारवाड येथे झाला होता.

मातृभाषा कन्नड असताना त्यांनी मराठीवर प्रभुत्व मिळवले. डॉ. शिवराम कारंथ यांच्या 'मुकज्जी', व्यासराय बल्लाळ यांच्या 'बंड', 'रावबहादूर आर. बी. कुलकर्णी यांच्या 'धूमकेतू' या कन्नड कादंबरीचा मराठीत अनुवाद केला होता. अनंतराव कुलकर्णीलिखित 'मी जेनी' या पुस्तकांसह इतर मराठी पुस्तकांचे त्यांनी कन्नडमध्ये भाषांतर केले होते. 'स्त्री माझे नाव असे', 'मोह पश्चिमेचा', 'प्र-प्रवासाचा फ-फजितीचा' अशी त्यांची पुस्तकेही प्रकाशित झाली आहेत. त्यांच्या मागे पती, मुलगा, मुलगी असा परिवार आहे.

ज्येष्ठ विज्ञान लेखक प्रभाकर सोवनी यांचे निधन

विज्ञानविषयक लेखन करणारे प्रा. प्रभाकर सोवनी (वय ८९) यांचे दीर्घ आजारपणामुळे पुणे येथे निधन झाले. त्यांच्या मागे मुलगा, मुलगी असा परिवार आहे. प्रा. सोवनी यांचा जन्म पुण्यातच झाला. एम. एस्सीपर्यंत त्यांनी शिक्षण घेतले.

१९४५ मध्ये विज्ञान विषयावर त्यांचे पहिले लेख प्रसिद्ध झाले. त्यानंतर खनिज तेल, खग्रास सूर्यग्रहण, झेप विज्ञानाची अशा नानाविध विषयांवर त्यांनी लेखन केले. कोयना भूकंपावरील त्यांचा लेख प्रचंड गाजला. विज्ञानविषयक वीसहून अधिक पुस्तकेही प्रकाशित झाली आहेत.

जमशेदपूरनंतर फर्ग्युसन महाविद्यालयात त्यांनी नोकरी केली.

'फर्ग्युसन'मधून ते उपप्राचार्य पदावरून निवृत्त झाले. अनेक नवे विज्ञान लेखक घडले त्यांनी घडवले.

★

कबंध

लेखक
रत्नाकर मतकरी

किंमत - १४०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.

'पारखा' या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी
डावीकडून दुसऱ्या - अनुवादक उमा कुलकर्णी व
लेखक एस्. एल्. भैरप्पा आणि इतर

RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.:PCW/086/2015-2017/ Posted at Marketyard Pso, Pune
Publishing Date : 11 December. 2015 Posting Date : 11 December. 2015

आमची नवीन पुस्तके



BOOK POST
Printed Matter

मेहता मराठी ग्रंथजगत
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति, _____

_____

_____

_____

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.